२३ डिसेंबर १९६७

चाळीस पैसे

# माणूस

जे जे सुभग, सुंदर आहे
भव्य व थोर आहे
ते ते गोपीनाथाला आवडते.
पण जे भव्य आहे ते
अतिभव्य, विक्राळ झाल्यावर
त्याला आवडेल की नाही
त्याबद्दल मला शंका वाटते.
त्यामुळेच प्रत्यक्ष क्रांतिकारकापेक्षा
क्रांतीच्या डौलदार पवित्र्यात
उभे राहणारे पंडित नेहरू
त्यांना अतिशय प्रिय वाटत असावेत
असा माझा तर्क आहे.

— *ना. ग. गोरे*



समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : तिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर,
सौ. निर्मला पुरंदरे

---

स. न. १३-१२-६७

आपले धडाडीचे कार्य पाहून आमच्या सारख्यांच्या कार्यक्रमाला चांगलीच चालना मिळते.

पालघर तालुक्याच्या दक्षिण विभागातील २० गावांचे एक युनिट निवडून त्या भागाच्या विकासाच्या दृष्टीने आम्ही काही मंडळी प्रयत्न करीत आहोत. विलेपारले येथील एक नामवंत डॉक्टर ब. ज. पाटील हे एक कल्पक गृहस्थ असून नवीन कल्पना सत्यसृष्टीत उतरवण्यासाठी ते स्वत: झटतात व आम्हालाही झटवितात.

आमच्या या २० गावांतील लोकांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे, त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा व या भागाचा विकास व्हावा या हेतूनेच आम्ही काम करीत आहोत.

या कामाला प्रेरणा मिळण्याच्या दृष्टीने आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे.

**पां. वि. घरत,**
माईंदर

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

---

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



# मुक्काम औरंगाबाद

रविवारची सकाळ. काल रात्रीपासून सुरू झालेली पावसाची झिरझिर सकाळीही चालूच होती. त्यामुळं हवेत एक विलक्षण कुंद गारठा भरून राहिला होता. रविवारच्या सगळ्या आनंदावर विरजण घालणारा. बाहेर आठ–साडेआठ वाजून गेले तरी चादर लपेटून मी बिछान्यावरच बसून होतो. काहीतरी वाचायचं म्हणून एक पुस्तक डोळ्यांसमोर धरलं होतं इतकंच; पण खरं तर मी बिछान्याची आणि चादरीची उबदार संगत सर्वांगांनी अनुभवत होतो...आणि अचानक आठवण झाली की आपल्याला आज सकाळी नऊ वाजता एका सभेला जायचं आहे. कसली सभा त्याची नीटशी कल्पना नव्हती. 'माणूसचे संपादक माजगावकर यांनी एका अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नावर सभा बोलावली आहे. तुम्ही जरूर या,' असा मिरासदारांचा आग्रहाचा निरोप होता. चादरीच्या उबेतून बाहेर पडावंसं वाटत नव्हतं तरी पण उठलो. छत्री घेतली आणि निघालो.

ओल्याकच्च गारठ्यातून चालताना मनात विचार येत होता– माजगावकरांनी उत्साहाने सभा बोलावली खरी. पण बहुधा त्यांच्या उत्साहावर पाणी पडणार. अशा थंडीत आणि गारठ्यात कोण येणार ? जेमतेम दहा–बारा मंडळी आली तरी खूप झाली.

पण शिवाजी मराठा हायस्कूलच्या सभागृहाशी आलो आणि अक्षरश: चाट पडलो. सभागृह गच्च भरलं होतं. औरंगाबादमधले निरनिराळ्या राजकीय पक्षांचे पुढारी, कार्यकर्ते, शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक क्षेत्रांतली बहुतेक सर्व निवडक आणि मान्यवर मंडळी एकमेकाला खेटून दाटीवाटीत बसली होती. म्हणजे कमाल झाली. पुण्याच्या एका साप्ताहिकाच्या संपादकानं बोलविलेल्या सभेला, अशा थंडी-पावसात औरंगाबादमध्ये ही गर्दी ! सभेच्या मध्यभागी काही सर्वोदयवादी मंडळीही दिसत

होती. सभागृहाच्या भिंतीवर जागोजाग, खानदेशामधल्या अक्राणी महालाचे नकाशे आणि सातपुडा सर्वोदय मंडळानं तिथं केलेल्या कार्याचे तक्ते लावले होते. मी घोटाळ्यात पडलो. म्हणजे सभा बोलावली कुणी ? सर्वोदयवाल्यांनी की माजगावकरांनी ? काही उलगडा होत नव्हता. पण बोलायला उभे राहिलेले सर्वोदयी कार्यकर्ते दामोदरदास मुंदडा यांच्या बोलण्यातून आपोआप उलगडा झाला. सभा बोलावली माजगावकरांनीच. पण खानदेशात, सातपुडा परिसरात, विनोबाजींच्या ग्रामदानाचं काम करणारे मुंदडाजी, माजगावकरांच्या 'माणूस'वर आणि त्यांच्या तळमळीवर इतके बेहद्द खूष होते की त्यांनी आपली सगळी शक्ती माजगावकरांच्या संकल्पित 'संचलना'मागं उभी करायचं ठरविलं होतं.

आहे तरी कसलं हे 'संचलन' ? माझी उत्सुकता वाढत होती. आणि त्याचा खुलासा झाला. स्वत: माजगावकरांच्या बोलण्यातूनच. मुंदडाजींनी माजगावकरांच्या ध्येयवेडेपणाची ओळख करून दिली आणि औरंगाबादकरांच्या वतीनं माजगावकरांचं स्वागत केलं. माजगावकर बोलायला उठले. संथ आवाजात त्यांनी सुरुवात केली. कसला खास असा अभिनिवेश नाही की वक्तृत्व गाजविण्याची खुमखुमी नाही. जणू प्रकट चिंतन असावं तसं निवेदन :

"मी एक साधा पत्रकार. दामोदरदासजी मुंदडा तिकडं खानदेशात एक महान कार्य अबोलपणे करीत राहिले आहेत असं समजलं. जंगलाच्या जाळीतून आणि डोंगराच्या घळीतून वसलेल्या अक्राणी महालातल्या गिरिजनांमधून आज एक नवा समाज निर्माण होत आहे. असं काही चांगलं कार्य कुठं चाललं आहे समजलं, की तिथं जाणं आणि त्या कार्याला प्रसिद्धी देणं हे तर पत्रकाराचं कामच. तसा मी तिथं गेलो. अक्राणी महालातल्या अनेक खेड्यांना भेटी दिल्या. तिथं चालणारं बंडिंगचं, शेतीचं कार्य डोळ्यांखाली घातलं. बोलता बोलता तिथं समजलं की, गेली सतत सात वर्षं या भागात दुष्काळी परिस्थिती आहे. आणि त्या दुष्काळी परिस्थितीला तोंड देत, इथं महात्माजींची, विनोबांची स्वप्नं साकार होत आहेत. गिरिजनांची स्वप्नं फुलताहेत. इथल्या भूमीत अधिकात अधिक धान्य पिकविण्याची धडपड चालू आहे. आहे त्या धान्याची काळजीपूर्वक निगराणी आणि विभागणी होत आहे— आणि ते दृश्य पाहून विचार आला, की जे अक्राणी महाल भागासारख्या अत्यंत मागासल्या समजल्या जाणाऱ्या भागात होत आहे ते सगळ्या देशातच का घडू नये ? तसं पाहिलं तर सगळ्या देशातच आज कैक वर्षांचा दुष्काळ आहे. या दुष्काळाला तोंड देण्यासाठी प्रतिवर्षी खंडोगणती धान्याची आयात परदेशांतून करावी लागत आहे. भिकेची झोळी जगापुढं

— — — — —

प्रा. वसंत कुंभोजकर

— — — — —

पसरावी लागत आहे. आता वीस वर्षं झाली; आणखी किती दिवस हे आमच्या दारिद्र्याचं नंगं प्रदर्शन करीत राहायचं ? आपल्या देशाला काही स्वाभिमान म्हणून आहे की नाही ? बरं, ही परदेशांकडं भीक मागावी लागते, ती का ? तर म्हणे आपल्या एकूण अन्नधान्याच्या गरजेपेक्षा आपल्या देशात पिकणारं अन्नधान्य दहा टक्क्यांनी कमी आहे. पण त्याच वेळी सरकारी आकडेवारी असं सांगते, की एकूण उत्पादनाच्या दहा टक्के अन्नधान्य हे घुशी, उंदीर यांच्या पोटात जातं, ठेवल्या ठिकाणी त्याची नासधूस होते, मग ही नासधूस थांबण्याची काही प्रभावी यंत्रणा या देशात उभी करता येणार नाही काय ?

चोरट्या मार्गांनी राजस्थान आणि (पाक) काश्मीरच्या सीमेवरून पाकिस्तानला जाणारी कोटघवधी टनांची निर्यात शासनाला थांबवता येणार नाही काय ? **म्हणजे एवढी नासधूस आणि चोरटी निर्यात जरी केवळ थांबवली, तरी देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे हे सरकारी आकड्यावरूनच सिद्ध होत असताना, वर्षानुवर्षं आम्ही भिकेचे वाडगे घेऊन परदेशांपुढं का म्हणून जातो ?** आपल्याला याची खंत कशी वाटत नाही ? गेल्या फक्त आठ-पंधरा दिवसांतली वृत्तपत्रं जरी वरवर चाळली तरी आपल्या देशात धान्याची नासाडी गुदामातच किती प्रचंड प्रमाणात चालू आहे याचं विदारक दृश्य डोळ्यांसमोर येतं—मला वाटतं, हे आपल्या शासनकर्त्यांना आता सांगण्याची वेळ आली आहे, की तुम्ही परदेशी भीक मागून आमच्या देशाची इभ्रत पार रसातळाला नेण्याचा हा उपक्रम आता पुरे करा.

आणि समजा, ही आकडेवारी चूक आहे असं घटकाभर गृहीत धरलं आणि खरो-खरच आपल्या अन्नधान्याची पैदास आपल्या गरजेपेक्षा कमी आहे असं समजून चाललं तरी कधी ना कधी आपल्याला आपल्या पायांवर उभं राहायला नको का ? जे देशात पैदा होत आहे तेवढंच आम्ही खाऊ. सारखं वाटून घेऊ. मग त्यासाठी एक वेळ उपास घडला तरी हरकत नाही अशी एक राष्ट्रीय जिद्द आमच्यात निर्माण व्हायला नको काय ? केव्हा तरी ती होणं अपरिहार्य आहे. मग ती आजच आपण का करू नये ? एकदा पाहू तरी देशाची कसोटी. आणि अशी कसोटी पाहिल्याशिवाय देशाचा खरा कस कळायचा कधी ? माझी खात्री आहे, शासनकर्त्यांनी असं आव्हान देशाला केलं, तर देश ते आव्हान खाली पडू देणार नाही. **परदेशी मदतीचे दोर आज ना उद्या तोडावे लागणारच आहेत. मग ते आजच तोडा.** पाहा, सारा देश 'जिंकू आणि जिंकूच' या ईर्ष्येनं खडा राहतो की नाही ते ! मागं इतिहासात अशाच एका वीरानं सिंहगडावरून खाली उतरायचे दोर तोडून टाकले होते. मराठे समशेरी पाजळून मागं वळले. प्रचंड 'हर हर' केला आणि किल्ल्या-वर मराठ्यांनी आपलं निशाण फडकविलं. आजही अन्न स्वावलंबनाचा झेंडा या

देशावर फडकविणं अशक्य नाही. फक्त हे भिकेचे डोहाळे बंद केले पाहिजेत.

अर्थात या अकारण भीक मागण्याच्या उद्योगामुळं जगासमोर उभी राहिलेली भारताची प्रतिमा पुसून टाकून स्वाभिमानी भारत म्हणून जगापुढं उभं ठाकणं, ही काही एकटया सरकारचीच जबाबदारी नाही. तुम्हा-आम्हा सामान्य माणसाचंही ते कर्तव्य आहे. तेच कर्तव्य पार पाडण्यासाठी आम्ही काही मंडळींनी एक 'संचलन' काढण्याचं ठरविलं आहे. वेरूळच्या कैलास लेण्यासमोरून उद्याच्या चौदा तारखेला आम्ही हे संचलन सुरू करू. या प्रस्थान ठिकाणाला एक प्रतीकात्मक अर्थ आहे. कैलास लेणं हे एक ठिकाण असं आहे की जिथं आमची मान आजही अभिमानानं ताठ आहे. इतर अनेक बाबतींत आमचे सावकार असणारे परदेशी लोक कैलास लेण्यासमोर येऊन मात्र नतमस्तक होतात. अशा या भारताच्या मानबिंदूपासून, त्या प्राचीन परंपरेचा आशीर्वाद घेऊन, आम्ही हे संचलन सुरू करू. आणि गावोगाव जाऊन तिथल्या लोकांना जागं करू आणि सांगू, 'बाबांनो, तुम्ही आवाज उठवून शासनाला सांगा. यापुढं परदेशांतून धान्य आणून आमच्या पोटाला घालू नका. केवळ पोटासारख्या प्राथमिक गरजेसाठी देशाचा स्वाभिमान विकू नका! आमची ही कल्पना लोकांना वेडेपणाची वाटते की काय, असं सुरुवातीला वाटलं; पण औरंगाबादमधल्या सर्व थरांतल्या सर्व विचारांच्या मंडळींनी आज आम्हांला ही जी दाद दिली आहे त्यावरून प्रत्येक सुशिक्षित आणि देशाबद्दलचा विचार असणाऱ्या माणसाच्या मनामधलेच आम्ही बोलून दाखवीत आहोत, याची आम्हांला खात्री पटली आहे. वेरुळप्रमाणंच एक संचलन कोकणातून सुरू होईल; एक खानदेशातून सुरू होईल आणि मार्चच्या शेवटच्या आठवड्यात मुंबईला एका प्रचंड सभेत, अखिल महाराष्ट्राच्या अन्तःकरणाचा हा पक्ष आणि राजकारण निरपेक्ष आवाज आपण शासनाच्या आणि राज्यकर्त्यांच्या कानांवर घालू. आपणा सर्वांचा या संचलनाला आशीर्वाद असावा. आज हा आवाज आपण उठवला नाही तर पुढच्या पिढ्यांचे शिव्याशाप आपल्याला खावे लागतील."

माजगावकरांचं हे प्रकट चिंतन थांबलं तेव्हा सभा भारावून गेली होती. त्यानंतर अनेक मंडळी बोलली. निरनिराळ्या पक्षांची. पण कोणाचाही पक्ष त्यांच्या बोलण्यात कुठं चुकूनही डोकावला नाही. प्रत्येकाच्या बोलण्यातून प्रकट झाला तो 'माणूस'. देशाच्या उन्नतीचा विचार करणारा 'माणूस'. सर्वांनी एकमुखानं माजगावकरांच्या कल्पनेला पाठिंबा दिला. सक्रिय साहाय्याचं उत्स्फूर्त आश्वासन दिलं. मुंदडाजींनी सर्वांचे आभार मानले आणि बरोबर आपल्या मनातल्या व्यथेलाच बोलकं केल्याची पावती माजगावकरांना देऊन, सभा विसर्जित झाली, एका अति निकडीच्या प्रश्नाला तोंड फुटल्याच्या समाधानात...... ▫▫

**[ही सभा दहा डिसेंबरची. त्यानंतर कोयनेचा धक्का. या दुःखद घटनेमुळे संचलनाचा संकल्पित कार्यक्रम थोडा बदलावा लागला. —श्री. ग. माजगावकर]**

नक्षलबाडीमुळे पश्चिम बंगालमधल्या कम्युनिस्टांच्या कारवायांकडे जसे देशाचे लक्ष वेधले गेले होते तसे ते केरळकडे गेलेले नाही. आपल्या हस्तकांकरवी राज्ययंत्रणा पोखरून टाकायची, प्रतिसरकार म्हणून जिचा उल्लेख करता येईल अशी स्वतंत्र संघटना उभारायची आणि मग अनुकूल वेळ येताच या प्रतिसरकारच्या बळावर पोखरलेली राज्ययंत्रणा ताब्यात घेऊन लोकशाहीची मुस्कटदाबी करायची हे कम्युनिस्टांचे ठरीव तंत्र आहे. पश्चिम बंगालमधल्या कम्युनिस्टांनी गेल्या आठ–दहा महिन्यांत हा प्रयोग काही एका मर्यादेपर्यंत करून पाहिला. परंतु मंत्रिमंडळात त्यांचे वर्चस्व असले आणि अर्थखात्यासारखे महत्त्वाचे खाते त्यांच्या हातात असले तरी मुख्यमंत्री 'बूर्झ्वा' असल्यामुळे बंगाली कम्युनिस्टांना फार दौड मारता आली नाही. ज्योती बसूंपेक्षा अजय मुकर्जी यांची लोकप्रियता अधिक असल्यामुळे अजयबाबूंना दुखवून आपला कार्यक्रम ज्योती बसू यांना फारसा पुढे रेटता आला नाही. इतकेच नव्हे तर कम्युनिस्टांच्या हिंसात्मक आणि देशद्रोही कारवायांना कंटाळून अजयबाबूंची राजीनामा देण्यापर्यंत मजल गेल्यानंतर साऱ्या देशाचे व विशेषत:

# दिल्ली दरबार

केंद्रीय गृहखात्याचे आपल्या पूर्व सीमेवर चाललेल्या कारवायांकडे लक्ष गेले. भारताशी प्रच्छन्न शत्रुत्व करणाऱ्या आणि पं. नेहरूंपासून इंदिरा गांधींपर्यंत सर्व भारतीय नेत्यांवर शिव्या–शापांचा वर्षाव करणाऱ्या माओची छायाचित्रे कलकत्त्यातील मिरवणुकीत आढळत होती आणि भारताचा व्हिएटनाम करू अशा जाहीर धमक्याही दिल्या जात होत्या. राज्यपालांनी अजय मुकर्जी यांचे संमिश्र मंत्रिमंडळ बडतर्फ केल्याने कम्युनिस्टांच्या कारवायांना तात्पुरता का होईना पायबंद बसत आहे.

केरळमधील परिस्थिती यापेक्षा वेगळी आहे. एक तर नंबुद्रिपादांची एकपक्षीय राजवट केरळने दहा वर्षांपूर्वी काही काळ अनुभवलेली आहे. शिवाय सध्या तेथील मंत्रिमंडळ संमिश्र स्वरूपाचे असले तरी प्रामुख्याने त्याचा रंग लाल आहे. इतर पक्षांना केरळमध्ये फारशा जागा न मिळाल्यामुळे मंत्रिमंडळात त्यांना प्रतिनिधित्व मिळूनही आपल्या पक्षाचा कार्यक्रम पुढे रेटण्याच्या दृष्टीने त्यांना कार्य करता आले नाही. त्यामुळे नंबुद्रिपाद यांच्या डाव्या कम्युनिस्ट पक्षाची राजवटच तेथे स्थिरपद

झालेली आहे. या लाल राजवटीला मुस्लीम लीगच्या पाठिंब्यामुळे हिरव्या रंगाची सोईस्कर किनारही लाभली आहे.

त्यामुळे केरळमध्ये नेमके काय चालले आहे, यासंबंधीच्या बातम्या फारशा बाहेर येत नाहीत. परंतु आता अशी माहिती उजेडात आलेली आहे की डाव्या कम्युनिस्टांनी केरळमध्ये गोपालसेना (शिवसेनेच्या निमित्ताने सेना या शब्दाला लोकप्रियता मिळू लागली आहे याचे आणखी एक उदाहरण) स्थापन केली असून पूरक पोलिसदल असे तिचे स्वरूप असल्याचे श्री. ए. के. गोपालन यांनी जाहीर केलेले आहे. कम्युनिस्टांचा आणि गोपालाचा संबंध कोठे आला असा प्रश्न ज्यांच्या मनात निर्माण होईल त्यांच्यासाठी हे सांगितले पाहिजे की, शेतकऱ्यांना संरक्षण देण्याच्या गोंडस सबबीखाली ही सेना उभारण्यात आली असल्यामुळे तिचे गोपाल-सेना असे नामकरण करण्यात आलेले आहे. (श्री. गोपालन यांच्या आशीर्वादाने ही सेना साकारली असली तरी त्यांचे नाव या वेळेला देण्याचा उद्देश नव्हता असे जाणकार सांगतात.) अहोरात्र श्रमदेवतेची उपासना करणाऱ्या शेतकऱ्याला दिलासा

# केरळमधील गोपालसेना

वाटावा, त्याने बिचकून जाऊ नये यासाठीच मोठ्या अक्कलहुशारीने कम्युनिस्टांच्या पर्यायी पोलिस दलाने गोपालसेना हे सोज्वळ नाव घेतलेले आहे.

या गोपालसेनेचा अंतिम उद्देश मात्र फारच व्यापक आणि कम्युनिस्टांच्या परिभाषेत लोकक्रांतिकारक आहे. केंद्र सरकारमधून कॉंग्रेससारख्या ' बूर्झ्वा ' पक्षाला हाकलून देण्यासाठी डावे कम्युनिस्ट या गोपालसेनेचा उपयोग करणार आहेत. हा काही त्यांच्यावरचा कपोलकल्पित आरोप नव्हे. या गोपालसेनेच्या ' अधिकाऱ्यां 'चे ऑक्टोबरच्या प्रारंभी कालिकत जिल्ह्यातील कन्ननकारा येथे जे शिक्षण शिबिर भरले होते त्या शिबिराचे उद्घाटन करताना खुद्द गोपालन यांनीच आपल्या ' अधिकाऱ्यां 'ना या अंतिम उद्दिष्टाची जाणीव करून दिली. ऑक्टोबरमधल्या शिबिरामध्ये ' लोकक्रांती 'चे शिक्षण घेतलेले अधिकारी आता खेडोपाड्यात गेले असून तेथील भूमिपुत्राला ते जागृत करीत आहेत. गोपाल सैनिकांना छुप्या युद्धपद्धतीचे (गनिमी काव्याचे) शिक्षण देण्यासाठी निवृत्त सैनिकांची नेमणूक कर-

ण्यात आलेली आहे. ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या दोन महिन्यांत कन्ननकाराच्या धर्तीवर केरळ राज्यात ठिकठिकाणी वीस शिबिरे भरविण्यात आली होती आणि या शिबिरांमधून एकूण सहाशे अधिकारी तयार झाले आहेत. गोपालसेनेची मुळे अगदी छोटयाशा खेडेगावापर्यंत पोचविण्यासाठी हे प्रशिक्षित अधिकारी ग्रामीण भागातून हिंडत असून प्रत्येक खेडयात दहा तरी गोपाल-सैनिक असलेच पाहिजेत हा कार्यक्रम त्यांनी आपल्या डोळयांपुढे ठेवलेला आहे.

डाव्या कम्युनिस्टांचा हा उद्योग पाहून या शर्यतीत आपणही मागे राहता कामा नये या विचाराने उजवे कम्युनिस्टही कामाला लागले असून त्यांनी आपली लाल सेना उभारण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. कम्युनिस्टांच्या डाव्या आणि उजव्या अशा दोन्ही शाखा मैदानात उतरल्याचे पाहून मुस्लीमलीगनेही आपल्या हिरव्या सेनेचा मुहूर्त केला आहे. आक्टोबरच्या अखेरीस मालमपुझा येथे केरळ प्रदेश मुस्लीम-लीगची बैठक भरलेली असताना दोनशे हरित सैनिक उपस्थित होते.

आता हे सेनेचे लोण केवळ या तीन पक्षांपुरतेच मर्यादित राहणार नाही. कारण केरळ लालरक्षक असे आपले स्वतंत्रदल उभारण्याचा क्रांतिवादी पक्षाचा विचार असून या राष्ट्रद्रोही प्रवृत्तीच्या ‘सेनां’ पासून केरळ राज्याचे संरक्षण करण्यासाठी केरळ काँग्रेस आणि स्वतंत्र पक्ष यांनी ‘संरक्षक सेना’ उभारण्याचे ठरविले आहे. परंतु केरळमध्ये काँग्रेस व स्वतंत्र पक्षाला काहीच स्थान नसल्यामुळे त्यांची ही संरक्षक सेना दोन-चार मोठ्या शहरांपुरतीच मर्यादित राहील.

डाव्या कम्युनिस्टांच्या देशविघातक व हिंसात्मक कारवायांकडे केंद्र सरकारचे लक्ष असल्याचे केंद्रीय गृहमंत्री श्री. चव्हाण यांनी नुकतेच संसदेत सांगितले आहे. बंडाची तयारी करणाऱ्या या शक्तींचा कसा काय बंदोबस्त करायचा याची केंद्र सरकार स्वतःच्या सामर्थ्यानुसार काळजी घेईल. परंतु मुख्य प्रश्न आहे तो कम्युनिस्टांशी साथसंगत करून इतर राज्यांत कम्युनिस्टांसह मंत्रिमंडळे स्थापन करावयास धजलेल्या राष्ट्रवादी आणि लोकशाहीनिष्ठ पक्षांची यासंबंधी काही जबाबदारी आहे की नाही हा. आणि आपलीही या संबंधात जबाबदारी आहे असे जर ते मानीत असतील तर मग त्यांनी या वा त्या राज्याचा विचार करण्याऐवजी संपूर्ण देशासाठी म्हणून राष्ट्रीय धोरण आखण्याची गरज आहे किंवा नाही याबाबत त्यांनी निःसंदिग्ध शब्दांत खुलासा केला पाहिजे. लोकांपुढे मते मागण्यासाठी येणाऱ्या पक्षांकडून एवढी मागणी करण्याचा मतदारांना खचित अधिकार आहे.

**–सदाशिव पेठकर**



## □ जोरसे ताली बजाव !

आपल्या देशातले सर्वांत जास्त खपाचे साप्ताहिक कुठले असेल? एखादे–'फिल्म फेअर' वगैरे. परंतु सर्वांत थोर–Great-Greater–Greatest साप्ताहिक कोणते ? याचे उत्तर आहे–'ब्लिट्झ्' त्याच्यावर लिहिलेलेच असते – India's Greatest weekly. हे नुसते India's Greatest weekly नाही. ते Indira's Greatest weekly सुद्धा आहे. या सर्वांत थोर साप्ताहिकाचे संपादक आहेत करंजिया ! हे थोर आहेत कारण हे पहिल्या पानावर जशी सनसनाटी बातमी छापतात, तशीच शेवटच्या पानावर एक सनसनाटी बाई छापतात. त्यांचा हा थोरपणा न पटलेल्या कुणा एका क्षुद्र माणसाने, वस्त्रहरित बाईचे अश्लील चित्र छापले म्हणून या करंजियांवर नुकतीच फिर्याद केली. करंजियांचे पुरोगामित्व न पटलेल्या कोर्टाने त्यांना चक्क दंड केला. आता त्यांच्यावर रा. स्व. संघाची बदनामी केल्याबद्दल एक खटला सुरू आहे. मागे त्यांच्यावर असा खटला होणार होता पण चूक मान्य करून त्यांनी लगेच सपशेल माफी मागितली. मोठे मोठे सत्याचे उपासक माफी मागायला कधीच मागेपुढे पाहत नाहीत. इराणच्या राजाच्या सिंहासनारोहण–समारंभाला हे जातीने हजर होते. आपल्या देशातले आळशी संस्थानिक त्यांना मुळीच आवडत नाहीत. इथल्या श्रीमंत लोकांना लवकरात लवकर गरीब करण्यासाठी ते सतत लेखणी चालवतात. परंतु इराणचा शहा जसा 'ग्रेट' तसे हे 'ग्रेटेस्ट' साप्ताहिकाचे संपादकही ग्रेटच ! नुकतीच त्यांनी ना. यशवंतराव चव्हाणांची एक प्रदीर्घ खास मुलाखत प्रसिद्ध केली. या मुलाखतीत चव्हाणांनी फारच उत्तम विचार व्यक्त केलेले आढळतात. करंजियांनी प्रश्न विचारला –

" आजच्या क्षणाला सर्वांत मोठा देशांतर्गत शत्रू कोण आहे, असे तुम्हांला वाटते ?"

ना. चव्हाणांनी सांगितले–

" देशाला धोका असणाऱ्या शक्ती दोन गोष्टींमुळे फोफावत आहेत. पहिली म्हणजे देशातील धर्माधर्मांतील वैमनस्ये (Communal Tensions) व दुसरी म्हणजे प्रांतवाद व सांप्रदायिकता. या दोन्ही धोकादायक गोष्टींना अर्थातच ऐतिहासिक करणे आहेत. भारतीय राष्ट्रवादाला तडा देणारे देशाचे धार्मिक विभाजन आपण टाळू शकलो नाही, या आपल्या पराजयाच्या छायेत आपण स्वातंत्र्यप्राप्ती केली, ही गोष्ट शोकजनक आहे ! फाळणीमुळे ज्या जखमा निर्माण झाल्या त्या अजून वाहत्याच आहेत. "

सहसा कुणी कबूल करीत नाहीत त्या गोष्टी यशवंतरावजींनी तडकाफडकी कबूल करून टाकल्या आहेत.

(१) भारतीय राष्ट्रवादाला फाळणीमुळे तडा गेलेला आहे.

(२) फाळणीमुळे जखमा झाल्या आणि त्या अजून वाहत्या आहेत.

(३) फाळणी पत्करून स्वातंत्र्याचा सौदा केला हे शोकजनक आहे.

तडा जाऊन दुभंगलेल्या, सौदा केलेल्या व विभाजनाच्या जखमा वाहत्या असलेल्या भारताला पुन: ठाकठीक करण्याकरिता आपण काय करणार, हा ' ग्रेट ' प्रश्न ' ग्रेटेस्ट ' संपादकांनी विचारल्यावर ना. चव्हाण म्हणाले –

" जे कुणी जातीय विष पसरवतील त्या व्यक्तींना व साधनभूत होणाऱ्या गोष्टींविरुद्ध (media) आम्ही कडक उपाय योजू, निधर्मी धोरण हे आपल्या जीवनाचा पायाच आहे. आपल्या समाजाचा हा पाया मजबूत करण्यासाठी प्रत्येकाने पराकाष्ठा केली पाहिजे. "

जे दुभंगले आहे ते पुन: सांधणे आपल्याला शक्य नाही, केलेला सौदा रद्द करणे आता शक्य नाही, यामुळे जखमांना मलमपट्टी करणेच शिल्लक उरते नाही का ? निधर्मी धोरणाची एक प्रचंड मलमपट्टी तयार करून या जखमा बऱ्या होतील का ? गेली वीस वर्षे कांग्रेसच्या हाती अनिर्बंध सत्ता असताना निधर्मी धोरणाने वागूनही अखेर पाकिस्तानशीच दोन युद्धे का झाली ? निधर्मीपणा हा आपल्या म्हणजे कुणाच्या जीवनाचा आधार आहे ? जे जीवनाला आधारभूत नाही ते राजकारणाला आधारभूत होऊ शकेल काय ? निवडणुकीचा नारळ फोडायला प्रतापगडावरची अंबाबाई का लागते ? पंढरपूरच्या विठोबाची पूजा करायला मंत्री होताच माणसे सपत्नीक का जातात ? सिंहस्थ पर्वणीत मंत्रिजनांनी सपत्नीक गंगास्नाने जाहीरपणे का केली ? जीवनाचा आधार–निदान हिंदू बहुसंख्य जीवनाचा आधार– हिंदुधर्म आहे असा याचा अर्थ होतो काय ? हिंदुधर्म तर उदार आहे. हिंदू संतांइतका समाजवादी भारतात कुणी असेल का ? मग अशा या धर्माची कास धरून

भारत लवकर खऱ्या अर्थाने असांप्रदायिक होण्याची आशा का धरू नये ? या देशात जातीयतेचे विष कुणी कालवले ? सावरकरांच्या वडिलांनी की आगाखानाच्या वाडवडिलांनी ? ग्रेटेस्ट वुईकलीच्या ग्रेट संपादकांना हे प्रश्न पडले नाहीत कारण सरशी तिकडे पारशी !

ना. चव्हाणांनी पण आवरते घेतले, तेच ठीक झाले. मागे एकदा ते जाहीरसभेत खरे बोलून गेले की शिवाजी झाला नसता तर पाकिस्तानच्या सीमा दक्षिणेस कन्याकुमारीपर्यंत पसरल्या असत्या ! कोण गहजब झाला त्यांच्यावर. विधान बरोबर असले तरी विधान निधर्मी नाही; असांप्रदायिक नाही व जातीय विषाचे अस्तित्व मान्य करणारे आहे. चुकून बोलून गेले यशवंतरावजी ! आता पुनः निदान तीन-चार वर्षे नेहमी हेच सांगतील—

" निधर्मी धोरण हे आपल्या जीवनाचा पायाच आहे. आपल्या समाजाचा हा पाया मजबूत करण्यासाठी प्रत्येकाने पराकाष्ठा केली पाहिजे. "

आपले म्हणजे कुणाचे जीवन, कसला पाया, पराकाष्ठा करायची म्हणजे काय करायचे, हे प्रश्न हवेत कशाला. ते करंजिया, ते झाकीरसाहेब, ते आगाखान, ते अयुबखान, ते झकारिया, ते फक्रुद्दीन, ते ' साधक ' अल्ली, ते भुत्तो, तो निझाम, या सगळ्यांना आनंद होतो आहे...... हा देश निधर्मी आहे. निधर्मीच राहणार. आसामात मुसलमान जास्त झाले की भुत्तो ते मागतील. आपण देऊन टाकू. उरलेला देश पुनः निधर्मीच राहील. तोच आपल्या जीवनाचा " फाया " आहे ! सुगंध सुटला आहे, आनंदी आनंद गडे ! देखनेवाले जोरसे ताली बजाव !!

करंजियासाहेब, तुम्ही मात्र एक करा. ना. चव्हाणांच्या मुलाखती फार छापू नका. मध्येच खरे बोलण्याची त्यांना सवय आहे. " या धोकादायक गोष्टींना ऐतिहासिक कारणे आहेत " हे त्यांचे सूचक वाक्य महत्त्वाचे आहे. इतिहास विसरतात ते अस्ताला जातात हेदेखील त्यांनी मागे एकदा सांगितलेले आहे. इंदिराजी, फक्रुद्दीन, अशोक मेहता, दिनेशसिंग यांच्या मुलाखती कशा " सोललेल्या केळ्यासारख्या " छान असतात. त्यांनी फेकलेल्या सालींवरून जनता घसरून खड्ड्यात जाते ते नका इतके मनावर घेऊ म्हणजे झाले.

## ☐ काम कमी तर दाम अधिक !

मंत्रिजनांनी ते हयात असताना आपली संपत्ती जाहीर करावी अशी मागणी अधूनमधून होत असते. प्रत्येक खासगी गोष्ट मंत्र्यांनी जाहीर करावी असे म्हणणे खरोखर अन्यायाचे होय. सार्वजनिकपेक्षा ज्यांचे खासगीच फार असते त्यांची यामुळे पंचाईत होते. उद्याचे नागरिक ही देशाची खरी संपत्ती होय. ही संपत्ती मंत्रिजनाजवळ किती आहे हेदेखील खरे पाहता जाहीर करण्याचे काही कारण नाही. परंतु एखादा थोर पुरुष दगावला की त्याने मागे काय ठेवले हे नमूद करण्याची इंग्रजी पद्धत आता आपल्याकडे रूढ झाली आहे. या प्रथेनुसार मंत्रिजनांची

ही संपत्ती त्यांच्या निधनानंतर जाहीर होत असते. कै. पाडवींनंतर नुकतेच दिवंगत झालेले मध्यप्रदेशचे माजी काँग्रेस मुख्यमंत्री भगवतीचरण शुक्ल–गृहखात्याचे वर्तमान राज्यमंत्री विद्याचरण शुक्ल यांचे बंधू–यांच्या निधनाची बातमी देताना सर्व वृत्तपत्रांनी लिहिले––

" कै. शुक्लांच्या मागे त्यांची पत्नी व तेरा मुले आहेत." तेरा हा आकडा तसा फार नाही. उपराष्ट्रपतींच्या संपत्तीहून ही संख्या तिनाने कमीच आहे. परंतु आमचे म्हणणे मंत्रिजनांच्या बाबतीत तरी अशी 'चक्रा'वून टाकणारी माहिती 'मरणोत्तर' देखील देऊ नये. कारण कुटुंबनियोजनाच्या लूपभूषण चंद्रशेखर यांच्या प्रचाराला त्यामुळे छेद जातो. असा 'छेद' त्यांना अभिप्रेत नाही. आता असे पाहा की मध्यवर्ती सरकारच्या कमी उत्पन्नाच्या ज्या सरकारी नोकरांनी ठराविक मुलां-नंतर शस्त्रक्रिया करून घेतली असेल, त्यांना 'स्पेशल इन्क्रिमेंट' देण्याची घोषणा डॉ. चंद्रशेखर यांनी नुकतीच राज्यसभेत केली आहे. कल्पना छान आहे. काम अधिक केले तरच पूर्वी जादा वार्षिक वढती मिळत असे. परंतु 'काम' कमी केल्या-बद्दल वढती देण्याची व्यवस्था आता डॉ. चंद्रशेखर यांनी आखली आहे. अशा वेळी दिवंगत मंत्रिजनांची अपत्यसंख्या १३–१४ असते हे लोकांच्या लक्षात आले तर त्यांना प्रश्न पडेल की मोठमोठ्या जागांवर ही माणसे विशेष बढतीशिवाय चढली तरी कशी? यांना देशाचे तीन न करता तेरा केल्याबद्दल भारताच्या पहिल्या पंत-प्रधानांनी त्यांना जाब त्यांना कसा विचारला नाही? बरे इतकी अपत्ये माफ करावी असे देशाचे यांनी काय भले केले असे विचारले तरी आफतच.

'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' असे चमत्कारिक संदेश साधुसंतांनी दिलेले आहेत. यामुळे सामान्य माणसांवर एखादी 'सुशीला नाडकर्णी' किंवा 'पद्मश्री पटवर्धन' कसे सुखी झाले हे सांगून फारसा परिणाम होत नाही. त्याचे लक्ष असते स्वत: फक्त 'फिता' कापणाऱ्या आणि लोकांना 'नसा' कापा म्हणून सांगणाऱ्या मंत्रिजनांवर. यावर उपाय एकच आणि तो म्हणजे जेव्हा जेव्हा मंत्रिजनां-पैकी काही थोर माणसे कालांतराने जनताजनार्दनाला दु:खात लोटून जातील तेव्हा त्यांनी मागे काय ठेवले हे शक्य तो वृत्तपत्रांनी छापू नये. छापल्यास 'सुशीला नाडकर्णी' बाईची जाहिरात तरी छापू नये. ○

**– ग्यानबा**



नानांच्या वयाला ६० वर्षे पूर्ण झाली तेव्हा त्यांच्यासंबंधी जे लेख आले त्या बहुतेकांत "नाना" साठ वर्षांचे झाले हे खरे वाटत नाही, असा अभिप्राय व्यक्त केला होता. खऱ्या वाटू नयेत अशा अनेक गोष्टी नानांच्याबद्दल सांगता येतील. आज ते जसे सुखवस्तू दिसतात, त्यावरून त्यांचे आयुष्य ऐषआरामात व चैनीत गेले असावे असे वाटेल. पण वस्तुस्थिती तशी नाही. मॅट्रिक झाल्यावर त्यांच्या कविप्रवृत्तीला महाविद्यालयाच्या वातावरणात पंख फुटू लागले होते पण कल्पनेच्या चंडोलाची भरारी तेव्हा शक्य झाली नाही. कारण आर्थिक परिस्थिती. कवीला मार्क्सवादी सिद्धांताचा अनुभव आला तो असा! एकत्र कुटुंबपद्धतीच्या फायद्यापेक्षा तोटयांचाच अनुभव नानांना आला आणि महाविद्यालयाची छाया सोडून शिक्षकी पेशाचे वाळवंट पत्करावे लागले ते तारुण्याच्या उंबरठयावर. बिनहिशेबी कारभार, आत्मघातकी चैन व भविष्याची काळजी न करता बेजबाबदार वर्तन यांचा वरचष्मा ज्या घराण्यात होतो ते घराणे जीवनातून उठल्याशिवाय राहत नाही. या पायीच नानांना मुंबई व शिक्षण सोडून खानदेशात जावे लागले.

# ना ना

२९ नोव्हेंबर ६७ या दिवशी श्री. गोपीनाथ तळवलकर यांच्या वयाला ६० वर्षे पूर्ण झाली.

गोविंद तळवलकर

परंतु दैव आणि इच्छाशक्ती या दोन्हींच्या जोरावर नाना पुण्यात आले व मग त्यांना त्यांचा आवडता व्यवसाय सापडला, आवडती माणसे लाभली. ऐन तारुण्यात झालेल्या आघातांचे व्रण नानांच्या मनावर असले तरी त्यांचे सार्वजनिक प्रदर्शन त्यांनी कधी केले नाही. काही लोक आपल्या पूर्वायुष्यातील कटू अनुभवांमुळे कडवट बनतात आणि समाजावरच सूड काढू पाहतात. याउलट दुसरे काही बेलगाम जीवन जगून या अनुभवांचा विसर पाडू पाहतात. नानांनी यांपैकी काही केले नाही. याचे कारणच हे की 'मागणे लई नाही' ही त्यांची मुळात वृत्ती आहे. पूर्वीच्या आर्थिक ओढगस्तीची करुण वर्णने करून लोकांना आपल्याबद्दल अनुकंपा वाटावी यांत त्यांना आत्मगौरव वाटत नाही. कारण त्यांचा स्वाभिमान त्यांनी कधी सोडलेला नाही. त्यांनी ज्याप्रमाणे आपल्याबद्दल इतरांनी अनुकंपा

दाखवावी अशी अपेक्षा केली नाही, त्याचप्रमाणे त्यांनी समाजावर आगपाखडही केली नाही. मान सांगावा जनात व अपमान सांगावा मनात असे म्हणतात. परंतु " नाना " अपमान जनात सांगत नाहीत व मानही सांगत नाहीत, कारण जनात काही सांगण्याची, प्रसिद्धीचा प्रकाश आपल्यावर सतत पडत राहावा अशी धडपड ते करीत नाहीत. साहित्यिक मेळाव्यात भाषणे ठोकावी, सहली, परिसंवाद यांत भाग घेऊन वादविवाद करावे याबद्दल नाना बरेच उदासीन आहेत.

त्यांनी आत्तापर्यंत जे मिळविले ते स्वतःच्या बळावर मिळविले. वडिलार्जित इस्टेट त्यांच्यापाशी नव्हती आणि साहित्यिक कंपूगिरी करण्याची त्यांची वृत्ती नाही. याचे तोटे झाले असतील पण नानांना आत्मविकासास वाव मात्र राहिला. हा आत्मविकास त्यांनी शिस्त व स्वातंत्र्य यांचा समतोल साधून केला. महाविद्यालयीन शिक्षणाला मुकावे लागले तरी त्यांनी पुण्यात आल्यावर आपले शालेय मित्र एस. एम. जोशी, आताचे न्यायमूर्ती तारकुंडे, कै. न्यायमूर्ती शिखरे, भय्यासाहेब उमराणी, ना. ग. गोरे यांची संगत पुन्हा जुळविली. आणि या मित्रांच्या सहवासात अनेक उत्तमोत्तम ग्रंथांचा अभ्यास केला. विशेषतः तारकुंडे व शिखरे यांच्या ग्रंथांचा

## साठ शब्दांत

ऑल इंडिया रेडिओमध्ये सर्वप्रथम नानांचे स्वागत मी केले. त्यांचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व, एखाद्या बालकाप्रमाणे असलेला निरागस चेहरा, वागण्यातील साधेपणा आणि सौजन्य यामुळे त्यांनी सर्वांची मने जिंकली. माझे तर ते सच्चे मित्र, थोर तत्त्वज्ञ आणि प्रेमळ मार्गदर्शक झाले. नानांचे ज्ञानभांडार फार मोठे आहे. पण त्या ज्ञानाचा त्यांना गर्व नाही. कोणीही त्यांच्यापर्यंत जाऊ शकतो, याचे कारण त्यांचे सुसंस्कृत मन, जीवनाचा अफाट अनुभव, मानवतेबद्दलचे त्यांचे प्रेम आणि निःस्वार्थी सेवा !

**प्रबोध देसाई**

दिवसाकाठी सहा तास तरी नाना माझे पडोसी असतात. नानांशी गप्पा मारण्याचा आनंद आगळाच--एक एन्सायक्लोपिडियाच. वेचक शब्द; देखणा हावभाव. आपल्या स्मरणशक्तीच्या पोतडीत नानांनी हात घालताच, तो नेमका हव्या त्या संदर्भावर पडतो. याचे मला विलक्षण कुतूहल वाटते. ओवीपासून गझलपर्यंत त्यात सर्व काही असतं. हिन्दीच्या नजाकतीवर नानांचं आशिक होणं हे आम्हा दोन शेजाऱ्यांच्या स्नेहाचं खरं कारण. वाटतंय, नानांचे शेजार जाण्याआधी आपण जागा बदलावी.

**ज्योत्स्ना देवधर**

व ग्रंथप्रेमाचा नानांना मोठा लाभ झाला. इंग्रजी कथा, कादंबऱ्या, चरित्रे, समाजवादावरील ग्रंथ यांचे वाचन होत असतानाच नानांचे अध्यात्मविषयाचे प्रेम कमी झाले नाही, उलट वाढले. आशियाच्या धर्मदीपाचे लेखन यातूनच झाले. माझ्या लहानपणी मी सकाळी स्नानोत्तर नानांच्या तोंडचे गीतापाठ व इतर स्त्रोत्रे आदरयुक्त भावाने ऐकत असे. काव्याबरोबर नानांना संगीताची ओढ होती व म्हणून गाणी ऐकण्यावरच न थांबता ते गोपाळ गायन समाजात जाऊन संगीताचे पाठ घेत. पण नवशिका गायक वा वादक घरच्या व दारच्या लोकांना हैराण करतो तसे नानांनी कधी केले नाही. कारण संगीतातील सौन्दर्याचे ग्रहण करणे एवढाच त्यांचा हेतू असे. म्हणून एखादी चीज गुणगुणताना ते आढळत. सकाळी उठून रियाज करीत नसत.

मानसिक निकोपतेबरोबरच शारीरिक निकोपतेचे महत्त्व माहीत असल्याने नाना बराच काळ नियमित व्यायाम घेत आले आहेत व फिरण्याचा त्यांना कंटाळा नाही. परंतु मानसिक विकास व शारीरिक निकोपता यांसाठी नानांनी कधी डोक्यावर

[ पृष्ठ ५६ वर चालू ]

# नाना

मी वडिलांना ' नाना ' म्हणत असे, त्यानंतर ज्यांना पाहून मनानं ' नाना ऽ ' अशी पुन्हा हाक मारली, ते हेच ' नाना ! '

नानांचं दर्शन गंगेसारखं प्रसन्न, पावन ! त्यांच्या डोळ्यांतून आधी स्नेह पाझरू लागतो आणि पाठोपाठ येणारे ओथंबलेले शब्द झेलण्यासाठी जिवाची ओंजळ होते व भरून धन्यता पावते ! सोनेरी शब्दांना सुगंध लाभतो आणि गंधवेड्या जीवाची भावसमाधी लागते ! सुगंधातून ईश्वरी अंत:सौंदर्याचा साक्षात्कार घडतो ! हलता, डुलता, फुलता सोनचाफा म्हणजेच ' नाना ! '

**मधुकर कुलकर्णी**

गेली चौदा वर्षं मी नानांना पाहतो आहे. आम्हा दोघांत बावीस एक वर्षांचं अंतर आहे. समोरच्या व्यक्तीपेक्षा आपण कुणीतरी मोठे आहोत असं नानांना वाटतच नाही. सौजन्यता–सौहार्द्रता हे नानांचे विशेष ! श्रद्धा, त्याग आणि विवेकाच्या आध्यात्मिक पण वास्तव बैठकीवर नानांचं वास्तव्य ! अहंकाराचा वारा या राजसाच्या जवळपासही फिरकत नाही. सर्वांवर त्यांनी प्रेम केलं आहे. सर्वांमधील चांगुलपणाला मनसोक्त दाद दिली आहे. म्हणूनच चौदा वर्षांपूर्वी प्रथम पाहिलेले नाना आजही तसेच पाहतो आहे.

**पु. य. जोशी**

# विचार वारे

। समीर ।

## अमेरिकन दृष्टीतून भारत

अमेरिकनच काय पण कुठल्याही परकीयाच्या दृष्टीतून भारत आतापर्यंत महाराजांचा व हत्तींचा देश म्हणून ओळखला जात होता. हे चित्र नुकतेच बदलू लागले आहे. पण नवीन चित्र आकार घेत आहे तेही मोठे आकर्षक नाही. हे नवीन चित्र म्हणजे हात पुढे पसरलेल्या भुकेकंगाल माणसाचे आहे. परकीयाला हे चित्र समजणे कठीण जात आहे पण ते पुसून टाकणेही कठीण आहे. 'शिकागो डेलीन्यूज' या अमेरिकन वर्तमानपत्राचे वॉशिंग्टन येथील वार्ताहर पीटर लिसेगर नुकतेच भारतभेट देऊन गेले. त्यांच्या मते परकीय वर्तमानपत्रांतून भारताचे जे भीषण चित्रण करण्यात येत आहे त्याला 'वृत्तव्यवसायातला समर प्रसंग' म्हणता येईल. प्रगतिशील देशातल्या जीवनाच्या गंभीर बाजूबद्दल लिहिताना योग्य दृष्टिकोन ठेवणे आवश्यक असते.

"अमेरिकेचे आता आशियाकडे खूपच लक्ष वेधलेले आहे. व्हिएटनामचे युद्ध, बऱ्याच आशियाई देशांना होणारी अमेरिकेची सढळ मदत इत्यादी गोष्टींमुळे अमेरिकन नागरिकांना भारतासारख्या आशियाई देशाबद्दल अधिकाधिक माहिती करून घेण्याची अधिकाधिक इच्छा होत आहे. अमेरिकन जनतेला भारताबद्दल खूप आस्था वाटते. परंतु अधिक माहिती होण्याची आवश्यकता आहे, व तसा वावही आहे.

भारतात प्रवास करून काय मत झाले ?—भारताला मदत करणे अत्यावश्यक आहे. भारतासारख्या देशाच्या विकासाला मदत केल्यावद्दल अमेरिकेला कधीही पश्चात्ताप वाटता कामा नये. विज्ञान आणि शेती या दोन क्षेत्रांत भारताने केलेली प्रगती 'विलक्षण' आहे. भारताने बैलगाडीच्या युगातून पुरेसे बाहेर पडायच्या आधीच अणु-युगात प्रवेश केला आहे ही गोष्ट विशेष लक्ष वेधून घेते. भारताची कुटुंबनियोजन मोहीम मात्र निराशाजनक आहे. या

मोहिमेचा प्रकार खेडोपाडी व्हायला हवा होता तो झालेला नाही. " गावोगाव जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला दुतर्फा जाहिरातींचे फलक दिसतील अशी माझी अपेक्षा होती, परंतु मैलन् मैल मला काहीच दिसले नाही. "

## ☐ ब्रिटनमध्ये शिक्षणाची नवी दिशा

दिल्लीला नुकत्याच झालेल्या शाकाहारी परिषदेला जे ब्रिटिश प्रतिनिधी आले होते त्यांत ब्रॅडफोर्ड विश्वविद्यालयाचे उपप्रमुख मॅक्‌किन्‌ले हे होते. या तज्ज्ञाकडून ब्रिटनमधील विश्वविद्यालयीन शिक्षण कोठल्या नवीन दिशेने जात आहे याची थोडी कल्पना आली. ऑक्सफोर्ड व केंब्रिज ही 'पारंपरिक' विश्वविद्यालये आहेत, तर ब्रॅडफोर्ड विश्वविद्यालय हे 'मध्ययुगीन पद्धतीने न चालता आधुनिक तंत्र-युगाला साजेल असे शिक्षण देणारे" विश्वविद्यालय आहे, म्हणजे विद्यार्थ्याला " भविष्यकाळासाठी तयार करणे " हे त्याचे ध्येय आहे. प्रसिद्ध 'लॉर्ड रॉबिन्स अहवाला'नंतर गेल्या वर्षी दहा नवीन तांत्रिक विश्वविद्यालये ब्रिटनमध्ये स्थापण्यात आली, त्यांपैकी ब्रॅडफोर्ड हे एक आहे. ही नवीन विश्वविद्यालये ब्रिटनमधील शिक्षणपद्धतीच्या नवीन दिशेचे प्रतीक आहेत. जे विद्यार्थी भविष्यकाळात उद्योगपती म्हणून पुढे येणार आहेत त्यांचा विद्यार्थिदशेतच उद्योग-व्यवसायाशी घनिष्ट संबंध आला पाहिजे या मध्यवर्ती कल्पनेवर ही नवीन विश्वविद्यालये आधारलेली आहेत. ब्रॅडफोर्ड विश्वविद्यालयातील 'सुमारे अर्धा' शिक्षणक्रम अक्षरशः कारखान्यात शिकवला जातो. शिवाय व्यवसाय-संचालन या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

" ब्रिटिश विश्वविद्यालये आतापर्यंत 'पंडितांचे एकांतवास' (academic ivory towers') होते; ही परिस्थिती बदलून राष्ट्राच्या औद्योगिक जीवनाशी त्यांचा घनिष्ट संबंध जोडणे हे या नवीन विश्वविद्यालयांचे उद्दिष्ट आहे. " त्यामुळे ही विश्वविद्यालये आणि निरनिराळे उद्योगधंदे यांच्यांत निकटचे सहकार्य आहे. " सुरूवातीला व्यवसायी मंडळींना या प्रयोगाच्या उपयुक्ततेची शंका होती व ते प्रत्यक्ष शिक्षणासाठी विद्यार्थी स्वीकारायला तितकेसे तयार नव्हते. परंतु आता कारखानदार खूप उत्सुक आहेत व ते विद्यार्थ्याला त्याच्या कामाचा मोबदलाही देतात. शिवाय आता या विद्यार्थ्यांच्या 'खिशात नोकरी' असते: कारण सर्वसाधारण ग्रॅज्युएटला घेऊन त्याला काम येईपर्यंत वाट पाहण्यापेक्षा तांत्रिक शिक्षण घेतलेला विद्यार्थी घेणे ते अधिक पसंत करतात.



जेन अॅशर – मायकेल केन

काही माणसे स्वत:साठीच जगतात. प्रत्येक गोष्टीत त्यांचे सुख, त्यांचे दु:ख, त्यांची इच्छा, त्यांचे अस्तित्व त्यांच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. बाकी सर्व दुय्यम आणि त्यांच्यासाठीच विधात्याने निर्माण केलेले आहे असा त्यांचा पक्का ग्रह असतो.

असा एक केवळ स्वत:चाच आणि स्वत:साठीच असा तरुण पुरुषावतार. नाव आल्फी. तगडा, देखणा–स्त्रियांवर हां हां म्हणता भुरळ घालणारा. आणि भावनेने कुठेही स्वत:ला अडकवून न घेणारा. कोणतीही जबाबदारी, पाश चित्त्याच्या शिताफीने टाळून आयुष्यात पुढे धावणारा.

विजय तेंडुलकर

अनेक स्त्रिया, कुणी पोरसवदा, कुणी प्रौढा, कुणी कुमारिका, कुणी विवाहिता त्याच्या आयुष्यात येतात. सर्वांचा उपभोग तो घेतो. हा उपभोग घेताना काही सुखही

# आल्फी

देतो. तिथेच त्याचे कर्तव्य त्याच्या दृष्टीने संपते. कार्यभाग आटोपून तो पुढे जातो. परंतु ज्या स्त्रिया त्याला भेटतात त्यांच्या आयुष्यात मात्र समस्य निर्माण होऊन बसतात. कुणाला दिवस जातात, कुणाचे मन तिला 'अपराधी' म्हणून छळू लागते, कुणाला आल्फीविषयी एक भावनात्मक ओढ वाटू पाहते तर कुणी आल्फीशी आपले देवाधर्माला साक्ष ठेवून लग्न व्हावे अशी अपेक्षा करते. आल्फी हे सारे मुळीच मनावर घेत नाही. त्याच्या दृष्टीने हे सारे त्याला गुंतवणारे आणि म्हणून नकोसे असते. बिनकाळजाचाच जणू देवाने जन्माला घातला असावा तसा तो हे सारे निर्घृणपणे तोडीत जातो. त्यासाठी बऱ्यावाइटाचा, पापपुण्याचा,

## सतराणी

सभ्यतेचा इतकेच नव्हे तर प्राथमिक माणसकीचाही विचार तो लवमात्र करीत नाही. जबाबदारी आणि गुंतवणूक आहे तिथ आल्फी असणार नाही असा जणू सिद्धांतच त्याने मांडून ठेवला आहे. आणि याउलट जे जे तात्पुरते सुखद आणि फायद्याचे ते ते सारे फार तपशिलात न पडता उपभोगत जाणे हा त्याचा दैनंदिन रिवाज झाला आहे.

आपल्या एका प्रेयसीशी लग्न न करता तो विवाहितेच्या खोट्या नावाने तिला प्रसूत होऊ देतो. आपल्या मुलात रस घेतो पण जबाबदारी येऊ पाहताच मूल आणि प्रेयसी, दोघांनाही दूर ढकलतो. एका रुग्णाईत माणसाच्या एकाकी, झुरत्या, अतृप्त सरळ मार्गी पत्नीला मोहात पाडतो आणि नंतर अडचण निर्माण होताच एका लफंग्या गर्भपात–डॉक्टरकरवी तिला आणि स्वतःला मोकळे करतो. एका पोरीला घरात ठेवून संसारातली नवऱ्याची सर्व सुखे मागतो परंतु तिच्या दृष्टीने त्या संबंधाला विवाहबंधनाचे स्वरूप आल्याचे नुसते भासताच तिला घराबाहेर काढतो. जाता जाता आयुष्यात सभ्यासभ्यतेचा विचार सोडून जनावरासारख शरीरसुख लुटणे हा तर त्याच्या हातचा मळ. नैतिकता आणि संस्कृती या चीजाच आल्फीच्या गावी नाहीत.

आल्फी हा असा आहे तो खलपुरुषाच्या गणिती बुद्धीने नव्हे तर रानटी जनावराच्या उत्स्फूर्त जंगली स्वभावाने.

पण या कमालीच्या आत्मकेंद्रित माणसांचे एक मोठे म्हटले तर वाईट, म्हटले तर उत्तम असते. निसर्ग त्यांनाही विसरत नसतो. वय त्यांनाही लागू असते. शरीर निसर्गक्रमानेच केव्हा तरी वठू लागते, दगा देऊ लागते. वाढत्या वयाने थंडगार काळजातही स्थिर आधाराची अपेक्षा मूळ धरू लागते. कर्तुमकर्तुम् आत्मकेंद्रिततेचे गर्वहरण होऊ लागते. अशा क्षणी काळजातली आणि आयुष्यातली भावनात्मक भयाण पोकळी स्वच्छ दिसते आणि मनस्वी भय या माणसांना झपाटते. आपल्याला भय वाटते आहे, आधार हवा आहे हेही ती तशी मान्य करणार नाहीत आणि जेव्हा अगतिकपणे पण बाह्यत: ताठ्याने एखादा आधार पकडून बघतील तेव्हा जणू त्यांच्या पूर्वायुष्याचा सूड म्हणूनच, या अहंकारी क्षुद्र माणसांना हा आधारच झिडकारील. कारण या माणसांचे एकमेव बळ असा त्यांचा दर्पयुक्त आत्मविश्वास आता पूर्णपणे डळमळलेला असतो आणि हे ती लपवू शकत नाहीत.

या आल्फीचेच काय होते पाहा. चित्रपटाच्या अखेरी स्वत:तल्या भावनात्मक आधाराच्या, स्थैर्याच्या अपेक्षेचा पक्का शोध लागून आणि हा शोध स्वत:शी मान्य करून तो आधार शोधीत पोचतो तो त्याच्या शरीराच्या भुकेल्या असलेल्या एका उतार वयाच्या कामवेड्या एकाकी स्त्रीकडे. ही स्त्री आपला स्वीकार करील याविषयी त्याला यत्किंचितदेखील शंका नसते. आणि पोचल्यावर त्याला आढळते की तिच्या शय्येत दुसराच पुरुष आहे! नाराज आल्फी गुरगुरतो, त्याच्यात असे काय आहे की जे माझ्यात नाही ? ती स्त्री शांतपणे त्याला एकच शब्द ऐकवते : तारुण्य.

आणि आल्फीला प्रकर्षाने नि निखालसपणे जाणवते की ज्या भांडवलावर आपण हक्काने जबाबदाऱ्यांचे पाश नसलेली सुखे बळकावीत जगलो ते भांडवल आता संपुष्टात आले आहे.

आल्फी स्वत:शी मान्य करतो की आपण यानंतर निराधारच जगणार. एकटेच राहणार. आपल्या पूर्वायुष्याचे हे अपरिहार्य फलित आहे. तेही भोगले पाहिजे.

या ' आल्फी ' चित्रपटात आल्फी नावाच्याच या मध्यवर्ती भूमिकेची उकल प्रेक्षकांसाठी दिग्दर्शक-पटकथालेखकाने एका तांत्रिक क्लृप्तीच्या आधारे केली आहे. ही क्लृप्ती जुन्या नाटकांतल्या स्वगतांची. आल्फी आरंभापासून आपणा प्रेक्षकांशी बोलतो. एरवी जे तो त्याच्या सहवासातल्या कुणाशीही बोलणार नाही ते प्रेक्षकांशी विश्वासाने बोलतो. जणू आपण प्रेक्षक म्हणजे त्याचाच आत्मा आहोत. एकेकदा अत्यंत नाजूक, उत्कट घाईच्या क्षणीही तो हे स्वगत बोलणे सोडीत नाही. जणू हे त्याच्या उपभोग-अनुभवाइतकेच त्याची मूलभूत गरज आहे. हा आणखी एक निचरा त्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. याने अनुभव जगणारा आल्फी आणि त्या क्षणीच त्या अनुभवाविषयीचे वा अन्य काही व्यापार मनोमन एका थंडपणे चाल-

वणारा आल्फी यांतली दरी आपण साक्षात अनुभवतो. आल्फी चित्रपटाच्या उत्तरार्धातल्या अनुभवांनी आत–आत कुठे तरी गडबडतो, हलतो, डळमळतो; पुन्हा उभारी धरतो, पुन्हा ताठा घेतो पण शेवटी आपला पाडाव मान्य करण्यासाठीच–या स्थित्यंतरातले एकूण एक गहिरे, भेदक, मजेदार बारकावे दिग्दर्शकाने या तांत्रिक क्लृप्तीच्या आधारे, दृश्य आल्फी, पडद्यावरच्या जगातला आल्फी आणि आपल्यापुढे मनो-व्यापारांचा उत्स्फूर्त निचरा करणारा आल्फी, या तिहेरी विणीच्या हाताळणीने आपल्यापुढे ठेवले आहेत. आरंभी कृत्रिम वाटणारी तांत्रिक क्लृप्ती पुढे आशयाच्या अभिव्यक्तीचा एक अंगभूत भाग होते आणि आपण केवळ प्रेक्षक न राहता एक प्रकारे आल्फीचे मनोव्यापार जगतो.

हे तांत्रिक वेगळेपण या चित्रपटाचे बल ठरले आहे ते यामुळेच.

मायकेल केन या व्यक्तित्वसंपन्न नटाने आल्फीचे अनेकांगी चपल व्यक्तिमत्त्व आत्मीयतेने आणि अभिनयसामर्थ्याने वठविले आहे. इतर भूमिकांना आल्फीइतके महत्त्व नाही पण तरीही त्यांची पात्रयोजना निर्दोष आहे. चारित्र्यहीन आल्फीच्या अनधिकृत जनानखान्यातला प्रत्येक नमुना वैशिष्टयपूर्ण आणि जिवंत वठला आहे. दिग्दर्शकाची तांत्रिक नजर स्त्रीच्या बाह्यसौन्दर्यापेक्षा तिच्या आंतरिक मनोव्यापारावर केंद्रित झाली आहे. लैंगिक जीवन हे तसे या चित्रपटाचे महत्त्वाचेच अंग आहे. आपल्याकडे दाखविली जाते ती या चित्रपटाची 'रिव्हाइजड' म्हणजे येथल्या सेन्सॉर बोर्डाच्या सूचनांबरहुकूम तयार केलेली काहीशी 'मवाळ' आवृत्ती आहे. तरीही लैंगिक व्यवहारांचे तिच्यातील चित्रण खूप धिटाईचे आहे; आणि तरी ते सस्ते नाही. चित्रपटाच्या भरभक्कम कथावस्तूचे दिग्दर्शकाचे भान क्वचितही ढळत नाही. आल्फीचे नैतिक–मूल्यहीन जीवन दाखविताना किंवा त्याच जातीचे तत्त्वज्ञान ऐकविताना दिग्दर्शक आपली स्वतःची नैतिक भूमिका सोडीत नाही. याने 'आल्फी' हा एक लैंगिक चित्रपट झाला आहे पण तो यत्किंचितदेखील हीन अभिरुचीचा नाही. अनैतिकतेविषयी तो आहे पण अनैतिक नाही.

प्रत्येक चांगल्या चित्रपटाचा आरंभीचा आणि अखेरचा क्षण अत्यंत अर्थपूर्ण आणि मार्मिक असतो. 'आल्फी' त आरंभी दृश्य दिसते ते एका ओल्या रात्री आड जागी मोटारीत आल्फीच्या रंगलेल्या रोमान्सचे. प्रत्यक्ष काहीच न दाखवता मोटारीच्या धूसर काचांवरच्या अस्पष्ट सावल्या आणि संभाषणातले तुकडे यांनी हा प्रसंग आपल्यासमोर उभा राहत असता काळोखात एक मूळचे चांगल्या अवलादीचे पण भुरटे कुत्रे आपल्याला दिसते. एका कुत्रीसोबत त्याचेही एक दृश्य दाखवण्यात येते. मोटारीतल्या आल्फीच्या जंगली उद्गाराने घाबरून ते लांब काळोखात पळत जाते. चित्रपटाच्या शेवटी सर्वांना सोडलेला आणि सर्वांनी सोडलेला आल्फी एकटाच पहाटे वाट फुटेल तसा निघाला आहे आणि त्याच्यासमोर धूसर उजेडात कोण येते ? तेच कुत्रे. आता ते कुत्रे आल्फीच्या खूप जवळ येते. आल्फी त्याला आत्मीयतेने

कुरवाळतो आणि एकमेकांच्या सोबतीने दोघे बरोबरच कुठे तरी जात राहतात—ते कुत्रे आणि आल्फी.

हा चित्रपट इथेच संपतो.

मला सांगा, याहून बोलका शेवट या चित्रपटाला कोणता असू शकत होता ?

शृंगार, लैंगिकता इंग्रजी चित्रपटांना मुळीच नवीन नाही. परंतु एरवी इंग्रजी चित्रपटांतून दिसणारे तिचे चित्रण रंजक, देखणे, गुदगुल्या करणारे किंवा उद्दीपित करणारे असते. 'आल्फी' त या चित्रणाला एक रोखठोकपणा आणि दाहकता आहे. म्हणूनच खऱ्याखुऱ्या अर्थाने प्रौढ प्रेक्षकांनी 'आल्फी' पाहण्यासारखा आहे □

# दोन कलावंत
# दोन बैठका



कुमार गंधर्व

छाया : राजदत्त

कलावंत कुणाच्या हुकमाने कलानिर्मिती करतो ?

मागे त्याला राजाश्रय असे, राजाज्ञेसाठी थोडीशी कला अंगी असलेले लाचार आश्रित काहीही करीत. अष्टवक्र राजाचे प्रति-मदनच असे चित्र काढीत. काव्यातून राजाची सुंदर सुंदर शब्दांत स्तुती करीत. मधुर गायनाने राजाला झोपेतून जागे करीत. नृत्याने त्याच्या श्रृंगाराला रुची आणीत. पण जातीचे कलावंत हे करण्याचे नाकारीत आणि बदल्यात मिळेल ती शिक्षा भोगीत. प्रसंगी राजाचा त्यांना आश्रय असे. ते राजाचे आश्रित असत परंतु त्यांची कला मुक्त असे. ती कुणाचीही बटीक होत नसे, नंतर आता राजाश्रय जाऊन लोकाश्रय आला. कलेचे माफक दैवी देणे अंगी असलेल्या लाचारांची रीत बदललेली नाही. ते अद्यापही अन्नदात्यांचे हुकमेहुकूम रंजन करतातच. चित्रकलेत, संगीतात, साहित्यात, काव्यात, नृत्यात या हुकमेहुकूम कलेचे लहानमोठे नमुने प्रत्यही आढळतील. तिकिटे काढून आले आहेत; त्यांना खूष केले पाहिजे हीच कलेतली सवंग निष्ठा झाली आहे. परंतु आजचा हाडाचा कलावंत

लोकप्रिय झाला तरीही लोकांचा गुलाम नाही. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पंडित रविशंकर यांच्या जाहीर मैफलींना तुम्ही किती वेळा गेला आहात? हा प्रतिभाशाली सतारिया मफलीत जुगलबंदीसारखे स्टंट करण्यातच अधिक गुंततो. समोरच्या गंगा-जमनी श्रोत्यांना या आक्रमक आणि चमत्कृतिपूर्ण वादनाने खूष करतो. परंतु असेच एकदा चुकून आपल्या एका परदेशी शिष्येच्या मकाणी, भल्या सकाळी या महाराजांना एकटेच सतारवादनात रंगलेले मी ऐकले आणि रविशंकरांच्या कलासामर्थ्याची, उंचीची, प्रतिभेच्या झेपेची खरी नि पूर्ण कल्पना मला आली. तिथे कुणाशी लयीचा झगडा नव्हता, सुरांची स्पर्धा नव्हती, ज्यांना खूष करण्याची जबाबदारी वाटावी असे तज्ज्ञ, अर्धवट तज्ज्ञ आणि अनभिज्ञ प्रेक्षक समोर नव्हते. बिदागीचा सवाल नव्हता. केवळ आपल्यासाठी आपणच सूर छेडायचे, त्यात स्वतःच रंगायचे आणि आणखी सूर छेडायचे, हा अगदी लहरी आणि वेडा उद्योग चालू होता. रविशंकरांच्या बोटांतली अद्‌भुत जादू काम करीत होती. काळजाशी बोटांचे एक छान वाहते नाते जमून राहिले होते. सारे व्यक्तिमत्त्व एरवीच्या दिखाऊ देखणेपणाने नव्हे तर साक्षात स्वर-मय झाले होते. खोलीत कुणी आल्याचेही भान रविशंकरांना नव्हते. फिकीरदेखील नव्हती. एरवी लोकांच्या गळ्यातला ताईत असलेला हा महागडा कलावंत पैच्याही अपेक्षेशिवाय, एकही श्रोता खिजगणतीत न धरता हेतुहीन, निरुद्देशपणे सतारीवर उत्स्फूर्तपणे गती छेडीत होता. ना एक राग, ना एक चीज; सूर नेतील तिकडे जायचे हाच परवल.

कधी सुमारे तास गेला आणि कधी त्या खोलीची मालकीण खोलीवर आली ते कळलेच नाही. स्वरसृष्टीतला हा योगी पुन्हा मग कधी मी जाहीर सार्वजनिक बैठकीत लोकाश्रय घेत आणि स्वरांच्या नि लयींच्या हुशार कोलांटचा, सुरकांड्या मारीत हातघाई करताना ऐकलेला नाही. मी मुळी ते टाळलेच आहे.

कलावंत एकच; अस्सल; पण लोकाश्रयाची मागणी आणि मनाची लहर या दोन रूपांत केवढा वेगळा! एकीकडे हुकमी हिकमत्या, दुसरीकडे अव्वल कलेचा एकाच वेळी स्वामी आणि गुलाम, एकीकडे केवळ युयुत्सू, दुसरीकडे सुरांची नवीं नवी क्षितिजे धुंडीत बेगुमान निघालेला अंतर्मुख संशोधक. हे झाले रविशंकरांचे.

कुमार गंधर्व हे आजचे असेच दुसरे अव्वल आणि लोकप्रिय देखील कलावंत. यांच्या गायनाचा एक जाहीर कार्यक्रम मध्यंतरी मुंबईतील साहित्य संघ मंदिरात होता. भारी तिकिटे काढून अहमहमिकेने सर्वसामान्य संगीतवेडे आणि कुमारांचे भक्त या कार्यक्रमाला आले. कुमार मनापासून गायले, हातखंडा गायले, अंगभूत सामर्थ्याने गायले पण त्यांचा 'दिल्' त्यात का कोण जाणे, पण नव्हता– कार्यक्रम अगदीच बिनसला नाही पण त्याला मजाही आला नाही. न कुरकुरता पण तृप्तही न होता श्रोते घरोघर गेले. कुणी आपुलकीने म्हणाले, त्या अमूक रागात कुमारांनी बहार केली. कुणी म्हणाले, ती तमूक जागा कुमारांनी अप्रतीम घेतली. वा! केवळ

तेवढ्या जागेसाठीच तिकिटाचे पैसे कारणी लागले असे आपण समजू.

आणि दुसऱ्याच दिवशी संध्याकाळी वामनराव देशपांडे यांच्या घरच्या विवाह-निमित्ताने अनौपचारिक बैठकीत कुमार गंधर्व पुन्हा गायले. तेच साथीदार, तेच कुमार गंधर्व, काही श्रोतेदेखील तेच, आदल्या दिवशीचेच. जागा वेगळी. निमित्त वेगळे बिदागीसाठी गायन नव्हे, विशुद्ध स्नेहापोटी, आदरापोटी नि जिव्हाळ्यापोटी गायन. 'घर'चे गायन. सिड्नहॅम कॉलेजच्या दुसऱ्या मजल्यावरच्या सभागृहात त्या अनौपचारिक, कौटुंबिक स्वरूपाच्या बैठकीला असा काही रंग भरला म्हणतात, असे गायन तर खुद्द कुमारांच्या मुखातूनही कित्येक वर्षांत कोणी ऐकले नसेल! मारव्यापासून निघालेला हा सूरब्रह्माचा मनस्वी उपासक, मारव्यातून 'श्री' रागात उतरला, तिथून 'मालव-बिहाग'च्या घनदाट उंचीवर पोचून जरा विसावला. आणि पुन्हा भरपूर विश्रांतीनिशी बैठकीच्या उत्तरार्धाचा आरंभ करून तबियतीने टप्पा-दादऱ्याच्या क्रीडा करीत भैरवी आळवून त्या बैठकीपुरता ओसरला.

त्या दिवशी कुमार गंधर्वांनी आळवलेला 'मारवा' एरवीच्या मारव्यासारखा बेचैन नव्हता, तर प्रसन्न आणि खोल होता. आणि त्याने आळवलेली भैरवी, भैरवीसारखी शांत, आल्हाददायक नव्हती तर उन्मादक चैतन्याने चौफेर दरवळणारी होती. टप्पा-दादऱ्याचा शिगोशिग नखरेल असा ढंग कुठे आणि मीरा-कबीराचा रांगडा, गळाभर भक्तिरस कुठे! पण कुमारांच्या गळ्यात ही दोन्ही परस्पर-भिन्न विश्वे जणू एकमेकात विरघळून राहिलेली. अवखळ, नखरेबाज, ठसकेबाज टप्पा-दादऱ्यालाही त्या दिवशी त्यांनी प्रीतीतल्या व्याकुळ भक्तीची पदरची बेहतरीन नजाकत देऊन बहार केली. स्वरास्वराने त्या दिवशी या असामान्य गायकाच्या कलेची पाकळी नि पाकळी कशी तुस्त फुलली. कोन्याकोपऱ्यातलेही श्रोते बैठक जणू आमच्यासाठीच झाल्यासारखे वेडेखुळे झाले; आम्हीच कशाला, खुद्द कुमार गंधर्व बेहोषीने गायले. साथीदारांनी धुंदीने साथ केली. 'वहाव्वा', 'ये बात', 'ओहोहो'च्या उत्स्फूर्त उद्गारांचा नुसता सडा पडला. जे आदल्या दिवशी मोल देऊन कितीकांना लाभले नाही ते त्या दिवशी विनामूल्य आणि वर्षानुवर्षे स्मृतीत राहील अशा उदंडपणे न मागताच पदरी पडले.

लोकाश्रयापुढे कुमार गंधर्व इमानाने गायले; पण स्वत:च्या तबियतीने फुलून फुलून गायले ते रसिकांच्या एका अनौपचारिक मेळाव्यात!

अस्सल कलावंत हा शेवटी झाडावरच्या फुलासारखाच राहणार. त्याला फुलण्याला कितीही मोलाने, अधिकाराने, हिकमतीने सांगितलेत तरी तो फुलणार म्हणून नाही. तो फुलेल पहिल्या सूर्यकिरणांनी नाहीतर सांज-वाऱ्याने आणि कधी कधी दुपारच्या रणरणत्या रखरखीत उन्हातदेखील–गर्दीची इतकेच नव्हे तर रसिकाचीही अपेक्षा न ठेवता. म्हणून तर कलेची अपूर्वाई आहे. ○

# राज्यपालांचे स्थान आणि अधिकार

वा. दा. रानडे

पश्चिम बंगाल व हरियानातील बिगर काँग्रेस मंत्रिमंडळे ज्या पद्धतीने बडतर्फ करण्यात आली त्यामुळे आपल्या घटनेतील राज्यपालांचे स्थान व अधिकारांचा प्रश्न उपस्थित झाला आहे. गेले काही दिवस या विषयावर बरीच उलटसुलट चर्चा झाली असून अनेक कायदेपंडितांनी निरनिराळी मते व्यक्त केली आहेत. आपल्या लोकशाहीच्या भवितव्याच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून शुद्ध लोकशाही भूमिकेवरून काही विचार येथे मांडण्याचा प्रयत्न मी करीत आहे.

घटनेत राज्यपालांना असलेल्या अधिकारांचा विचार करण्यापूर्वी एक मूलभूत प्रश्न मला उपस्थित करावयाचा आहे. तो म्हणजे घटना श्रेष्ठ की लोकशाही श्रेष्ठ ? काहींना हा प्रश्न निरर्थक वाटेल. आपली घटना लोकशाही तत्त्वांवर अधिष्ठित असल्याने हा प्रश्नच उपस्थित होत नाही असे ते म्हणतील. आपली घटना सर्वसाधारणपणे लोकशाही तत्त्वांवर अधिष्ठित आहे हे खरे. तरीही लोकशाहीच्या दृष्टीने त्यात काही उणीवा राहिलेल्या आहेत. या उणीवांमुळेच राज्यपालांच्या अधिकारासारखे प्रश्न उपस्थित होतात. त्यांचा विचार घटनेतील कलमांच्या काटेकोर चौकटीत न करता लोकशाही तत्त्वांच्या दृष्टीनेच केला पाहिजे. आणि घटनेतील कलमे सदोष असल्याचे आढळले तर त्यात योग्य ती दुरुस्ती केली पाहिजे. घटनेपेक्षा लोकशाही श्रेष्ठ असे मी म्हणतो ते याच दृष्टीने.

## राज्यपाल लोकनियुक्त असावा का ?

आपली घटना संघराज्य स्वरूपाची आहे पण ती तयार करताना घटनाकारांनी अमेरिकन संघराज्याचा नमुना पुढे न ठेवता कॅनडा, ऑस्ट्रेलिया वगैरे ब्रिटिश संघराज्यांचाच आदर्श पुढे ठेवल्याचे दिसून येते. राज्यपालांचे स्थान व अधिकारांच्या बाबतीत असेच घडलेले आहे. आपल्या घटनेनुसार.राज्यपालांची नेमणूक राष्ट्रपती करतात तर अमेरिकन घटनेत राज्यपाल लोकनियुक्त असतो. आदर्श लोकशाहीच्या दृष्टीने आपल्याकडेही राज्यपाल लोकनियुक्त असणेच अधिक योग्य झाले असते. राज्यांची घटना तयार करण्यासाठी घटनासमितीने नेमलेल्या समितीने अशीच शिफारस प्रथम केली होती. पण घटना समितीत नंतर झालेल्या चर्चेत तिला फारस पाठिंबा मिळाला नाही. राज्यपाल मुख्यत: घटनात्मक प्रमुख आहे. खरी सत्ता मुख्य-मंत्री व मंत्रिमंडळाकडे असून ते लोकनियुक्त आहेत. तेव्हा राज्यपाल लोकनियुक्त असण्याची आवश्यकता नाही. मुख्यमंत्री आणि राज्यपाल ही दोन्ही पदे लोकनियुक्त ठेवली आणि त्यांच्यात मतभेद निर्माण झाले तर त्यातून संघर्ष व पेचप्रसंग निर्माण होतील. महत्त्वाच्या प्रश्नांवर नि:पक्षपाती भूमिकेवरून निर्णय घेतला जाण्याचे दृष्टीने राज्यपाल राज्याबाहेरचा असणे चांगले. हे नेमणुकीनेच साध्य होईल. राज्य-पाल नेमलेला असावा या बाजूने अशा प्रकारचा युक्तिवाद त्या वेळी घटनासमितीत करण्यात आला.

## केरळ मंत्रिमंडळ बडतर्फ

घटनेतील ही तरतूद लोकशाहीच्या दृष्टीने कितपत उपयुक्त ठरली ? गेल्या सतरा वर्षांचा अनुभव काय सांगतो ? राज्यपालांच्या नेमणुका करताना मुख्यत: अधिकारारूढ कॉंग्रेस पक्षातल्याच व्यक्ती त्या जागी नेमण्यात आल्या. निवडणुकीत पराभूत झालेल्या अनेक कॉंग्रेस नेत्यांना राज्यपाल करण्यात आले. यावर फारच टीका झाली तेव्हा ही पद्धत बदलून काही सनदी अधिकाऱ्यांना राज्यपाल नेमण्यात आले पण हे सनदी अधिकारी अनेक वर्षे सरकारी नोकरीच्या चाकोरीतून गेले असल्याने स्वतंत्रपणा न दाखवता, केंद्रीय कॉंग्रेस सरकारच्या तंत्रानेच चालणार हे उघड होते. केंद्रात व राज्यात कॉंग्रेस पक्षाकडेच सत्ता होती तोपर्यंत संघर्षाचा प्रश्नच उपस्थित झाला नाही. पण १९५७ च्या निवडणुकीत केरळमध्ये कम्युनिस्ट सरकार अधिकारावर आले तेव्हा केंद्रीय कॉंग्रेस सरकार आणि केरळचे कम्युनिस्ट सरकार यांच्यात संघर्ष निर्माण झाले. कम्युनिस्ट सरकार सत्ताभ्रष्ट करण्यासाठी केंद्रीय कॉंग्रेस नेत्यांच्या प्रोत्साहनाने केरळमधील कॉंग्रेस नेत्यांनी प्रजासमाजवादी व मुस्लीम लीग यांच्या सहकार्याने आंदोलन उभारले. आणि राज्यात शांतता व सुव्यवस्था राहिलेली नाही, हे निमित्त पुढे करून कम्युनिस्ट सरकार बडतर्फ करण्यात आले व केरळवर राष्ट्रपतींची राजवट लादण्यात आली. राज्यपालांनी सादर केलेल्या अहवालानुसार हा निर्णय घेण्यात आला. राजाजी, सी. डी. देशमुख,

काकासाहेब गाडगीळ, यांसारख्या विचारवंतांनी लोकशाहीविरोधी निर्णयाबद्दल त्यावेळी स्पष्ट नापसंती व्यक्त केली होती. केंद्रीय काँग्रेस सरकारला नको असलेले बिगर काँग्रेस सरकार खाली ओढण्यासाठी राज्यपालांच्या अधिकारांचा कसा दुरुपयोग करण्यात येतो हे या घटनेने प्रकर्षाने दिसून आले.

केरळसारखीच कारणे दाखवून पश्चिम बंगालमधील अजय मुकर्जी मंत्रिमंडळ बडतर्फ करण्यात आले आहे, पण दोन्ही ठिकाणच्या घटनांत एक महत्त्वाचा फरक आहे. केरळचे कम्युनिस्ट मंत्रिमंडळ राष्ट्रपतींनी बडतर्फ करून तेथे राष्ट्रपतींची राजवट आणली होती. पश्चिम बंगालच्या राज्यपालांनी मुकर्जी मंत्रिमंडळ बडतर्फ केले पण राष्ट्रपतींची राजवट न आणता डॉ. पी. सी. घोष यांच्या नेतृत्वाखाली दुसरे मंत्रिमंडळ स्थापन केले. घटनेच्या काटेकोर भाषेत राज्यपालांची मर्जी असेपर्यंत मंत्रिमंडळ अधिकारावर राहू शकते. पण याचा अर्थ असा नाही की, राज्यपालांना केव्हाही आपल्या लहरीनुसार लोकनियुक्त मंत्रिमंडळ बडतर्फ करता येते. मंत्रिमंडळ केव्हा बडतर्फ करावयाचे, याचे काही लोकशाही संकेत आहेत. विधानसभेतील बहुमताचा विश्वास मंत्रिमंडळावर राहिला नसेल तर मंत्रिमंडळाने राजीनामा दिला पाहिजे. त्याने राजीनामा देण्याचे नाकारल्यास राज्यपालांना ते बडतर्फ करता येते. मंत्रिमंडळाने विधानसभेचा विश्वास गमावला आहे की नाही हे ठरविण्याचा अधिकार विधानसभेलाच आहे. मंत्रिमंडळास बहुमताचा पाठिंबा राहिलेला नाही अशी राज्यपालांची खात्री झाली असली तरी विधानसभेने तसे निर्णायक मत व्यक्त केल्याशिवाय राज्यपालांना मंत्रिमंडळ बडतर्फ करता येत नाही व त्या जागी दुसरे मंत्रिमंडळ नेमता येत नाही. राज्यपालांनी तसे करणे म्हणजे विधानसभेच्या अधिकारांवर अतिक्रमण करणे होय. विधानसभेचे हक्क व अधिकार यांची जपणूक करणे सभापतींचे कर्तव्य आहे. राज्यपालाच्या कृतीने, निर्णयाने या अधिकारांवर आक्रमण होत असेल तर त्या कृतीविरुद्ध मत व्यक्त करण्याचा व विधानसभेच्या हक्कांची जपणूक करण्यासाठी विधानसभा बेमुदत तहकूब करण्याचा अधिकार सभापतींना निश्चित आहे व असला पाहिजे. पश्चिम बंगाल विधानसभेचे सभापती श्री. विजयकुमार बानर्जी यांनी आपले कर्तव्य बजावण्यात जो बाणेदारपणा दाखविला त्याबद्दल सर्व लोकशाहीवाद्यांनी त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

## प्रतिष्ठेचा प्रश्न केला

विधानसभेची बैठक केव्हा बोलवावयाची यावर मुख्यमंत्री अजय मुकर्जी आणि राज्यपाल धर्मवीर यांच्यांत मतभेद झाले. बैठक १८ डिसेंबरला बोलवावी असा सल्ला मुकर्जींनी दिला होता तर पक्षबळ अजमावण्यासाठी ती लौकर बोलवावी असा राज्यपालांचा आग्रह होता. आपण माघार घेतली तर दुसऱ्यापुढे मान तुकविण्यासारखे होईल असे वाटून दोघांनीही हा प्रतिष्ठेचा प्रश्न केला. विधानसभेची बैठक लौकर बोलवावी या राज्यपालांच्या दुसऱ्या पत्राचा विचार करण्यासाठी

मुकर्जींनी मंत्रिमंडळाची बैठक बोलावली होती. कदाचित या बैठकीत १८ डिसेंबरची तारीख अलीकडे आणली गेलीही असती पण ती बैठक होण्यापूर्वीच राज्यपालांनी मुकर्जी मंत्रिमंडळ बडतर्फ केले. एकंदर घटनांचा विचार करता राज्यपालांनी या बाबतीत घाई केली असेच सर्व लोकशाहीवाद्यांना वाटेल. राज्यपाल १८ डिसेंबर-पर्यंत थांबले असते तर असे काय आकाश कोसळणार होते ? आणि तितकीच परिस्थिती बिघडली असती तर राज्यपाल तातडीने मंत्रिमंडळ बडतर्फ करून राष्ट्रपतींची राजवट आणू शकत होतेच.

पण राज्यपालांनी ज्या घाईने डॉ. घोष यांचे मंत्रिमंडळ नेमले त्यावरून राष्ट्रपतींची राजवट त्यांना आणावयाची नव्हती हे स्पष्ट दिसते. आपली गेलेली सत्ता पुन्हा मिळविण्यासाठी काँग्रेस नेत्यांच्या हालचाली संयुक्त आघाडीचे मंत्रिमंडळ स्थापन झाल्यापासूनच सुरू झाल्या होत्या. नक्षलबाडीतील अतिरेकी कम्युनिस्टांच्या बंडाचा फायदा घेऊन आघाडीचे मंत्रिमंडळ खाली आणण्याचा प्रयत्न काँग्रेस नेत्यांनी केला पण या बंडाचा मोड करण्यासाठी मुकर्जी मंत्रिमंडळानेच पोलिस कारवाई सुरू केल्याने हा डाव फसला. त्यानंतर मुकर्जींना आपल्या बाजूला फितवायचे व त्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या पाठिंब्याने बिगर कम्युनिस्ट मंत्रिमंडळ स्थापन करावयाचे असा घाट काँग्रेसने घातला पण त्यातही यश आले नाही. हा प्रयत्न फसला तरी आघाडीतून डॉ. पी. सी. घोष यांच्या नेतृत्वाखालील सतरा सभासदांचा गट फोडण्यात मात्र काँग्रेस नेत्यांना यश आले. डॉ. घोष यांनी मंत्रिमंडळ बनविल्यास त्यास आमचा पाठिंबा राहील, असे काँग्रेस पक्षाने जाहीर केले. प्रथम अल्पसंख्य पक्षाला आपल्या पाठिंब्याने मंत्रिमंडळ बनवू द्यावयाचे. नंतर त्या पक्षात किंवा गटात फूट पाडून त्यांचे सभासद आपल्या बाजूला वळवायचे आणि कालांतराने केवळ काँग्रेसचे मंत्रिमंडळ स्थापावयाचे हा डाव केरळमध्ये काँग्रेस दोन वेळा खेळली होती आणि आता पश्चिम बंगालमध्ये पुन्हा तोच डाव खेळण्याचे पवित्रे काँग्रेसने टाकले आहेत. विधानसभेत पक्षबळ अजमावले जाण्यापूर्वीच घोष मंत्रिमंडळ स्थापन करून राज्यपालांनी काँग्रेसच्या या डावाला हातभार लावला आहे. राज्यपाल लोकनियुक्त असता तर पश्चिम बंगालमध्ये लोकशाहीची अशी पायमल्ली निश्चितच झाली नसती.

## हरियानात लोकशाहीचे विडंबन

हरियानातील घटनांची पार्श्वभूमी पश्चिम बंगालपेक्षा निराळी आहे. चौथ्या निवडणुकीनंतर प्रथम तेथे भगवत दयाल शर्मा यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस मंत्रिमंडळ स्थापन झाले होते पण तेरा सभासदांचा गट फुटल्याने हे मंत्रिमंडळ गडगडले व राव बीरेंद्रसिंग यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त दलाचे मंत्रिमंडळ अधिकारावर आले. पण सुरुवातीपासून त्याचेही आसन डळमळीत होते. मंत्रिपदाचे आमिष देऊन सभासदांना फोडण्याचे प्रयत्न काँग्रेसने चालूच ठेवले होते त्यावर मात करण्यासाठी

फुटू पाहणाऱ्या किंवा आपणास मिळू पाहणाऱ्या सभासदांना मंत्री बनविण्याचे तंत्र राव बीरेंद्रसिंग यांनी अवलंबले. विधानसभेतील आमदारांची एकूण संख्या ८१. त्यापैकी दोन जागा रिकाम्या राहिलेल्या. ७९ पैकी छत्तीस सभासदांनी पक्षांतर केले. या पैकी चारजणांनी चार वेळा पक्ष बदलला. विधानसभेत राव बीरेंद्रसिंग यांच्या पक्षाचे नाममात्र बहुमत होते ही गोष्ट राज्यपाल अमान्य करीत नाहीत. हे मंत्रि-मंडळ टिकलेही असते पण त्याचा सारा वेळ आपले बहुमत टिकविण्यासाठी करा-वयाच्या कारवायांतच खर्च होई. लोकशाहीची ही थट्टा व विडंबन किती दिवस चालू ठेवावयाचे ? राष्ट्रपतींची राजवट आणून फेरनिवडणुका घेतल्यानेच ही घाण दूर होण्याचा संभव होता अशा निष्कर्षाला राज्यपाल आले व त्यांनी तो निर्णय घेण्याचा बाणेदारपणा दाखवून लोकशाहीची सेवा केली, यात शंका नाही. पण हरियानात काँग्रेसेत्तर मंत्रिमंडळाऐवजी काँग्रेसचे मंत्रिमंडळ असते आणि सत्ता टिकविण्यासाठी त्याने अशाच तंत्राचा अवलंब केला असता तर ते मंत्रिमंडळ राज्य-पालांनी बडतर्फ केले असते का, हा प्रश्न मनात आल्याशिवाय राहत नाही. निर-निराळ्या गटांना खूष राखण्यासाठी त्यांना मंत्रिपदे देऊन मंत्र्यांची संख्या भरम-साट वाढविण्याची प्रथा प्रथम काँग्रेसनेच पाडली. पण इतर पक्ष तेच करतात तेव्हा त्यांची काँग्रेसवरची टीका निरर्थक ठरते.

## राज्यपालांचे अधिकार

राज्यपालांनी एखादा अन्याय्य निर्णय घेतला तर त्याविरुद्ध मंत्रिमंडळ काहीही करू शकत नाही. घटनेत त्यासंबंधी काहीही तरतूद नाही. राज्यपालांच्या निर्णया-विरुद्ध कोर्टात दाद मागण्यासही घटनेने बंदी केली आहे. राज्यपालांनी स्वतःच्या निर्णयबुद्धीने (in his discretion) करावयाच्या कामांशिवाय इतर बाबतीत मंत्रिमंडळ त्यांना मदत करील व सल्ला देईल असे घटनेच्या १६३ (१) कलमात म्हटले आहे. एखादी बाब राज्यपालांची स्वतःच्या निर्णयबुद्धीने करावयाच्या कामा-मध्ये येते की नाही असा प्रश्न उपस्थित झाला तर त्या बाबतीत राज्यपालांचा निर्णयच अखेरचा मानण्यात येईल असे याच कलमाच्या पोटकलम दोन मध्ये म्हटले आहे. राज्यपालाने स्वतःच्या निर्णयबुद्धीने करावयाची कामे कोणती हे घट-नेत नमूद केले आहे. त्यात आसाममधील वन्य जमातींच्या भागाचा कारभार आणि एखाद्या केंद्रप्रदेशाचा प्रशासक म्हणून राष्ट्रपतींनी राज्यपालाची नेमणूक केली असल्यास त्या अधिकारात करावयाची कामे एवढ्यांचाच उल्लेख घटनेत आहे. पण घटनेत उल्लेख नाही असे आणखी काही विषय राज्यपालांच्या स्वतंत्र निर्णयबुद्धीच्या क्षेत्रात येतात. घटनेच्या ३५६ व्या कलमाप्रमाणे राज्यपालाने राष्ट्रपतींना अहवाल सादर करावयाचा असतो. हा अहवाल मंत्रिमंडळाविरुद्ध असेल तर तो मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने पाठविता येणार नाही हे उघड आहे. केंद्रसरकारने राज्यसरकारांना काही

आदेश दिलेले असतात. हे आदेश किंवा सूचना पाळल्या नाहीत तर मंत्रिमंडळ अधिकारावरून दूर करता येते. तेव्हा यासंबंधीचा अहवालही मंत्रिमंडळाचा सल्ला न घेता स्वतःच्या निर्णयबुद्धीने राज्यपालांना पाठवावा लागतो. एखादे बिल राष्ट्रपतीकडे विचारासाठी पाठवायचे असेल तर त्या बाबतीतही राज्यपालांनाही स्वतःच्या निर्णयबुद्धीने वागावे लागेल. बाकी सर्व बाबतींत याच राज्यपालांनी मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार वागले पाहिजे अशी घटनेत तरतूद आहे.

## कोर्टात दादही मागण्यास बंदी

राज्यपालांच्या चुकीच्या किंवा अन्याय्य निर्णयाविरुद्ध दाद मागता येत नाही ही लोकशाहीच्या दृष्टीने फार मोठी उणीव आपल्या घटनेत आहे. घटनेच्या कलम १५६ प्रमाणे राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत राज्यपाल अधिकारावर राहतो. राष्ट्रपतींनी केंद्र सरकारच्या सल्ल्याने त्याची नेमणूक केलेली असते व केंद्र सरकारचे धोरणच तो अमलात आणीत असल्याने राष्ट्रपतींनी त्यास काढून टाकण्याची वेळच येत नाही. अमेरिकन घटनेत विधिमंडळातर्फे राज्यपालाची चौकशी होऊन त्याला काढून टाकता येते. आपल्याकडे घटनाभंगाबद्दल संसदेमार्फत राष्ट्रपतींची चौकशी करण्याची तरतूद आहे पण राज्यपालांच्या बाबतीत अशी तरतूद नाही. राज्यपालांनी आपल्या अधिकारांचा गैरवापर हुकुमशाही पद्धतीने करू नये यासाठी निदान त्यांच्या अन्याय्य निर्णयाविरुद्ध सुप्रीम कोर्टात दाद मागण्याची तरी तरतूद घटनेत हवी. राज्यपालांचे अधिकार काय आहेत हे एकदा सुप्रीम कोर्टाकडून निश्चित करून घ्यावे ही पश्चिम बंगाल मंत्रिमंडळाची साधी विनंतीसुद्धा राष्ट्रपतींनी अमान्य केली. सरकारला तशी आवश्यकता वाटत नाही हे राष्ट्रपतींचे उत्तर, सरकारच्या कायदेसल्लागारांनी दिलेला सल्ला हा काही न्यायाधीशाचा निर्णय नव्हे, त्यासाठी सुप्रीम कोर्टासारख्या सर्वोच्च न्यायपीठाचाच निवाडा घेतला पाहिजे, तसे करण्याचे नाकारणे हा लोकशाही तत्त्वांचा अधिक्षेप आहे.

एखाद्या बिलास मान्यता देण्यासाठी राज्यपालांनी किती वेळ लावावा यासंबंधी कोणतीही मुदत आपल्या घटनेत नाही. कॅनडा व ऑस्ट्रेलियाच्या या घटनेत अशी मुदत घातलेली आहे/ या मुदतीच्या आत बिलाला राज्यपालांची मान्यता मिळाली नाही तर ते बारगळते. राज्यपालांवर आपल्याकडे मुदतीचे काहीही बंधन नसल्याने बिल दीर्घकाळ कुजत पडून राहू शकते. लोकनियुक्त प्रतिनिधींनी बहुमताने संमत केलेल्या बिलाची अशी अवस्था होणे हा लोकशाहीचा अपमान आहे. राज्यविधिमंडळाने पास केलेल्या कोणत्याही बिलास परवानगी नाकारण्याचा अधिकार अमेरिकन घटनेत राज्यपालांना व संघराज्य सरकारला नाही. आपल्या घटनेत एखादे बिल आपल्या सूचनांसह विधानसभेकडे फेरविचारासाठी पाठविण्याचा अधिकार राज्यपालांना आहे. या सूचनांसह किंवा सूचनांशिवाय बिल विधिमंडळाने पुन: पास केल्यानंतर मात्र राज्यपालांना त्यास मान्यता नाकारता येत नाही. राष्ट्रपतींना

मात्र या बाबतीत अमर्याद अधिकार दिलेले आहेत. राज्यपालांनी राष्ट्रपतींकडे विचारासाठी पाठविलेले बिल त्यांच्या सूचनांसह विधिमंडळाकडे पुन: पाठविण्यात येते. या सूचनांसह किंवा सूचनांशिवाय विधिमंडळाने ते पास केल्यावर राष्ट्रपतींकडे पुन: मान्यतेसाठी पाठविण्यात येते. पण त्याला मान्यता दिलीच पाहिजे असे बंधन राष्ट्रपतींवर नाही. ही तरतूद लोकशाहीविरोधी आहे. राष्ट्रपतींनी वाटल्यास सुप्रीम कोर्टाचे मत अजमावावे पण बिल गृहाने दोनदा संमत केल्यानंतर राष्ट्रपतींनी त्याची अडवणूक करणे योग्य नाही.

विधिमंडळाचे अधिवेशन संपविण्याचा आणि विधिमंडळ बरखास्त करण्याचा (prorogue) अधिकार राज्यपालांना आहे ( घटना कलम १७४ (२) ) राज्यपालांच्या यासंबंधीच्या निर्णयाविरुद्ध कोर्टात जाता येणार नाही. अधिकाराचा गैरवापर करण्यात आला आहे या कारणासाठीसुद्धा (even on the ground of malafides) हरकत घेता येणार नाही असे या कलमात स्पष्ट म्हटले आहे. पश्चिम बंगाल विधानसभेची बैठक सभापतींनी बेमुदत तहकूब केल्यानंतर राज्यपालांनी त्याच दिवशी रात्री अधिवेशन संपविल्याचेच जाहीर केले. सभापतींनी आपल्या अधिकारात काही दिवसांनी विधानसभेची बैठक पुन: बोलावली असती पण त्यांना तसे करता येऊ नये, बैठक बोलावण्याचा अधिकार आपल्याकडेच ठेवावा, यासाठी राज्यपालांनी अधिवेशन संपविल्याचेच जाहीर केले. अधिवेशन बेमुदत तहकूब होऊ शकेल पण कार्यक्रमपत्रिकेवरील काहीही कामकाज न होता राज्यपालांनी अधिवेशन संपविल्याचे जाहीर करणे हा अधिकाराचा उघड उघड गैरवापर आहे. पण याविरुद्ध दाद मागण्याची काहीही सोय नाही.

राज्यपालांच्या सर्वच अधिकारांचा या लेखात विचार केलेला नाही, फक्त काही लोकशाहीविरोधी तरतुदींकडे लक्ष वेधले आहे. या तरतुदी रद्द करण्यासाठी घटनेत योग्य ती दुरुस्ती करणे हे सर्व लोकशाहीवाद्यांचे कर्तव्य आहे. O


परसूच्या पशुकथा — वसंत सबनीस

सहा साहसे — दा. सी. देसाई

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

# घराची किंमत

दुसऱ्या दिवशी गावात हूल अुठली. शिरपतच्या घरात धन आहे. भिंतीच्या कपारीत खन् खन् आवाज येतो —

**तु. मो. साळी**

शिरपतनं आज सोताचं घर घेतलं. अन् त्या घरात आज राहायला आला. किती दिसाची आस, आज भगवंतानं पुरी केली ! त्याचा आनंद गगनात माइना· इतके दिवस हात राखून खर्च केला, दोन पैसे मागे टाकले, आणि आज सोताचं घर मिळवलं, भाऊ-बंद मनात करपले. करपू दे, त्यांचा धंदाच त्यो ! सग्या-सोयऱ्यांनी वरकरणी, देवानं भलं केल्याची कबुली दिली; पर मनात खट्टू दिसले.

शिरपतनं आपल्या घरात सामान-सुमान लावलं. बायकोनं गोड-धड पकवान शिजवलं. भोजन होऊन निवांतपणे शिरपत आपल्या बायकोला म्हणतो– " सखू, घर कसं मनासारखं मिळालं. बाजारहाट जवळ, केशवची शाळा जवळ, गनपतीचं मंदिर जवळ, पानी जवळ; पायपीट नाही, कशाचा घोर नाही. शेजाऱ्यांचा तरास नाही ! ह्या घरावर म्या कधीपासून टपून होतो. निर्वंशाचं पडीत घर म्हणून पाचशेमधी मिळालं, नाहीतर आपल्यासारख्या गरीबाला कुठून मिळालं असतं ! आज घर घ्यायचं म्हंजी दोन-दोन हजार रुपये मोजूनही मनासारखं घर मिळत नाही."
शिरपतची बायको समाधानानं म्हनली —

" माझ्या भावानं पर बरी खटपट केली, न्हायतर हातचं गेलं असतं...! "

" ते तर हायेच ? त्यांचे भलतेच उपकार हायती आपल्यावर ! "

दिवसभराच्या दगदगीनं शिणलेल्या शिरपतला तात्काळ निद्रा आली. एक जप होते की नाही, तेवढ्यात केशव वरडायला लागला. त्यामुळं शिरपत दचकून उठला. मनाशी म्हणतो —

" नवीन जागा आहे...... ! "

जरा डोळा लागला की नाही, बायको उठून आकांत करू लागली; व दरवाजा उघडून बाहेर जायला लागली.

" आसं येड्यावानी काय करतीस गा ? "

बायको शुद्धीवर आली आणि मुकाट अंथरुणावर पडली.

शिरपत मनाशी म्हणतो— " नवीन जागा आहे...... ! "

पर घडीभरानं शिरपतला वाटलं, आपलं आंग कुनीतरी गदागदा हालवीत आहे.



मग वाटलं आपल्या अंगातली सगळी शक्ती निघून गेली आदे. हालचाल करायचं पर त्राण राहिलं नाही. श्वास घेता येईना; जीव गुदमरला. ओरडता येईना की अंगावरचं पांघरूण नीट करता येईना ! एकदा वाटलं, अंथरुणासकट आपन जमिनीत गाडले जात आहोत ! एकदा वाटलं घरावरची कौलं घसरायला लागली. आपल्या अंगावर, आता पडतील की तेव्हा पडतील !

काळासारखी वाटणारी रात्र अखेर संपली. सकाळ होत आली. वर्दळ वाढू लागली, तसा शिरपतच्या जिवात जीव आला. तो उठलेला पाहताच बायकोला धीर आला. ती उठली आणि लेकराला जवळ घेऊन रडाया लागली. शिरपत गहिवरून म्हनला — " सखू ! रडू नगस ! आपण जाऊ पहिल्या घरातच ! रडू नगस ! "

" तरी म्या म्हनलं व्हतं — ह्यो घर घेऊ नका. घर किती दिवसाचं पडित आहे नि किती दिवसाचं न्हाय् ! त्यात निर्वंशाचं घर ! "

" आगं, आपल्याला काय माहीत नशिबाचा खेळ ! "

" आता जन्माची भुताटकी मागं लागल त्याचं काय ? "

" आपन पहिल्या घरात जाऊ म्हनतोय ना ! "

" आता यायची एक लाज, आनिक जायच्या दोन लाजा ! "

" आगं ! नशिबानं ह्यो खेळ दाखिवला, त्याला काय विलाज आहे ? लोक हसतील दोन दिवस, हसू दे ! "

शिरपतनं आपल्या जिवाची समजूत केली, बायकोला समजावलं अन् घडीभरानं

म्हनला— " तू बैस जरा, आता काही मेव नाही. म्या तत्काळ यंकटरावकडून येतो. "
" त्याला इकडंच घेऊन या की ! "
" बरं, बरं ! " असं म्हणून शिरपत तळातळा यंकटरावकडे जावयास निघाला.
यंकटरावला सगळी हकीकत सांगून त्यानं विचारलं— " आता काय करावं ? "
" शिरपतराव, तुम्हांला मी पुन्हा, पुन्हा सांगितलं. ते घर घेऊ नका हो, आपण दुसरं बघू, तुम्ही मानलं नाही. आता होऊन गेलेल्या गोष्टीला कोणाचा विलाज नाही. काय ? पर, तुम्ही जर भुताची बात जगजाहीर केली तर घराला गिऱ्हाईक मिळगार नाही ! पैक्या परी पैका जाईल ! "
" इकून टाकायचं म्हनता ? "
" मग ? भुताकटीचं घर ठेवून काय करता ? "
" तयार व्हइल का पर कोणी ? "
" तुम्ही आपले पहिल्या घरात जा मुकाटयानं ! नाही तर ते पर हातचं जाईल ! म्या बघतो सगळं, काय करायचं ते ! मात्र एक आक्षर बोलू नका कुणाजवळ, सखूताईला पन सांगून ठेवा. "
शिरपत घरी आला, व्यंकटरावचा सल्ला बायकोला सांगितला आणि नाविलाजानं सामान बांधू लागला.
वाटेत जो भेटतो तो अचंबा करून विचारतो— " काय शिरपतराव पुन्हा पहिल्या घरात ? " शिरपत रुबाबानं उत्तर देतो —
" आरं, कमी भाडयाचं घर कोण सोडतो, आजकाल घरं मिळतात कुठं ? "
" आन सोताचं घर...... ? "
" त्यात दोन भाडेकरू ठेवणार ! "
" काय शिरपतराव, काल तिकडे आणि आज पुन्हा इकडे ! "
शिरपत खुलासा करतो—
" काल शुभमुहूर्त व्हता, म्हनलं नव्या घरात सयपाक करावा... ! "
आया-बाया विचारतात— " काय ग सखू, सोताच्या घरात न्हाय् राहनार काय ? "
सखू सर्वांना एकच उत्तर देते— " मर्जी आमची ! "
दुसऱ्या दिवशी गावात हूल उठली, शिरपतच्या घरात धन आहे. भितीच्या कपारीत खन् खन् आवाज येतो, ज्याच्या नशिबात असल, त्याला दिसल !
शिरपतच्या बायकोला सपनात लक्ष्मी येऊन म्हणाली— " मला उजेडात आण ! "
शिरपत घाबरला व पुन्हा पहिल्या घरात जाऊन राहिला.
" नशिबात नसल त्याच्या तो काय करील ?"
दुसऱ्या दिवशी मेघा गवळी त्याच्याकडे येऊन विचारतो— " बा शिरपत, घर इकायचं आहे म्हनं ! "

" नाय बा, घर कशापायी इकनार ?"

" ह्यो बघ, तू घर इक आसं आमच्यावालं म्हननं न्हाय ! पर इकायचं असल तर दुसऱ्या कोनाला देन्यापरी आपल्याला दे ! काय ? आपल्याला गुरंधोरं बांधायला जागा पुरत न्हाय म्हून म्हनतो ! आपण दोनशे जास्त देऊ ! आहे काय त्यांत ?

मेघा गवळी दोनशे रुपये जास्त देऊन शिरपतची जागा घेण्याच्या खटपटीत आहे, ही वार्ता गावभर पसरली. तसा रघू सोनार शिरपतकडे येऊन म्हणतो– " शिरपतराव, मेघा गवळ्याला जागा इकन्यापरी, आपल्याला तरी दे ! हम-रस्त्यावर घर आहे. मला पन दुकानाला जागा मिळाली तर बरंच व्हईल. कुनी सातशे देईल तर आपन नऊशे द्यायला तयार आहोत !

रघू सोनार नऊशे रुपये घेऊन शिरपतच्या पाठीमागे लागला आहे, ही वार्ता ऐकून जो तो शिरपतला राम राम करू लागला.

पाटलाचा धाकला मुलगा हीरा शिरपतला शेतात भेटला आणि इकडच्या–तिकडच्या गोष्टी करून म्हनला– " शिरपतकाका एक इचारू का ?"

" इचार की लेकरा !"

" आपन घर इक्रीला काढलं म्हनत्यात ?"

" घर इकू आनि मी कुठं जाऊ ?"

" बघा शिरपतकाका, आपन घर इकावं अशी आपली विच्छा नाही. काय समजलं ? आता खरं बोलायचं म्हंजी आमचा पर संसार वाढलाय ! त्या मानानं घर पडलं लहान. आता घरातली गोष्ट दुसऱ्याजवळ सांगू नये, पर तुम्ही आम्हांला परीक न्हाय ! तर सांगायचा मुद्दा असा की, आमच्या घरात आता भाऊबंदकी माजली आहे ! रोज डोक्याला कटकट. त्यापरी आपनच येगळं निघावं म्हनतो, काय समजलं ? म्हनून म्हंतो, कुणाला घर द्याल; तर एक शब्दानं आपल्याला तरी विचारा. आपन पुरे हजार देऊ !"

शिरपतच्या घरासाठी रघू पाटील पुरे हजार मोजणार ही वार्ता जसजसी लोकांच्या कानी गेली तशी घराची किंमत आणखीनच वाढली.

पलीकडच्या गावातला अमृता शिरपतला रस्त्यात भेटला आणि बिडी देऊन म्हनला– " शिरपतदादा, आपला इतक्या दिवसाचा घरोबा, आपल्या जवळून लप-वून ठेवू नको, काय असेल ते खरं खरं सांग !"

" कशाबद्दल ?"

" त्योच म्हनतो मी, उगाच येळ्याचं मत घेऊ नंगस !"

" तू तरी नीट इचार की, ताकाला जायचं नि लोटा काय म्हनून लपवायचा !"

अमृता श्रीपतला होटलात घेऊन गेला आणि खुलासेवार बोलण्याच्या इच्छेनं म्हनला– " घर इकून राहलाय म्हनं !"

" ह्यो तुला कसं कळलं ?"

" आरं, सगळ गाव बोलून राहलय, अन् मला कसं कळलं म्हंजी ? "

" बरं, तुझं म्हननं तरी सांग ! "

" माझं म्हननं काही नाही. दीड हजार आपन रोख द्यायला तयार आहोत. बोल पटलं तर. उद्या पैसा उभा करतो. मला वखारसाठी जागा पाहिजे म्हणून एवढी खुशामत. दुसरं काय ?"

अमृता वखारवाला दीड हजार देऊन आपल्यावर जीत करायला बघतो या विचारानं रघू पाटील रात्रभर तळमळत राहिला. इतक्या लोकांत आपली दाद कशी लागणार या विचारानं सोनार पुन्हा पुन्हा शिरपतची खुशामत करू लागला.

रघू पाटलाचा म्हातारा सकाळपासून शिरपतकडे ठाण मांडून बसला व अमृता-पेक्षा पाच-पन्नास आपण जास्त देऊ असं मोघम बोलू लागला.

शिरपतकडे लोकांची ही वर्दळ, एक जातो नि दुसरा येतो.

आणखी कोणकोण यायला पाहिजेत याचा शिरपतनं अजमास केला आणि मुका-ट्यानं ओढ्याकडे बघत राहिला.

लोक आपसात इकडच्या-तिकडच्या गप्पा करू लागले; आणि कोनाची पावर किती आहे याचा अंदाज बांधू लागले.

इतक्यात व्यंकटरावचा मुलगा धावत धावत आला नि म्हनला,– " शिरपत-काका, माझ्या बाबांनी तुम्हांला आताच्या आता बोलावलं ! "

शिरपतनं एक वेळ बायकोकडे बधितलं, वहाणा घातल्या आणि तळातळा यंकट-रावकडे निघून गेला.

शिरपतरावच्या घरात बसलेले लोक कंटाळले आनि आता यंकटरावच्या घरी कोणत्या निमित्तानं जावं, याचा मनातल्या मनात विचार करून रस्त्याला लागले.

इकडे यंकटराव शिरपतला सांगत होता– " पाव्हनं ! आता उगाच ताणून धरू नका. सावकार दोन हजार रोख मोजायला तयार आहे ! "

" कुठं आहे सावकार ?"

" आता येईलच ! "

त्या दिवशी दोन हजार रुपये पुन्हा पुन्हा मोजून शिरपत आपल्या बायकोला म्हनतो– " व्यंकटरावनं बरी युगत केली हं ! नाहीतर आपल्याला रडायची पाळी आली असती ! "

" आता तरी नीट बघा घर ! " सखू म्हणाली.

" आता घर न्हाय घ्यायचं, आता शेतीच बघू कुठेतरी. घे पैसे. नीट ठेवून दे ! "

# पुस्तके

प्रतिमावाद हे मराठी कवितेचे लक्षण होऊन बसल्याला आता पुष्कळ दिवस झाले. मराठी कवितेने आता प्रतिमा पचवली आहे. आत्मसात केली आहे. किंबहुना तिचे सारे भावविश्व आता प्रतिमांच्या भाषेतच व्यक्त होते. मर्ढेकरांनी नव्याने आणलेल्या या प्रतिमापद्धतीची बीजे कितीतरी आधीपासून मराठी कवितेत हळूहळू रुजत होती. मर्ढेकरांनंतर तिची जोपासना झाली आणि आज तिने प्रगल्भ, बाळसेदार स्वरूप धारण केले आहे. आजची कोणतीही मराठी कविता वाचताना तिच्यावरील प्रतिमांचा प्रभाव जाणवल्यावाचून राहत नाही.

## उंच भराऱ्या घेणारा
## ‘दुसरा पक्षी’

निशिकांत मिरजकर

मग ‘दुसरा पक्षी’ सारखी प्रतिमांनी फुलारलेली कविता वाचताना तिची सगळी स्वरूपे, त्यांचे वेगवेगळे घाट, त्यावरील विचित्रे यांची प्रत्ययकारी जाणीव न झाली तरच नवल !

कवितेने टाकलेले अलंकाराच्या पुढचे पाऊल म्हणजे प्रतिमा. ‘It is a picture made out of words’ अशी प्रतिमेची सर्वात साधी व्याख्या सी. डे लेविस यांनी केली आहे पण या व्याख्येने त्याचेच समाधान होत नाही. प्रतिमेमध्ये आणखी खूप काहीतरी असते. कवीला जे काही सांगावयाचे असते ते सारे प्रतिमेमध्ये चित्ररूप

घेऊन उभे राहते. हे चित्र कधी दृश्यात्मक असेल अथवा नसेलही. ते नुसते संवेदनाग्राही आणि संवेदनावाही अशाही स्वरूपाचे असू शकेल. परंतु एवढे निश्चित की प्रतिमेमध्ये कवीच्या भावनांना, विचारांना, शब्दांना—एकंदर अनुभवाला एक आकार प्राप्त झालेला असतो. ही नुसती कवीची निर्मिती नसते. नुसते उत्प्रेक्षण नसते. कवीचा अनुभवच त्याद्वारे साक्षात प्रकटण्याचा प्रयत्न करीत असतो. सजीव रूप घेण्याची धडपड करीत असतो. ही प्रक्रिया घडीव स्वरूपाची नसते. ती सेंद्रिय स्वरूपाची असते. कळी उमलून तिचे फूल बनावे त्याप्रमाणे कवीच्या अनुभवाचेच एकेक पदर उलगडत उलगडत त्यातून प्रतिमा जन्म घेते. जाणिवेच्या पातळीवरील विचारभावनांबरोबरच नेणिवसंलग्न, अमूर्त अनुभूतिचिजांनाही तिचा स्पर्श झालेला असतो. अर्थातच भाषा हे या ठिकाणी केवळ कवीची अनुभूती आपल्यापर्यंत पोचविण्याचे एक माध्यम राहत नाही. एक तऱ्हेचा आंतरिक सुसंवाद कवी आणि रसिक यांच्यामध्ये प्रतिमांच्या द्वारा सांधण्याचे जास्त मोलाचे कार्य ती करते. ही प्रतिमा एखाद्या अलंकारातून, एखाद्या वर्णनातून तयार होते. सबंध कविता म्हणजे एक प्रतिमा असू शकते. किंवा एखाद्याच अर्थगर्भ आणि विशेष मार्मिक अशा विशेषणात प्रतिमेचे अगदी छोटेसेच परंतु विलक्षण खोल स्वरूप आढळून येते.

नावीन्य, उत्कटता आणि अर्थपरिपूर्णता हे प्रतिमेचे प्रमुख आणि आवश्यक गुणधर्म आहेत. कवीच्या अवतीभोवती असणाऱ्या नानाविध वस्तूंच्या, प्रसंगांच्या, व्यक्तींच्या परिणामांचे ठसे कवीच्या संवेदनशील मनावर उमटत असतात. एखाद्या अनुभूतीचे प्रकटीकरण करताना याच वेगवेगळ्या, चित्रविचित्र ठशांच्या कोरीव मुशी बनतात. त्यात तो अनुभव ओतला जातो. त्याला निरनिराळे घाट, वेगवेगळे डौल प्राप्त होतात. आणि मग प्रतिमांच्या भाषेत अनुभव सांगितला जातो· अशी प्रतिमा तयार होते. अलंकारांसाठी आवश्यक असलेल्या साधर्म्य, विरोध, तुलना, शृंखला अशा गोष्टींसाठी प्रतिमा अडून बसत नाही. भावना आणि तत्संबंधित वस्तू यांचे कवीला जाणवणारे काहीतरी नाते जडून जाते. रेल्वेचा फलाट, गिरणीचा भोंगा, पंक्चरलेली टायर, आणि ओल्या पिपात मेलेले उंदीर यांसारख्या वैविध्यपूर्ण वस्तूंचा कवीच्या भाववृत्तीच्या अनेक पदरांशी चमत्कारिक गोफ गुंफला जातो; एका गोंधळ्याचा गोंधळ, एखादा न्हावी, वाणी अशा काही व्यक्तिरेखांचे धागे कधी त्याच्या भाववृत्तीशी जुळून येतात; तर कधी एखाद्या विश्रब्ध निसर्गदृश्यातून त्याच्या मनाला जाणवलेले खूप खूप काहीतरी आकार घेण्यासाठी निरनिराळ्या संवेदनांच्या प्रतिमा रिंगण धरतात. कवीच्या अबोध मनातून सुद्धा या प्रतिमांचा उद्रेक होत असल्यामुळे कधी कधी त्यांनी घडणारा प्रतिमासंघात प्रथमदर्शनी विक्षिप्त, आत्यंतिक अथवा अनाकलनीय वाटतो. या विक्षिप्तपणामागे, या अनाकलनीयतेच्या पडद्यामागे काही गूढ पण उत्कट हालचाली होत असल्याचे आपल्याला जाणवतेही. आपल्या मनाची पातळी कवीच्या वेदनेच्या पातळीच्या समप्रमाणात उंचावली तर

या हालचाली आपल्याला स्पष्टपणे दिसल्या नाहीत तरी जाणवतात. एरव्ही सुद्धा त्यातून निर्माण होणारी एक प्रच्छन्न लय मनाला वेढून घेते– मोह घालते. अनाकलनीय अर्थाच्या जाणिवेच्या विश्वपरिघाला स्पर्श करणाऱ्या लाटा विस्तारत जातात.

आजपर्यंतच्या मराठी नवकवितेत पु. शि. रेगे यांचे एक विवक्षित स्थान निर्माण झाले होते. दोला, गंधरेखा, पुष्कळा या त्यांच्या कवितासंग्रहांमधून उमटलेल्या प्रतिमांना एक निश्चित दिशा होती. नकळतच त्यांना घोटीवपणा प्राप्त होत चालला होता. "प्रा. रेगे यांना शारीरिकतेच्या संवेदनातून मुक्तीचा मार्ग शोधावयाचा आहे" असे विधान त्याच्याबद्दल य. द. भावे यांनी केले होते. पु. शि. रेगे यांनी त्याला पूर्ण मान्यता दिली नसली तरी त्यांच्या प्रतिमांची एकंदर दिशा तशीच होती. त्यांच्या अनुभूतीमध्ये सृजनशक्तीला स्त्रीच्या रूपाने मूर्त स्वरूप आलेले होते. "आपल्या लावण्याच्या अनेक परींनी पुरुषाला खुणावणारी, भुलविणारी आणि फसविणारी स्त्री, आणि तिच्याशी मीलन व्हावे म्हणून आतुर, आसुसलेला असा पुरुष यांच्या चिरमीलनाच्या मदिरेवरच्या निळ्या, गुलाबी फेसावर रेग्यांच्या काव्याची मैफिल उमटली आहे......चिरंतन ओढ व चिरमीलन रतिक्रीडेतून व्यक्त होते तेव्हा रेग्यांची कविता फुलारते......शारीरिक अतृप्तीच्या व तृप्तीच्या ह्या घन व गडद छटाच त्यांच्या काव्यवृत्तीला उत्तेजित करतात," हे गंगाधर गाडगीळांनी केलेले पु. शि. रेग्यांच्या कवितेचे वर्णन त्याला अनुसरूनच आहे. स्त्री आणि निसर्ग, शारीरिक ओढ आणि रम्य निसर्गचित्रे ह्यातूनच रेग्यांची प्रतिमा उमलली आहे. "लंपट ओले वस्त्र होऊनी–" "हिरवी ही साडी ल्याली–" "लिलीची फुले तिने एकदा–" "आसुसलेला शेवगा–" "हिरवी पिवळी खुलास सृष्टी–" "गिरकी घेऊन थबकणारे पाणी" वगैरे प्रतिमा त्याच घाटाच्या आणि थाटाच्या आहेत. पु. शि. रेगे ह्यांच्या भाववृत्तीची पूर्णाकृती या दोन प्रतिमांपैकी कुठलीतरी छटा आल्याशिवाय बनतच नसे. आणि या दोन्हीही ढोबळ प्रतिमांच्या असंख्य सूक्ष्म छटा हळुवारपणे चितारून कितीतरी वेधक प्रतिमासंघात त्यांनी गुंफले आहेत.

'दुसरा पक्षी' हा पु. शि. रेग्यांचा नवा कवितासंग्रह त्याच परंपरेतील असला तरी त्याच मळवाटेवरचा नाही. ह्या कवितांचा आस्वाद घेताना मला पहिल्यांदा जाणवले ते हे की रेगे या कवितासंग्रहात आणखी पुढे गेले आहेत. कवीने असेच बदलायचे असते. आपल्या प्रकृतीची बाह्यरेषा कायम ठेवून आतले रंग जास्तजास्त गहिरे करावयाचे असतात. रेग्यांची प्रतिमा या कवितासंग्रहात आणखी तरळ, आणखी हळुवार, आणखी अर्थवाही झाली आहे. स्त्री आणि निसर्ग या तिच्या अभिव्यक्तीच्या दोन वाटा कायमच आहेत. परंतु त्याचबरोबर नव्या विज्ञान विश्वातल्या आणखी कितीतरी जाणिवांचा (आणि नेणिवांचा) तिने मनापासून स्वीकार केला आहे. त्यामुळे पूर्वीच्याच परंपरेतल्या त्यांच्या या नव्या प्रतिमा उंचावलेल्या अपेक्षाही खूप खूप काही सांगून जातात. "कळा सांगणारी झाडांची कालिंदी पाने"

" निर्मनस्क जांभुळवेडया जांघांचा डोंगर," "आंब्यांचे अलग अलग कोरीव स्तूप," " डोंगराच्या सोलीव गर्भगृहातील किमान सृष्टी " यासारख्या प्रतिमांमध्ये कवीच्या भावनेची आणि निसर्गातील दृश्याची घातलेली पक्की सांगड विविधरंगी अर्थाची नागमोडी वीण विणत जाते. " केव्हापासून मी उभा " ही सबंध कविता म्हणजे अशा तऱ्हेच्या अनेकविध प्रतिमांचे एकसंध चित्र बनले आहे. काळोखाला फुटणाऱ्या जिभा, फत्तराच्या त्रिखंड वाटा घुंडणारा काळा समुद्र, मायमाउली मुक्तकेशा धरणी या सर्वांच्या परस्परपूरक आकृतिविशेषांतून एक खोल नानापदरी प्रतिमा तयार होते. आणि " अतिशयात्मक दुःख जे, तेच आधी पाहिजे " या ओळींचा मर्मग्राही कळस त्यावर चढविला जातो. " आकाश उशाला येते, " " डोळयांतून मी आरपार जाऊन आलो " यासारख्या प्रतिमांतून एरवी न समजणारी उत्कट अनुभूती एकदम टोकदार बनते, तर " टांगलेल्या कवायती हातांची मेणोली शिस्त, " " काटेरी बुब्बुळात मुईत न मावणाऱ्या जांभळी वेलींचे घोटलेले सर्प " यांसारख्या प्रतिमांमध्ये जाणवणारे आणि न जाणवणारे असे कितीतरी अर्थ उत्कंठित होऊन गर्दी करतात.

काही काही कवितांमधील विशिष्ट वातावरण प्रत्यक्ष निर्माण होण्यासाठी दृश्यात्मक कृतिशील प्रतिमा सहजपणे आल्या आहेत. अशा ओळी वाचल्याबरोबर ते ते दृश्य नुसतेच डोळयांपुढे उभे राहत नाहीत, तर त्यात घडणारी प्रत्येक बारीकसारीक हालचाल अगदी आपल्या डोळयांसमोर घडत असते. काव्यार्थाला त्यामुळे एकदम गती प्राप्त होते. विलक्षण चैतन्य प्राप्त होते. आकाशाच्या खिडक्या मिटायला सुरवात होते, असे म्हटल्याबरोबर अथवा भूमीचे सनदी जावळ समशाख पसरते अशी ओळ वाचल्याबरोबर ते ते दृश्य जणू नजरेपुढे उलगडत जाते आणि व्यक्त होणाऱ्या अनुभवाला अनुकूल पार्श्वभूमी तयार होते.

पु. शि. रेग्यांच्या लेखणीमध्ये अर्थाने गच्च भरलेल्या शब्दांच्या लडीमागून लडी निर्माण करण्याची जादू आहे. सहज जाता जाता ते अशा ओळी लिहून जातात की त्यातून अनुभवाची आकृती तर पूर्ण होतेच पण शिवाय अनुभवाने न सांगितलेले, कवीचा रोख नसलेले, वाच्यार्थ, लक्ष्यार्थ आणि व्यंग्यार्थ या तिन्हींच्याही पलिकडचे पण प्रत्येकाच्या हृदयाशी भिडणारे असे काहीतरी त्यांमधून पाझरते.

" सराइतासारखा तोही माझ्यासारखाच पसरला एक हात.
आपल्या छातीवर घेऊन "

हे काढून ठेवलेल्या कोटाचे वर्णन याच प्रकारचे आहे.

" सात तुझ्या, सात माझ्या. दोन सप्तपदी "

या ओळींमधील काव्य तर एकंदर प्रसंगाच्या संदर्भात वरील वर्णन अक्षरशः खरे करतात. यात सूचकता तर आहेच, पण आणखी काहीतरी आहे. सांगता न येणारे पण उत्कटतेने जाणवणारे. " तू आलीस तेव्हा " ही सबंध कविता म्हणजे अशा

तऱ्हेच्या अनेक सूचक प्रतिमांनी तयार झालेले एक प्रसंगात्मक चित्र आहे.

'आरसा कसा,' 'झाड उभे रोखुनि नभ पाठीशी' यासारख्या कवितांमध्ये सुरुवातीला वास्तव प्रतिमा बारकाईने उभ्या करून रेगे एकदम नेणिवसंलग्न मनाकडे झेप घेतात. 'संमानक', 'आरसा' अशा विज्ञानयुगाच्या नव्या प्रतिमा ते वापरतात, 'दार' यासारख्या एखाद्याच प्रतिमेमध्ये मिस्किलपणाने अनेक गमतीदार छटा निर्माण करतात. पूल, वारा, माती, झाडे, आकाश अशा निसर्गातील नहमीच्या वस्तूंनाही विवक्षित प्रतिमासंघात करून नवे नवे रंग देतात. "तुरीच्या तुरळक शेतांवरची," "हात थंड. वेगळेच. आता दूर" यासारख्या कविता म्हणजे एक पूर्ण चित्र असते. तर दार किंवा शिल्पित सहेलीचा स्तन यासारख्या विस्तृत प्रतिमा पूर्णपणे घडविण्यासाठी अनेक ओळींची कलाकुसर करतात. या सगळ्या प्रतिमांमधून रेग्यांचा एक तऱ्हेचा अलिप्तपणा जाणवतो. हा अलिप्तपणा, शुष्क, कोरडा मात्र नाही. आपणच घडविलेल्या मूर्तीकडे मूर्तिकाराने किंचित दुरून परंतु अथांग आपलेपणाने पाहत राहावे तसे रेगे आपल्या प्रतिमांकडे जिव्हाळ्याच्या कौतुकाने पाहत असल्याचा भास होतो. त्यांनी लिहिलेल्या ओळींमध्ये त्यांचे अंतःकरण बिंबित झाले आहे. पण त्याने त्या ओळी गढूळलेल्या नाहीत. त्यांचा अलिप्तपणा हा खूप खूप भोगलेला अलिप्तपणा आहे.

"हे काहुर काही मी माजवलेले नाही
काटे ज्यांनी पसरले त्यांच्या मी गावीही नाही"

अशा ओळींमध्ये या अलिप्तपणाचे खरेखुरे प्रगाढ स्वरूप दिसते. अशा या भावनेत बुडी घणाऱ्या अलिप्तपणामुळे एकमेकांना काटकोनात छेदणारे दोन प्रकारचे परिणाम घडून येतात. एक म्हणजे अतिशय हळुवारपणा, अगदी कातर मनःस्थिती त्यामुळे तयार होते; आणि दुसरा म्हणजे कविता हळुहळू दुर्बोधतेकडे झुकू लागते.

"ती कुठल्याही झाडाची असतात
कुठल्याही मातीवर उतरतात."

"राबवणाऱ्यांना राबवता येतं
रंगवलेली चित्रं मुळातच हरवलेली असतात"
गाण्यांना सूर असतात गायब लयींचे
वाचणाऱ्यांना आधार फक्त चष्म्याचा
त्यांच्यातून माझी अव्याहत हाक कुठवर जाणार

"जे पुढं जातं त्यांबरोबर आपण पुढं गेलं पाहिजे
माझ्याबरोबर मी गेलं पाहिजे
आपल्याला मागं काहीच ठेवता येत नाही"

या ठिकाणी अतिशय हळुवारपणा आणि कातरता निर्माण झाली आहे. तर "मी जे कधीच बोललो नाही" आणि "वाटेचे घुमारे" यासारख्या कवितांमध्ये अर्थाची

सांगड घालता आली नाही तरी दुर्बोधतेमध्येच अर्थाचे अनेक पदर सामावल्याचा भास होतो. स्पष्टपणे काही समजत नाही, पण ते समजून घेण्यासाठी विचिकित्सा करीत बसण्याची जरूरही वाटत नाही. कविता आहे अशीच आपल्याला पुरेशी होते. आवडते " उरलेले सुरले राहिले नव्हते " यासारखी कविता मात्र पटतही नाही, समजतही नाही आणि मनाला भिडतही नाही. पण हा अपवादच. एरवी वाऱ्याची **बहाद्दर** उठावणी, **हातातच रुचलेल्या** हातांचा अनुकार, अजून **उष्ण आततायी** असलेला शिल्पित सहेलीचा स्तन, अनिच्छ कंगोरे आणि सूक्ष्म भूमितिप्रधान घागेदोरे, विश्वासदार पूल आणि समजूतदार नदी यांसारख्या भेदक, अर्थवाही विशेषणांमुळे रेग्यांच्या प्रतिमा अगदी शिल्पकाम केल्याप्रमाणे कोरून उमटलेल्या असतात.

" रुतलेल्या वाऱ्याची
आळोकी जवळीक
सर्वत्र
भिडलेल्या साळूंकी
श्वासांची ही रात्र "

यासारखी सजीव, बोलकी, उत्कट चित्रे त्यामुळे निर्माण होतात.

पु. शि. रेगे यांचा ' दुसरा पक्षी ' हा असा आहे. खूप भराऱ्या घेणारा, आपल्याला उंचावरून दिसणारे विहंगम दृश्य आणि वाऱ्याशी केलेल्या गोष्टी सांगणारा. मराठी कवितेचे आजचे स्वरूप रेग्यांच्या या कविता अगदी जवळून दाखवितात. ' कालच्या ' मराठी कवितेनंतरचे ' आजचे ' तिचे प्रगल्भ स्वरूप आणि ' उद्याच्या ' गूढतर स्वरूपाची चाहूल येथे जाणवते. अठ्ठेचाळीस कवितांचा हा संग्रह वाचल्यावर खूप खूप जाणवले, सांगावेसे वाटले—मराठी कविता, पु. शि. रेगे आणि ' दुसरा पक्षी ' यांविषयी.

**(दुसरा पक्षी : पुरुषोत्तम शिवराम रेगे : मौज प्रकाशन : किंमत साडेचार रुपये : पृष्ठे ६७)**

O




## क्रीडावृद्धीचे दुखणे

हरियाना (पंजाब) मधील कर्नाल गावी गेल्या महिन्यात झालेल्या आंतरविभागीय अॅथलेटिक स्पर्धांत पहिल्या दिवशी धमालच उडाली. ती ऐकण्यासारखी आहे. एक खेळाडू हातात एक बांबू घेऊन त्या आधारे उंच उडी (पोल व्हॉल्ट) मारण्यासाठी निघाला असता त्याच्या अगदी शेजारूनच फेकलेली एक थाळी सरकन निघून गेली. लांब उडी मारावयास निघालेल्या एका तगड्या खेळाडूस अचानक मध्येच थांबावे लागले. कारण समोरूनच ज्यांच्या हस्ते बक्षीस समारंभ होणार होता ते सद्गृहस्थ चालले होते ! ट्रॅकवर धावण्याची शर्यत चालू असता मधूनच काही प्रेक्षक ऐषारामात वाट काढीत होते. भारतामधील श्रेष्ठ अॅथलेटपटूंचा अभावच या स्पर्धेत प्रकर्षाने जाणवत होता.

अॅमेच्युअर अॅथलेटिक फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय पातळीवरील ही स्पर्धा चालू होती आणि विशेष म्हणजे पुढील वर्षाच्या ऑलिंपिकसाठी त्यात खेळाडूंची चाचणी होणार होती. कर्नालचे मैदान राष्ट्रीय स्पर्धा घेण्यास अजिबात लायक नव्हते. शिवाय त्या क्रीडांगणावर १६ विविध स्पर्धांची एकाच वेळी गल्लत झाली होती. त्यातच काही खेळाडू एका वेळी पाच किंवा दहा स्पर्धांत भाग घेण्यासाठी धडपडत होते. म्हणजेच त्या त्या स्पर्धांसाठी त्यांनी नावे नोंदविली होती. हरियानालाच प्रथम अशी स्पर्धा बहाल केली होती. साहजिकच त्यांच्याकडून अगदी वरच्या श्रेणीची व्यवस्था होणे अपेक्षित नव्हते.

—एखाद्या ठिकाणी राष्ट्रीय पातळीवरची स्पर्धा भरविताना तेथील सोयीगैरसोयींचा राष्ट्रीय

संस्था विचारसुद्धा करीत नाही, याचे आश्चर्य वाटते. बरे, हौसेखातर त्या ठिकाणच्या सदस्यांनी असे कार्य अंगीकारल्यानंतर त्यावर तज्ज्ञांची देखरेख ठेवणे, त्यांना संपूर्ण साहाय्य करणे ही जबाबदारी राष्ट्रीय संस्थेवरच पडते. पण एखाद्या घटक संस्थेवर कारभार सोपवून दिला की वरचे नेते हात झटकून मोकळे होतात आणि कर्नालच्या अॅथलेटिक स्पर्धेत प्रमुख खेळाडूंचा पत्ताच नव्हता. म्हणजे त्यांच्या येण्याजाण्याचा, इतर अडचणींचा विचारच झाला नाही की काय ? १९६८ च्या मेक्सिको ऑलिंपिकची तयारी अशा पद्धतीने होणार असेल तर मोठे तत्त्व हवेच कशाला ? आंतरराष्ट्रीय क्रीडा-क्षेत्रात लायक खेळाडू निर्माण करण्यासाठी प्रथम क्रीडा-संघटक आणि कार्यकर्ते लायक हवेत. आणि खेळाडूंनादेखील राष्ट्रीय भावनेने एकत्र आणून त्यांच्याकडून खेळाचा दर्जा वाढविण्यासाठी तज्ज्ञ क्रीडा-शिक्षकांचा ओघ भारतामधील क्रीडा-परिसरात पसरला पाहिजे. नाही तर राष्ट्रीय पातळीवरची आंतर-विभागीय स्पर्धा हरियानाला भरवून आणि हजारो रुपये खर्चूनही अखेर हरी हरी करीतच बसावयाची वेळ यावयाची. भारतीय क्रीडावृद्धीचे दुखणे हे असे आहे.

## सी. कें.चा हृदयद्रावक शेवट

ज्या सी. कें.नी इंदूरचे नाव जगाच्या नकाशावर कायमचे अंकित करून ठेवले त्यांचा अंत अत्यंत शोचनीय अवस्थेत झाला. शेवटच्या महिन्याभरात ते कोणासच ओळखत नव्हते. क्रिकेटचा विषय कुणी काढला की ते अतिशय संतापत. त्यांना अर्धांगवायू झाला होता. दिनांक १३ नोव्हेंबरला रात्री दीडच्या सुमारास सी. कें.चे देहावसान झाले. त्यांचे सुविद्य चिरंजीव बाहेरगावहून आल्यानंतर सर्व व्यवस्था झाली. ते कर्नल असल्याने पोलीसचा बँड आणला होता. त्यांच्या घरापासून स्मशान सुमारे मैलभर तरी असावे. पण इंदूरकरांना काय झाले कुणास ठाऊक. स्मशानयात्रेस मंडळी अगदी मोजकी होती. स्मशानात ही व्यथा सर्वांनीच बोलून दाखविली. मध्यप्रदेश सरकारडून कुठलाच सन्मान देण्यात आला नाही......

— — — — — —

## इट् इझण्ट क्रिकेट

— — — — — —

एक डिसेंबर रोजी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी 'डेव्हिड कप' आंतर-महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेतील अंतिम सामन्यातील विजयानंतर हुल्लडबाजी, दंगलमस्ती करून आपला आनंद साजरा केला. या सर्व हिडिस प्रदर्शनाची दखल पुण्यामुंबईच्या प्रमुख वृत्तपत्रांनी घेऊन एका सामाजिक विषयाला वेळीच

तोंड फोडले यात शंका नाही. हा सामना जो चार दिवस नेहरू स्टेडियमवर चालला होता त्यात फर्ग्युसन कॉलेजातील व स. प. महाविद्यालयातील गुंड पोरट्यांनी आणि त्यांना साथ देणाऱ्या बाहेरील मवाल्यांनी गलिच्छ आणि बीभत्स चाळे केले. कधी नव्हत या सामन्याला महिलांनी प्रचंड गर्दी केली होती. पण बिचाऱ्यांना त्याचे सोयरसुतकहि नव्हते. त्यांना अचकट विचकट शिव्या द्यायच्या, धक्के मारावयाचे, अंगविक्षेप करून पिपाण्या वाजवायच्या असे अनंत गैरप्रकार करण्यात आले. आणि सद्गृहस्थांचा म्हणून जो क्रिकेट खेळ मानला जातो तो तिथेच मृत पावला.

वेस्ट इंडिज क्रिकेटपटु रॉय गिलख्रिस्ट यांनी आपल्या पत्नीला तापलेल्या सांडशीने डाग दिला. त्याबद्दल कोर्टात ते प्रकरण गेल्यावर न्यायमूर्तींनी सांगितले की, "स्पोर्टस या नावाखाली रानटी प्रवृत्तीच्या वाममूल्यांना इंग्लंडने थारा देऊन क्रीडाक्षेत्र खालच्या थराला नेऊन पोहोचविलेले आहे."

दिल्ली विद्यापीठाच्या आंतर-महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेत नुकतेच दोन पंचांना विद्यार्थ्यांनी मारले. तेव्हा सर्व पंचांनी आपण आता या फंदात पडणारच नाही अशी घोषणा केली. तेव्हा दिल्ली विद्यापीठाने सात सदस्यांची एक समिती नेमून या प्रकाराची चौकशी चालू केली आहे.

पुण्यामधील यंदाच्या आंतर-महाविद्यालयीन बंदिस्त क्रीडा-स्पर्धांसाठी पुणे विद्यापीठाने मुलींच्या सामन्यांना मुलांना प्रवेश नाकारला. यापासून तरी ही मंडळी काही बोध घेतील अशी खात्री वाटत होती. पण ते तेवढयावरच राहिले.

हल्लीच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांत मूलत: बेपर्वाईची भावना, वरिष्ठांबद्दल अनादर आणि खिलाडूवृत्तीचा अभाव दिसून येतो. त्यातूनही आपल्या चांगल्या—वाईट विचारांना वाट देताना काही सौजन्याची, सभ्यतेची अलिखित संहिता आहे हे ते अजिबात विसरतात. पुण्यामधील क्रीडा—शिक्षकांची टिंगल आणि टवाळीच अधिक केली जाते त्यामुळे सद्विचारी क्रीडा—शिक्षक उदयोन्मुख खेळाडूंना शिकविण्याच्या भरीस पडत नाहीत. क्रीडाक्षेत्रातील चांगली चांगली मूल्ये आता लोप पावत आहेत आणि ज्यांच्यात या सद्गुणांचा समावेश आहे असे चांगले खेळाडू, शिक्षक, कार्यकर्ते क्रीडाक्षेत्रापासून दूर दूर जाऊ पाहत आहेत. आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षत्रात जाऊन आपण गर्जू आणि भारताचे नाव उज्ज्वल करू अशी भावनाच आपल्या खेळाडूत उरलेली नाही. एखादे प्रमाणपत्र, आणि नोकरी मिळाली की खेळ बंद इथपर्यंतच त्यांची मजल जाते. म्हणूनच नुसत्या चौकशी समित्या नेमून हा प्रश्न सुटणार नाही. तर चांगल्या प्रवृत्तींनी वाईट प्रवृत्तींशी झगडण्यातच हा प्रश्न कधीतरी धसास लागू शकेल. त्याकरिता ज्यांना न्यायाची, देशाभिमानाची चाड असेल अशा शक्ती एकत्र आल्या पाहिजेत आणि कायद्याच्या मदतीने त्यांना क्रीडांगणावर पाऊल ठेवून आणि पाय रोवूनच उभे राहिले पाहिजे. मग विजयाचा स्वीकार नम्रतेनेच होईल आणि पराभवाचे उट्टे अंगच्या कर्तृत्वानेच काढले जाईल.

**—मनोहर रेगे**

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

**श्री. गो. जोशी, सायनाचार्य**

## दि. २३ ते २९ डिसेंबरचे भविष्य

**मेष** : भाग्यात सूर्य, बुध आणि दशमात मंगळ एवढी समर्थ ग्रहस्थिती पाठीशी असल्यामुळे हा आठवडा आपण चांगलाच गाजवून सोडाल. नोकरीधंद्यात या सुमारास असे काही अघटित घडेल की, त्यामुळे व्यवसायक्षेत्रात तुमचा खूपच दबदबा वाढेल. कलाक्रीडाक्षेत्रांत तर विक्रम करून दाखवाल. या वेळी अनेकवेळा दौऱ्यावर निघावे लागेल. राजकीय क्षेत्रात आवाज उठवण्याची संधी लाभेल. राजकीय वातावरणातील भ्रष्टाचाराचे आणि लाचलुचपतीचे वाभाडे काढण्याचा चंग बांधाल. असे काही करून दाखवाल की त्यामुळे तुम्ही सर्वत्र चर्चेचा विषय बनाल. तुमच्यातील अचाट कर्तृत्वाचे दर्शन घडवून आणणारा हा काल आहे.

दि. २८ चा सूर्य-गुरु-त्रिकोण तुमची प्रतिष्ठा खूपच वाढवील.

**वृषभ** : सूर्य-गुरु-त्रिकोण असा योग पुन्हा १२ वर्षे तरी तुमच्या वाट्यास येणार नाही. साहित्यिकांना-वृत्तपत्रव्यावसायिकांना हे एक वरदानच ठरेल. आपल्या कल्पना आकार घेऊ लागतील. नव्या योजना कार्यान्वित ठरतील.

चित्रपटसृष्टीतील कलावंतांचे दीर्घ मुदतीचे करारमदार होतील. नवे घर बांधण्याचे विचार उचल घेतील. मंगलकार्याचा प्रश्नहि निर्णायक अवस्थेत येईल.

सूर्य अष्टमस्थानी असल्यामुळे प्रकृतीकडे या वेळी विशेष लक्ष द्यावेच लागेल. पण ही वेळच इतकी घाईगर्दीची आहे की, तुम्हांला आजारी पडायला सवडच नाही. कामाचा डोंगर उपसण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल.

दि. २४, २६, २८ या कालावर विशेष लक्ष केंद्रित करा.

**मिथुन** : सध्याच्या आठव्या मंगळाच्या अनिष्ट कालातही सूर्य-गुरु-त्रिकोण तुम्हांला अनेक कार्यात घवघवीत यश देऊन जाईल.

विज्ञानाच्या क्षेत्रात, रासायनिक विभागात आणि राजकीय आखाड्यातही तुम्हांला प्रतिस्पर्धीच उरणार नाही. सांपत्तिक अपेक्षा जरी पूर्णांशाने सफल झाल्या नाहीत

तरी भविष्यकालीन अनपेक्षित लाभाची प्रसादचिन्हे या वेळच्या सूर्य-गुरु-त्रिकोणापासून (२८ डिसें.) दिसायला लागतील.

पण लक्षात ठेवा, हे दिवस पूर्णत्वाने स्वास्थ्याचे समाधानाचे नव्हेतच. पण अपेक्षा भंगतील याची भीती मुळीच बाळगू नका.

दि. २६ ते २८ या काली आपणास अनेकांचे सहकार्य लाभेल.

**कर्क** : मंगळ सप्तमात असेपर्यंत तरी तुमच्या बाबतीत काही विशेष चांगले समाधानाचे घडेल याची मुळीच अपेक्षा करू नका. गुरू आपणांस अधिकाधिक अनुकूल आहे. पण त्यालाही मंगळापुढे नांगीच टाकावी लागते. या हटवादी ग्रहामुळे कुणाचेच काही चालत नाही. घरचे वातावरण अप्रसन्न बनेल, वादविवाद–व्यावसायिक संघर्ष यांमुळे काही सुचेनासे होईल. प्रतिस्पर्ध्याशी आता दोन हात केल्याशिवाय गत्यंतरच नाही, असे वातावरण निर्माण होईल. पण सहन करणे–माघार घेणे हाच या अनिष्टतेवर रामबाण उपाय आहे. धाडसी व्यवहार करणे इष्ट ठरणार नाही.

दि. २७ ते २९ या काली इष्टमित्रांचे सहकार्य लाभेल.

**सिंह** : एकट्या शनीशिवाय–अंतरिक्षातील सारे ग्रह तुमच्यावर खूष दिसतात. राजकीय–सामाजिक क्षेत्रांतील तुमचे महत्व याच वेळी निरपवादपणे सिद्ध होईल. हवामान पूर्णत्वाने अनुकूल आहे. थोडी प्रयत्नाची वल्ही मारलीत की, तुम्ही पैलतीराला पोचू शकाल. सहसा कुठेच नडणार नाही. हाती घेतलेली सारी कामे विलक्षण गती घेऊ लागतील. अमाप पैसा हाती येईल, वृत्तपत्रीय प्रसिद्धी लाभेल.

संशोधनक्षेत्रातील संशोधनामुळे तुमचा कीर्तिदुंदुमी दिगंतात निनादू लागेल. जगाच्या नजरा तुमच्यावर खिळून राहतील असे काही अनन्यसाधारण यश तुमच्या पदरी पडेल.

दि. २८ हा दिवस तुमच्या जीवनात चिरंतनस्मृतीचा ठरावा.

**कन्या** : मंगळ अनुकूल असूनही सूर्य चतुर्थात आल्यापासून आपण अपेक्षेप्रमाणे प्रगतीचा टप्पा गाठू शकत नाही असे आपणांस जाणवत राहील. अविश्रांत परिश्रमाची आणि निर्धार निष्ठेची गरज भासते अशाच वेळी सूर्य-गुरु-योगामुळे तुमची स्थावराची समस्या सुटेल. प्रगतीचा मार्ग आज ना उद्या निर्वेध बनेल याची खात्री वाटू लागेल.

या आठवड्यात नवे स्नेहसंबंध घडून येतील आणि या संबंधांमधून लवकरच कुमार-कुमारिकेची लग्नेही ठरतील. जीवनातील अनेक नाजूक समस्या या काळी सुटू लागतील. वाढत्या खर्चाचा लोंढा थोपविण्याचा शिकस्तीचा प्रयत्न करा.

दि. २६ ते २९ या वेळी आपल्या अपेक्षा सफल व्हाव्यात.

**तूळ** : सूर्य पराक्रमात आणि गुरू लाभात या दोन ग्रहांच्या अंशपूर्ण त्रिकोणाचा लाभ तुम्हा तूळ राशी व्यक्तींनाच व्हावा इतका सर्वोतम प्रगतीचा आणि

अपेक्षेपेक्षाही अपेक्षा सफल करणारा योग १२ वर्षांनंतर आताच तुम्हांला लाभत आहे.

तुमच्यातील अभिजात कलात्मकतेचे दर्शन जगाला घडेल. कलासाहित्याच्या क्षेत्रात अमाप लोकप्रियता लाभेल. चौथ्या मंगळासारखे ग्रह सहसा तुमच्या प्रगतीच्या आड येण्याचे धाडस करणार नाहीत.

थोडक्यात मी असे म्हणेन की, आपल्या जीवनातील अधिकाधिक उत्कर्षाचा काल हाच.

दि. २५, २८, २९ या कालाचे महत्त्व अविस्मरणीय असेच जाणवेल.

**वृश्चिक :** साऱ्या वृश्चिक राशी व्यक्तींना आदराने अभिवादन करावे असा हा काल आहे. थोडा अतिशयोक्तीचा दोष पत्करूनही मी आपल्या बाबतीत असे म्हणेन की, या वेळी तुमच्या भाग्याला उधाण येईल, प्रतिष्ठा हिमालयाशी स्पर्धा करू लागेल, कर्तृत्वाला इंद्राच्या खड्गापेक्षाही अधिक धार चढेल !

सहज काही करायला जावे आणि ते घवघवीत यश घेऊन उठावे असा तुम्हांला पदोपदी साक्षात्कार घडू लागेल. संपत्ती, प्रतिष्ठा, यश, अधिकार—काय हवं ते या वेळी लाभेल तुमच्या—अपेक्षेपेक्षाही अधिक.

प्रवास, स्थानांतर, बदली, बढती या गोष्टी केव्हाही घडतील.

दि. २४, २८, ३० या काली आपल्या अनेक योजना आकार घेऊ लागतील.

**धनू :** प्रखर ग्रह सूर्य पहिला, स्फोटक मंगळ दुसरा आणि हिंसकग्रह शनी चौथा. चोहो बाजूंनी वणवा पेटल्याचे भयानक दृश्य दिसू लागेल. एकटा भाग्यस्थ गुरूच काय तो तुमच्याशी एकनिष्ठ आहे. तो याही प्रसंगातून तुम्हांला निर्विघ्नपणे बाहेर काढील. पण हे दिवस मोठे खडतरच. संयम, निष्ठा या मंत्राचे अखंड पुरश्चरण केल्यानेच तुम्हांला थोडेफार स्वास्थ्य लाभू शकेल.

कोणतेही कार्य सहज सुलभपणे घडेलच अशी आशा खोटी. धावपळ धडपड केल्याशिवाय निभाव लागणेच कठीण.

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड
शर्मा स्वीट मार्ट
दत्त मंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

तसे विपरीत काही घडणार नाही; भाग्यातील गुरू घडू देणार नाही. पण सावध राहणे भाग आहे.

दि. २७, २८, २९ या काली थोडेफार सहकार्य मिळावे.

**मकर** : सूर्य मंगळांनी या वेळी तुम्हांला अगदी धारेवर धरलं आहे. अशा वेळी गुरूही तुमच्यावर नाराज. ऐनवेळी मदतीला धावून येईल असा कोणीच दिसत नाही—फक्त परमेश्वराशिवाय.

काहीसे जुळतेमिळते घेऊन, वेळप्रसंगी माघारही घेऊन वेळ निभावून न्यायची तयारी ठेवा. क्षुल्लकशा गोष्टीने चिडू नका. स्फोटक विचारांना मनात थारा देऊ नका. कोणाच्याही अभिवचनावर विसंबून राहू नका. कोणत्याही गोष्टीबद्दल निर्णय घेताना कमीतकमी शंभर वेळा तरी विचार करा. आततायीपणा अंगाशी आल्या-खेरीज राहणार नाही.

दि. २८, २९ थोडेफार अनुकूल दिवस एवढेच.

**कुंभ** : लाभस्थानी सूर्य ही अवस्था १९६७ मधील पहिलीच. शिवाय सूर्यगुरु-त्रिकोण तुमच्या जीवनातील अधिकाधिक चांगला काल हाच. असे म्हणण्यात अति-शयोक्ती होऊ नये, शनि—मंगळांच्या अनिष्टतेची फारशी दखल घेण्याची आता गरजच भासू नये.

तुमचे सांसारिक जीवन प्रसन्नतेने उधाणास येईल, व्यावसायिक क्षेत्रही जगाने हेवा करावा असे आकर्षक दिसू लागेल. तुमच्यातील कलावंताला याच वेळी जाग येईल. तुमची जिद्द, तुमचा निर्धार तर अक्षरशः पेटून उठेल. सांपत्तिक प्रगतीचे अनेक नवनवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील.

दि. २७ ते ३० या काली आश्चर्यकारक प्रगतीचा प्रत्यय यावा.

**मीन** : तुमच्या प्रगतीची घोडदौड अव्याहतपणे चालूच राहील. प्रगतीचा वेग वाढवणाऱ्या अनेक ग्रहयोगांची या वेळी भर पडणार असल्यामुळे साडेसातीच्या अनिष्ट कालातही इतका चांगला काल प्रत्ययास येऊ शकतो, याचे तुमच्याप्रमाणे अनेकांना आश्चर्य वाटू लागेल.

नव्या व्यवसायधंद्याचा आराखडा तयार केला जाईल, अनकांचे हार्दिक सहकार्य मिळण्याची खात्री वाटू लागेल. साऱ्या गोष्टी आखीव वेळापत्रकाप्रमाणे घडत आहेत असा प्रत्यय यायला लागेल.

दि. २८ च्या सूर्य-गुरु-त्रिकोणामुळे नवे क्षेत्र हाती येण्याची चिन्हे दिसू लागतील.
दि. २८ ते ३० या कालात अनेक योजना यशस्वी ठरू लागतील.

O

## □ माझी सुश्राव्य शोकांतिका

फार प्राचीन काळी अनवधानाच्या भरात पंडित नेहरू बोलून गेले होते की, सगळ्या काळाबाजारवाल्यांना झाडावर टांगून फाशी देण्यात यावे. पंडित नेहरू गेले, ती झाडेही गेली असावीत—फक्त राहिले ते काळाबाजारवाले. तेव्हापासून बोलाची कढी अन् बोलाचाच भात भुरकायलादेखील आपले राज्यकर्ते धजत नाहीत. पण मध्येच एखादा अपवाद घडतो अन् लक्ष वेधून घेतो. उदाहरणार्थ, थोड्याच दिवसांपूर्वी दिल्लीच्या टेलिफोन-खात्याच्या नवीन जनरल मॅनेजरने अशी जाहीर घोषणा केली की, येत्या एक-दोन महिन्यांत मी दिल्लीचे टेलिफोन सुधारले नाहीत तर खुश्शाल मला फाशी द्या!

काय जिगरचा माणूस! अशा प्रकारचे धाडशी आवाहन म्हणजे मृत्यूला जाहीर निमंत्रणच नाही का? त्यामुळे आपले अंतःकरण तर बुवा कौतुकाने एकदम उचंबळून आले आणि त्या झटक्यातच मी जनरल मॅनेजर साहेबांचे हार्दिक अभिनंदन करण्यासाठी टेलिफोन उचलला व नंबर फिरवला. पुढे घडले ते असे:

मी—हॅलो, दिल्ली टेलिफोन खात्याच्या जनरल मॅनेजरचे ऑफिस का?

आवाज – माफ करा, रॉंग नंबर.

मी – (पुन्हा नंबर फिरवून) हॅलो, दिल्ली टेलिफोन जनरल—

आवाज नंबर २— (त्रासलेल्या सुरात) हे बघा, तुम्हांला रेल्वे चौकशी हवी असेल तर डायरेक्टरीत आधी नीट नंबर बघत का नाही? काय लोक आहेत! दिवसभर नुसतं डोकं उठवलंय्...

मी – (अजिजीच्या सुरात) माफ करा हं, रॉंग नंबर... (अधिक काळजीपूर्वक नंबर फिरवून) हॅलो...मला दिल्ली टेलि—

आवाज नंबर ३ – हे बघा, मी तुम्हांला एकदा सांगितलं ना की, हा रॉंग—

मी घाईघाईने फोन खाली ठेवला. एव्हाना मला दिल्ली टेलिफोन जनरल मॅनेजरबद्दल वाटणारे मणभर कौतुक शेरभर कमी झाले होते.

दोन-तीन मिनिटांचे मध्यंतर.

मी – (एकेक आकडा सावकाश फिरवीत) अं...कोण बोलतंय्...?

आवाज नंबर ३ – (कुजबुजत) बोला साहेब! तुम्हीच पाच मिनिटांपूर्वी फोन केला होता नं? साहेब माल एकदम गॅरंटीड, त्याची बिलकुल काळजी करू नका—फक्त कस्टमची जरा मूठ दाबावी लागेल...फक्त शंभर रुपये...

मी कपाळावर हात ठेवून रिसीव्हर खाली ठेवला. आतापर्यंत जनरल मॅनेजर साहेबांच्याबद्दल वाटणारे कौतुक बरेच ओसरले होते. तसाच एक हात कपाळावर अन् एक हात रिसीव्हरवर ठेवून दहा मिनिटे स्वस्थ बसलो. मग जरा चिडूनच

मी – हॅलो, मला—

एक मृदु-मुलायम आवाज – अय्या!

किती रे वाट पाहायची सुरेश तुझ्या फोनची ? आम्ही नाही जा...मग ठरलं नं आजच्या पिक्चरचं ? एलिझाबेथ टेलर काय ग्रेट दिसते नाही ? अन् बरं का सुरू, मी तुझ्या आवडीची ती गुलाबी जॉर्जेट साडी नेसणार आहे. मग एक माणूस कसं खुश होतं...अं ?

मी – (आता चांगलाच गरम) हे बघा बाई, मी तुमचा सुरू नाही, मला एलिझाबेथ टेलरपेक्षा कोपऱ्यावरचा टेलर जास्त माहीत आहे, अन् मला गुलाबी रंग मुळीच आवडत नाही.

दाणकन् रिसीव्हर आपटला. दहा मिनिटांनी थंड झाल्यावर मी पुन्हा नंबर फिरवला, पण मी काही बोलायच्या आधीच एक दबलेला आवाज–

रहीम, तू अगदी वेळेवर फोन केलास. चकार शब्द बोलू नकोस. कारण, तुझा आवाज चुकूनही कुणाच्या कानावर जाता कामा नये. मी काय सांगतो, तेवढे नीट ऐक मात्र. आज रात्री अकरा वाजून साडे अकरा मिनिटांनी ठरलेल्या ठिकाणी ये. तेथे एक पिवळी मोटार दिसेल. तिच्यात बस. काल सांगितलेल्या ठिकाणी उतरलास की याकूब भेटेल. त्याच्याजवळ पिस्तुले आहेतच. पुढे काय ते तुला माहीत आहेच. मात्र काळा सूट घालायला विसरू नकोस. अन् परवलीचा शब्द ‘पिवळा हत्ती’ आहे. जर काही घोटाळा झाला, तर तुझ्याजवळ ती गोळी देऊन ठेवली आहेच. नुसती दाताखाली चावायची की, एक मिनिटात काम खलास !

कट् असा आवाज झाला अन् टेलिफोन बंद झाला. आता मला चांगलाच घाम फुटला होता. ब–बाप रे ! काही तरी खुनी कट होता...घाईघाईने मी पोलिसचा नंबर शोधून काढला.

मी – ह-हॅलो, प-पोलिस–एक कट झालाय्–नाहीं होतोय्-नाही नाही, होणार आहे...

मला शांतपणे अडवून एक पोलिसी आवाज – तुम्ही कोण ?

मी–मी...मी... (येव्हाना मी चांगलाच गडबडलो होतो, त्यामुळे माझे नावच मला आठवेना.) माझे नाव राहू द्या हो, पण मला आताच एका माणसाने अशी माहिती दिली की, याकूब तिकडे पिस्तुल घेऊन येणार आहे अन् परवलीचा शब्द पिवळा हत्ती आहे...

आवाज – (मोठ्याने कुणाला तरी) पागल है यार... (मला) त्या माणसाचे संपूर्ण नाव आणि पत्ता द्या...

मी – पत्ता ? पत्ता ? अहो, एक भयंकर कट शिजतोय् अन् तुम्ही मला कटवाल्यांचे पत्ते विचारता...त्यांनी काय व्हिजिटिंग कार्ड छापून कट रजिस्टर केलाय्...?

मी दाणकन् फोन खाली आदळला अन् त्या क्षणी माझी सहनशीलता व टेलिफोन साहेबांबद्दलचे कौतुक यांचे एकसमयावच्छेदेकरून अवसान झाले.

तेव्हापासून मी रोज टेलिफोन ऑफिसच्या समोरच्या चौकात एक झाड आहे त्याच्याखाली बसतो–अन् जनरल मॅनेजर साहेबांचा चपराशी झाडाला दोरी टांगायला केव्हा येणार आहे याची प्रतीक्षा करतो.

○

## नव-स्त्री निर्मितीचे आशास्थान

# वनस्थळी विद्यापीठ

महाकवी गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोरांचे एक रम्य स्वप्न " **शांति-निकेतन** " च्या रूपाने साकार होऊन जगातील पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील स्त्री-पुरुषांना बंगालमध्ये स्वत:कडे, गेली कित्येक तपे आकर्षित करीत आहे; तर राजस्थानसारख्या मरुभूमिव्याप्त राज्यातील " **वनस्थळी विद्यापीठ** " नव-स्त्री निर्मितीचे एक आशास्थान बनून राहिले आहे. स्त्री-शिक्षणाच्या क्षेत्रात विशेष महत्त्वाची आणि एक वैशिष्टयपूर्ण कामगिरी बजावीत असलेले हे वनस्थळी विद्यापीठ जयपूरपासून पंचेचाळीस मैलांवर आणि निवाई वनस्थळी रेल्वे-स्टेशनपासून पाच मैलांवर वसलेले आहे. भारताच्या निरनिराळ्या कोपऱ्यांतूनच केवळ नव्हे, तर दूर-देशांतूनही अनेक विद्यार्थिनी शिक्षण घ्यायला येथे येतात ! यावरून या संस्थेच्या महत्त्वाची कल्पना करता यावी. या दृष्टीने पाहता ही केवळ एक अखिल भारतीय स्वरूपाची संस्था नसून आंतरराष्ट्रीय पातळीस पोचलेली संस्था आहे हे दिसून येईल.

जवळ जवळ आठशे एकर जमिनीवर वसलेल्या या वनस्थळी विद्यापीठाचे वातावरण एखाद्या खेडयासारखे शांत आणि साधे आहे. अशा या वनस्थळीला जयपूरहून बसने जाण्याची व्यवस्था आहे. नावावरून तरी आधुनिकतेचा बोध होत नसलेल्या या वनस्थळीस भेट द्यायला येणारे लोक मात्र आश्चर्याने थक्क होतात. कारण शिक्षणक्षेत्रात या संस्थेने केलेली प्रगती पाहून आश्चर्य वाटणे साहजिकच आहे.

### जन्मकथा

वनस्थळी विद्यापीठाचा जन्म एका दु:खद घटनेतून झाला हे ऐकून कदाचित् कुणाला खरेही वाटणार नाही ! ही दु:खद घटना सन १९३५ मध्ये घडली. आणि त्याच घटनेमुळे वनस्थळीसारख्या लहान व सामान्य खेडयात वनस्थळी विद्यापीठाची स्थापना झाली. आणि तिचे रूपांतर हळूहळू एका मोठ्या शिक्षणसंस्थेत झाले.

एक सामाजिक कार्यकर्ते व जयपूर राज्याचे माजी मुख्य-मंत्री, पंडित हिरालाल शास्त्री आपल्या पत्नीसह त्या काळात वनस्थळी विभागत " जीवन-कुटिर " नावाची एक संस्था स्थापन करून जन-सेवेचे कार्य करीत होते. एप्रिल १९३५ मध्ये, एक दिवस त्यांची कन्या शांताबाई ही अचानक मृत्युमुखी पडली. आपल्या लहान मुलीच्या आकस्मिक मृत्यूच्या या आपत्तीमुळे तिच्या आईवडिलांना दु:खाचा मोठा धक्का बसला. परंतु, तिच्या अकाली मृत्यूमुळे निराश होणे किंवा आपण करीत असलेल्या लोकसेवेत खंड पडू देणे त्यांना योग्य वाटले नाही. उलट आपल्या प्रिय कन्येच्या स्मृतीमुळे त्यांना विधायक आणि भरीव कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. त्या प्रेरणेचा परिणाम म्हणून " शांतिबाई शिक्षा कुटिर "ची स्थापना झाली. ही झाली ६ ऑक्टोबर १९३५ ची गोष्ट ! त्या वेळी ' शांतिबाई शिक्षा कुटिर 'मध्ये फक्त सहा विद्यार्थिनी असून त्यांना शिकविण्याचे कार्य दोन व्यक्ती करीत होत्या. पुढे त्याच संस्थेचे नाव बदलून **' वनस्थळी विद्यापीठ '** असे नवीन नामकरण करण्यात आले. आरंभीच्या दोन शिक्षकांच्या कार्यनिष्ठेमुळे, उत्साहामुळे आणि कार्यक्षमतेमुळेच मूळच्या ' शिक्षाकुटिर 'चे रूपांतर आज दिसत असलेल्या एका मोठ्या, महत्त्वाच्या आणि आंतरराष्ट्रीय शिक्षण–संस्थेत झाले आहे.

" वनस्थळीने माझे मन जिंकून घेतले आहे " असे एकदा महात्मा गांधींनी लिहिले; ते किती सार्थ आहे, याची प्रचिती तेथे जाणाऱ्या कुणालाही आल्याशिवाय राहत नाही. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी या उक्तीचे प्रतिबिंब येथे पाहायला मिळते. वनस्थळी विद्यापीठात एकीकडे साधे वातावरण आणि साधी राहणी दिसेल; तर त्याबरोबरच दुसरीकडे विद्यार्थिनींना उच्च विचारांचे बाळकडू दिले जात असल्याचे दिसून येईल.

## शिक्षणक्रम

येथे केवळ भारतीयच शिक्षण दिले जाते असे नाही, तर पौर्वात्यांच्या आध्यात्मिक ज्ञानाचा आणि पाश्चिमात्यांच्या वैज्ञानिक प्रगतीचाही अभ्यास विद्यार्थिनीकडून करवून घेतला जातो. नव्या–जुन्यांचा हृदयंगम संगम येथील शिक्षणक्रमात साधलेला आढळेल.

एक आंतरराष्ट्रीय ख्यातीची शिक्षणसंस्था म्हणून जरी ' वनस्थळी 'ची गणना होत असली, तरी तिचे आपले खास वैशिष्ट्य म्हणजे तीत विद्यार्थिनींना दिले

– – – – – –

इंद्रसेन डोंगरे

– – – – – –

जाणारे, जीवनाच्या पाच महत्त्वाच्या अंगांचे शिक्षण हे होय. ती पांच अंग म्हणजे (१) शारीरिक; (२) व्यावहारिक; (३) कला; (४) नैतिक (५) बौद्धिक ही होत.

अशा प्रकारे विविधरूपी शिक्षण देण्याचा उद्देश विद्यार्थिनींचा सर्वांगीण, समन्वयकारक आणि समतोल विकास घडवून आणणे आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिकाधिक पूर्ण बनविण्याचा प्रयत्न करणे हा होय. शारीरिक शिक्षणात विविध प्रकारचे खेळ व व्यायाम येतात. यांत तलवार, बंदूक व भाला वगैरे चालविण्यापासून तो घोड्यावर बसणे, मोटार चालविणे आदि गोष्टींचा अंतर्भाव होतो. तसेच पोहणे, आणि विमान चालविणे यांचेही प्रशिक्षण येथे विद्यार्थिनींना दिले जाते.

व्यावहारिक शिक्षणात संसारोपयोगी व घरगुती गोष्टीपासून तो तेले, साबण वगैरे तयार करण्याच्या कुटिर–उद्योगांचा समावेश केला जातो. कलेमध्ये–गायन, वादन, चित्रकला आदि ललितकलांचा समावेश केलेला असून त्यांत विद्यार्थिनींना पारंगत बनविले जाते. नैतिक शिक्षण म्हणून विद्यार्थिनींना जे शिकविले जाते, त्याला 'उपदेशा'चे स्वरूप येऊ नये, याकडे कटाक्षाने लक्ष दिले जाते. म्हणूनच येथे कुठल्या एकाच धर्मग्रंथाचे शिक्षण न देता, विभिन्न धर्मांच्या पुस्तकांच्या अध्ययनाद्वारे विद्यार्थिनींच्या नैतिक व आध्यात्मिक ज्ञानात भर घातली जाते.

बौद्धिक शिक्षणाच्या बाबतीत विद्यार्थिनींना गतकाळातील इतिहासाच्या तुलनेने वर्तमानकाळातील घटना समजतील अशा दृष्टीने मानसिक क्षमतेचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. शिवाय, देशादेशांतील सीमांच्या पलिकडे जाऊन अखिल विश्वाच्या संदर्भात विचार करण्याची पात्रता किंवा कुवत त्यांच्यात कशी निर्माण होईल, याकडे लक्ष दिले जाते. अर्थात् येथे व्यावहारिक ज्ञानाचा शोध घेत असताना पुस्तकांना आपोआपच गौण स्थान प्राप्त होते. हे तत्त्व डोळ्यासमोर ठेवूनच येथे बहुधा सहली, प्रवास, पर्वतारोहण यांचे कार्यक्रम आखले जातात. दरवर्षी मेळावे देखील भरविले जातात. तसेच, विद्यार्थिनींची पार्लमेंट, विद्यार्थी विधान–परिषद आणि 'प्लॅनिंग फोरम' यांची स्थापना येथे करण्यात आली आहे, तीही याच उद्देशाने.

इतर शिक्षण-संस्थांहून "वनस्थळी–विद्यापीठाचे आणखी एक वेगळेपण म्हणजे येथे विद्यार्थिनींच्या वेगवेगळ्या वयाच्या गटानुसार शिक्षण दिले जाते. पहिलीपासून आठवीपर्यंत विशिष्ट शिक्षणक्रम पूर्ण केल्यावर विद्यार्थिनींना 'संस्कृता' नावाच्या परीक्षेस बसावे लागते. नवव्या इयत्तेपासून पुढे बारावीपर्यंत 'उच्चतर माध्यमिक' शिक्षणक्रम येतो. त्यानंतर 'प्री-युनिव्हर्सिटी' व विश्वविद्यालयीन शिक्षणक्रम शिकविला जातो. त्याच्याचबरोबर निरनिराळ्या क्षेत्रांतील प्रशिक्षण आणि डिप्लोमाही दिला जातो.

वहु-उद्देशीय शिक्षण देणाऱ्या या शिक्षणसंस्थेत शिक्षणास योग्य अशा वयो-मर्यादानुसार निरनिराळे शैक्षणिक विभाग पाडलेले आहेत. उदा० बाल-मंदिर, प्राथमिक विद्यालय, संस्कृता, ज्ञान-विज्ञानमहाविद्यालय (संगीत, चित्रकला, डिप्लोमासह–शारीरिक शिक्षण) आणि शेवटी महाविद्यालय.

वनस्थळी येथील विद्यालयात हिंदीशिवाय संस्कृत, आसामी, बंगाली, मराठी, गुजराथी, काश्मीरी, पंजाबी, तामिळ आणि तेलुगू भाषा देखील शिकविल्या जातात त्याशिवाय, जर्मन, फ्रेंच, रशियन, चिनी, नेपाळी वगैरे भाषांपैकी काही भाष शिकविण्याची व्यवस्था आहे, तर काहींची शिकविण्याची व्यवस्था केली जात आहे.

या शिक्षण-संस्थेस खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय स्वरूप देण्याच्या हेतूने अलिकडच येथे 'आंतरराष्ट्रीय भवन' (विद्यार्थिनींचे वसति-गृह) स्थापन करण्यात आले असून त्यात परदेशांहून विशेष शिक्षण-क्रमाकरिता विद्यार्थिनी तेथे येऊन राहतात. या विशेष-शिक्षणक्रमांत जे विषय अलिकडे समाविष्ट केलेले आहेत ते महात्मा गांधीजींच्या विचार-प्रणालीनुसार असून त्यात भारतीय चित्रकला आणि भिन्न भारतीय भाषा यांचा अंतर्भाव केलेला आहे.


डोंगरे

# अप्सरा

अभिप्राय क्रमांक स्पर्धा

त्वरा करा.

शेवटची ता. ३०।१२।६७

[पृष्ठ १५ वरून]

ओझे ठेवल्याप्रमाणे कष्ट केले नाहीत. याचे कारणच हे की जीवनातील समतोलाचा विसर ते कधी पडू देत नाहीत. मार्क्सवादी आर्थिक सिद्धांत, वेदान्त, कृष्णमूर्तींचे तत्त्वज्ञान, गांधीवाद, नेहरूंचे वाङमय, एम. एन. रॉय यांचे वाङमय इत्यादींसंबंधी नाना अधिकारवाणीने बोलतात, पण एकांगी अभ्यासाने जो कर्कशपणा येतो तो त्यांच्यात नाही. हॅवलॉक एलिसने समतोलाचे जे तत्त्वज्ञान मांडले आहे, त्याचा जास्तीत जास्त प्रयोग नाना करीत असताना दिसतात. म्हणूनच गांधीवादी असून ते अन्य गांधीवाद्यांप्रमाणे छांदिष्ट नाहीत. नेहरूंचे भक्त असूनही आध्यात्मिक वाङमयाची त्यांच्यावरील मोहिनी जबरदस्त आहे; कृष्णमूर्तींच्या तत्त्वज्ञानावर ते लिहितात व बोलतात पण काही कृष्णमूर्ति-भक्तांचा पायघोळपणा आणि ढोंग त्यांच्यापाशी नाही. बालवाङमयासारख्या, प्रसिद्धीच्या झगझगाटापासून दूरच्या क्षेत्रात निष्ठापूर्वक चाळीस वर्षे काढूनही त्यांनी आपण समाजावर मोठे उपकाराचे ओझ ठेविले आहे असा आव मिरवला नाही.

म्हणजे अध्यात्म, गांधीवाद वा व्यायाम यांपैकी कशाचेच कर्मकांड नानांनी

" जगतेर आनंदयज्ञे ऑमॉर निमंत्रण "
म्हणून गेले रवींद्रनाथ.
हे भाग्याचं निमंत्रण मिळालेले नाना,
जात नाहीत कधी एकटे
बरोबर असते एखादे धाकटे
नानांचे बोट धरून,
या यज्ञमंडपात हिंडताना, गळून पडतात टरफले,
वयाची, दुःखाची,
जाणिवेची, नेणिवेची
अन् गाभ्यातला शुद्ध आनंद.
उजळून टाकतो अंतराला.
अन् सुखावून गेलेले मूल उद्गारते
' देवा आम्हासी, सुखे घालावे जन्मासी. '

अरविंद गजेंद्रगडकर

स्वीकारले नाही. आणि त्यामुळे ते नेहमीच उल्हसित राहिले. अध्यात्मवादातही दोन प्रकार असतात. एक अहंकारी व दुसरा दांभिक. नाना या दोन्ही पंथांत सामील झाले नाहीत. त्यांच्या जीवनाचा व वृत्तीचा विचार केला तर असे म्हणावेसे वाटते की, उदारमतवादी (लिबरल) पंथाचे ते खरे पाईक आहेत. राजकारणात त्यांनी गांधी-नेहरूंचा पक्ष घेतला. पण त्यांचे आत्मिक नाते रानडे, गोखले, तात्यासाहेब केळकर यांच्या परंपरेशी जुळते. त्यांना स्वतःला आपल्याला काय हवे व आपणांस कोठपर्यंत जावयाचे आहे याची कल्पना आहे. आणि त्यामुळे वैयक्तिक वा सार्वजनिक जीवनात त्यांना कशाचा हपाप सुटलेला नाही. कोणत्याही व्यक्तीला ज्ञानाच्या मार्गाने व भक्तीच्या मार्गाने आपले ईप्सित साध्य करता येते. नाना भक्तिमार्गी असले तरी ज्ञानमार्गाचा त्यांना तिटकारा नाही. तसेच आत्मतृप्ती व आत्मविस्मृती यामुळे त्यांच्या जीवनात त्यांनी दगदग सोसली पण खरखर वाढू दिली नाही.

नानांचे आवडीचे विषयही विविध. आधुनिकांशी ते आधुनिक विषयावर बोलू शकतात. आणि तत्त्वज्ञानाचीही चर्चा ते क्षीरसागर, उमराणी यांच्या बरोबर करू शकतात. कै. बापूसाहेब माटे यांचे संभाषण आणि दामूअण्णा मालवणकरांच्या भूमिका यांत ते असेच रंगत आले आहेत. ज्ञानेश्वरीतील ओव्यांवर भाष्य करणारे नाना, बापूसाहेब माटे यांची नक्कलही उत्तम प्रकारे वठवतात हे त्यांच्या निकटवर्तीयांना माहीत आहे. लोकांना ते सहसा तोडीत नाहीत. पण कोणाची मजल कोठपर्यंत हे ते जाणतात. आणि एकंदरच—

**अशा जगास्तव काय कुढावे ?**
**हरी दूता का विन्मुख व्हावे ?**

ही वृत्ती असल्याने ते आपल्या इच्छित कार्यापासून विचलीत होत नाहीत.

आज " लाइट ऑफ एशियाचे " बुद्धायन—रूपांतर केल्याच्या समाधानात ते मग्न आहेत. आजवर त्यांनी 'आनंद'च्या द्वारे केलेल्या वाङमयसेवेची पावती षष्ठ्यब्दीपूर्ती—समारंभाच्या निमित्ताने मिळत आहे. माझ्यासारख्या त्यांच्या आप्तास हा काहीसा अभिमानाचा प्रसंग आहे. कारण चाळीस वर्षांपूर्वी ज्या कुटुंबाचे कोठेच काही नव्हते, त्या कुटुंबाला सांगण्यासारखे नाव आता आहे आणि हे श्रेय नानांचे आहे !

या संदर्भात व्हॉल्टेरची एक आठवण सांगण्यासारखी आहे. एका सरदाराच्या वाड्यात तो मेजवानीला गेला असता त्याच्या वाणीचा सतत ओघ चालू होता आणि आजूबाजूचे लोक प्रभावित झाले होते. याची खंत वाटून दुसऱ्या एका उमरावाने विचारले, "एवढ्या मोठ्याने बोलणारा हा तरुण आहे तरी कोण ?" त्यावर व्हॉल्टेरने मार्मिक उत्तर केले. तो म्हणाला, "My Lord, he is one who does not carry a great name, but wins respect for the name he has."

नानाही हे म्हणू शकतील.

O


# राज्य नाट्य महोत्सव

## वर्ष ७

प्रतिवर्षी वाढत जाणाऱ्या विद्यार्थिसंख्येच्या प्रमाणात एस. एस. सी. बोर्ड आपली परीक्षाकेंद्रे वाढवत जाते. तसेच काहीसे या महोत्सवाच्या बाबतीत झाले आहे. यंदापासून नाशिक केंद्राची भर घालून पुणे केंद्राला स्थानिक केंद्राचे स्वरूप देण्यात आले आहे. स्वाभाविकपणे नाटकांचा रेटा जवळ जवळ निम्याने हटून नऊ नाटकांच्या नव-रात्रींत महोत्सव साजरा झाला.

झालेल्या नाटचप्रयोगांत आघाडी मारली ती, महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेच्या 'ही चौकट वाटोळी' या नवीन नाटकाने. श्याम फडके यांचे हे नाटक काहीसे गुंतागुंतीचे. प्रसंगापेक्षा प्रसंग उभे करणाऱ्या व्यक्तींच्या मनाचा वेध घेणारे. केवळ कथा सांगणाऱ्या नाटकांच्या तुलनेत अशा प्रयोगशील नाटकांवर अधिक मेहनत घ्यावी लागते. नाटककाराने लिहिलेली वाक्ये उच्चारून काम भागत नाही. बोलल्या जाणाऱ्या संवादाबरोबरच त्यातील दडलेला अर्थ कलावंतांना प्रेक्षकांसमोर ठेवावा लागतो. एखाददुसरा नट चांगला असून भागत नाही. संपूर्ण संघ—ताकदीच्या दृष्टीने एका पातळीवर असल्यास अशा नाटकांत यश मिळवणे सुकर होते. निर्मितीच्या बाबतीतही प्रत्येक बारीकसारीक गरजा तोलून, मापून, बेतून घ्याव्या लागतात. नेपथ्य, सजावट, वेषभूषा या प्रत्येक उपांगाकडून यशाच्या दृष्टीने काही तरी भर पडणे आवश्यक असते. सर्वसाधारणपणे सर्वच नाटकांच्या निर्मितीमागील या गरजांना प्रयोगशील नाटकांच्या बाबतीत विशेष प्राधान्य मिळते. कलावंतांची निवड, आणि निर्मितीची ही उपांगे यांचा अचूक उपयोग करण्यात दिग्दर्शक राजा नातू यशस्वी ठरले आहेत.

कथेच्या दृष्टिकोनातून पाहिले तर वाटोळचा चौकटीची कथा काहीशी विक्षिप्त, अर्थबोध होण्यास दुर्लभ आहे. जयू नावाची मुलगी. घरची स्थिती समाधानकारक म्हणण्याइतकी चांगली. शिक्षण चांगले बी. ए. पर्यंत. थोरला भाऊ इंजिनीयर. तरीही मुलीचे लग्न होत नाही. नकारांना कंटाळून वडील शेवटी दिलीप करमरकर नावाच्या कारकुनाला मुलगी देण्याचे ठरवितात. कारकून जुगारी, सटोडिया, रेसबाज असल्याचे समजते. त्यात जुगारी अड्डयावर त्याला अटक झाल्याच्या वार्तेने लग्न मोडण्यासाठी सर्व मंडळी एकत्र येतात. जयू कसून विरोध करते. लग्नाचा तिचा निश्चय कायम असतो ! जयूच्या या सर्वसाधारण परिस्थितीत असंभाव्य



**उत्तरा बिडये–माधव वझे**

**कलोपासक यंदाही आघाडीवर**

वाटणाऱ्या निर्णयाचा मागोवा घेणे, या निर्णयामागील मानसिक प्रक्रिया स्पष्ट करणे, हाच या नाटकाचा विषय ! विषयाचा आशय समजावून सांगणे सुलभ जावे, म्हणून मधूचा–जयूच्या भावाचा उपयोग करण्यात आला आहे.

नाटकाची ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन प्रयोग बसवण्यात आला आहे. निर्मितीची प्रत्येक बाब नाट्य विषयाची उकल करण्यास मदत करणारी आहे.

जयू आणि रमाकांत व जयू आणि मधू यांच्या प्रसंगांवर विशेष मेहनत घेतलेली आहे. सर्व कलावंतांना नाटक समजल्याचे प्रयोग पाहत असताना जाणवते. नाटकाचा विषय हा सामाजिक स्वरूपाचा नाही. त्याच्या मर्यादा संपूर्णपणे व्यक्तिगत स्वरूपाच्या आहेत. अशा परिस्थितीत विषय समजूनही तो न आवडणे अगदी शक्य आहे. म्हणूनच एखाद्या रसिकाचे नाटक नाही आवडले पण प्रयोग आवडला बुवा, हे उद्गार ही दिग्दर्शकाच्या परिश्रमांची पावती देणारेच ठरतात.

पुण्याच्या हौशी नाट्यक्षेत्राला सध्या तरी मक्तेदारीचे स्वरूप आले आहे. नाटके नऊ झाली तरी निर्णयाच्या दृष्टीने खरी लढत होते, ती दोन संस्थांत–कलोपासक व पी. डी. ए. असे या लढतीचे स्वरूप. स्वाभाविकपणेच उत्सुकता असते ती केवळ पहिल्या क्रमांकांच्या बाबतीत.

स्वाभाविकपणेच नंतर वळावे लागते ते पी. डी. ए. च्या 'सती 'कडे.

सती आणि चौकट वाटोळी मध्ये स्थळकाळाचे भेद असले तरी दोन्ही नाटकांमध्ये एका व्यक्तीभोवती– कथासूत्र गुंफलेले आहे. दोन्ही बाबतींत स्त्रीच्या अंतर्मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न झालेला आहे.

सतीचा काळ आहे श्रीमंत माधवराव पेशवे यांच्या मृत्यूनंतरचा. सरदार मेहेंदळे यांच्या घराण्यात बाई सवाष्ण राहत नाही असा जणू शापच आहे. घरामध्ये आधीच तीन विधवा आहेत. कर्ते पुरुष हरिपंत, आणि वयात आलेला त्यांचा पुतण्या नारायण ही पुरुष मंडळी. स्वत:ची इच्छा नसूनही नारायण विधवा आईच्या व काकांच्या आग्रहाखातर लग्न करतो. लग्नानंतर पत्नीला कटाक्षाने दूर ठेवतो. आणि काशीयात्रेला जाऊन तिकडेच मरतो. पतीसंबंधी कोणताही जिव्हाळा नसल्याने नारायणाची पत्नी–लक्ष्मी घरच्या सर्वांचा आग्रह धुडकावून सती जाण्याचे नाकारते. आणि आत्महत्या करण्याच्या उद्देशाने नदीत उडी टाकते. 'फोर्ड' नावाचा एक ब्रिटिश अधिकारी तिला वाचवतो. जीवनाची चांगली बाजू तिला दाखवून जगण्याची इच्छा तिच्या मनात निर्माण करतो. परस्परभावनांच्या कळ्या उमलण्यास कोठे सुरुवात होते ना होते तोच पेंढाऱ्यांचा बंदोबस्त करण्यास गेलेला फोर्ड तिकडेच मरण पावतो आणि लक्ष्मी सती जाण्याची तयारी करते.

## लक्षात राहिली फक्त लक्ष्मी

सती ह्या प्रयोगात लक्षात राहते ती अंजली फडके. दुर्दैवी लक्ष्मीची व्यक्तिरेखा तिने समर्थपणे साकार केली आहे. प्रयोगावर भरपूर मेहनत घेतल्याचेही जाणवते. तरीही प्रयोगाचा ठसा मनावर उमटत नाही. एकसंघी परिणामाच्या अभावी काही चांगले प्रसंग फक्त लक्षात राहतात. शॉटस्–सीनच्या मर्यादा ओलांडू न शकलेल्या चित्रपटासारखी प्रयोगाची अवस्था झाली आहे.

योगायोगांवर भरपूर भर असल्याने कथानकही मनाचा ठाव घेऊ शकत नाही. नारायणाच्या वर्तणुकीमागे केवळ विरक्तीचे कारण पुरेसे वाटत नाही. त्यामुळेच त्याने असे का वागावे, असा संभ्रम प्रेक्षकांना पडतो. फोर्ड साहेब लष्करी माणूस आहे. दीर्घ काळ इथे त्याचे वास्तव्य आहे असे समजले, तरी त्याला देवाण घेवाण करण्याइतपत मराठी निश्चित येईल हे समजू शकते, पण हा लष्करी अधिकारी दुभाष्याचे काम करण्यासाठी इथे आला आहे का अशी शंका येण्याइतके चोख मराठी तो बोलतो. श्रीराम खरे (फोर्ड) यांना देण्यात आलेली संवाद बोलण्याची पद्धतही विचित्र, व रसहानी करणारी झाली.

हरिपंताच्या घरचे प्रसंग रंगभूमीचे तीन तुकडे करून दाखविण्यात आले आहेत. यासाठी वापरण्यात आलेले मल्यामोठ्या पडद्यांचे तंत्र कमालीचे त्रासदायक वाटले. तंत्रातील परिपूर्णतेच्या अभावी प्रयोगहानी होण्याचा पी. डी. ए. च्या बाबतीत कदाचित हा पहिलाच प्रसंग असावा. तंत्राच्या वापराबाबत केवळ प्रेक्षकच नव्हे तर

कलावंतही जागरूक असल्याचे जाणवले. स्पर्धेतील यश सतीच्या वाट्यास येईलही, परंतु या प्रयोगाने प्रेक्षकांच्या पी. डी. ए. कडून असलेल्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत हे निश्चित. स्पर्धेसाठी आलेल्या नाटकांपैकी दोन उत्तम प्रयोगांचा आढावा विस्ताराने घेतला. गुणवत्तेप्रमाणे अन्य प्रयोगांची दखल घेणेही आगत्याचे आहे. माझ्या मताप्रमाणे गुणवत्तेच्या कसोटीवर स्पर्धेतील अन्य नाटकांचा विचार खालील प्रमाणे करावा लागेल.

**नाटक :** सुंदर मी होणार—सादरकर्ते सरस्वती मंदिर नटसंघ.

श्री. अनंत ओक यांनी बसविलेल्या या नाटकामध्ये स्पर्धेची ईर्षा दिसून आली. कलावन्तांच्या अभिव्यक्तीच्या ताकदीमध्ये अवास्तव तफावत झाल्याने प्रयोगाच्या एकत्रित यशावर परिणाम झाला.

**कलाकार :** दिग्दर्शक अनंत ओक यांची कन्या रोहिणी हिने उभी केलेली बेबी-राजे सहज सुंदर अभिनयामुळे व अभिव्यक्तीतून प्रतीत होत असलेल्या आत्म-विश्वासामुळे मनावर ठसा उमटवून गेली. पुरुषोत्तम सहस्रबुद्धे यांनी महाराजाची भूमिका केली. अपयश नाही हेच त्यांचे यश असे म्हणावे लागेल. जयश्री जोशी (दिदी राजे) व सुहास देसाई (संजय) या दोघांची निवड चुकीची वाटली. नाट-कातील सुरेशच्या शब्दांत सांगायचे झाले तर जयश्रीबाई–' आसावरी ' वाटल्या नाहीत. तरीही संयमित अभिनयामुळे त्या काहीशा यशस्वी होऊ शकल्या. सुहास देसाईचा संजय, जमलेली घडी बिघडवून गेला. चांगल्या संचामधील एखादे महत्त्वाचे पात्र उणे पडू लागले, म्हणजे प्रयोगाचा कसा विचका होतो, याचा प्रत्यय आला.

**तांत्रिक :** नेपथ्य नाट्यकालाशी सुसंगत. मागच्या बाजूचा मोठा ' पोल ' अपे-क्षित कार्य साधून गेला. डॉक्टरकाका, युवराज व बेबी, यांच्या एकत्रित गीताचा प्रसंग ओकांनी लक्षात राहण्याइतका चांगला बसवला होता.

खेड्यामध्ये राहणाऱ्या बुद्धिजीवी वर्गाचे जीवन कसे असह्य झाले आहे याचे चित्रण मो. स. साठे यांच्या ' पुरुषोत्तम ' या नाटकात पाहावयास मिळते. नाटकात घटना कमी व शब्दजंजाळ जास्त अशी अवस्था आहे. कादम्बरीचा फाफट पसारा विषयाला मानवणारा नाही.

या नाटकाचा प्रयोग भरत नाट्य संशोधन मंदिराने ' सरकत्या रंगमंचा 'वर सादर केला. अनेक पात्रे असूनही संघ म्हणून उभे राहण्यात कलाकार यशस्वी झाले.

**कलाकार :** बाबूराव विजापुरे–वय सुमारे ६५–यांनी या वयात केलेले काम तरुणांना लाजवणारे आहे. डॉ. जगन्नाथ आठवले (संभाजी) आप्पासाहेब ताम्हणकर (देवजी पाटील) व बाळासाहेब भागवत (रुपचंद) यांच्या भूमिका चांगल्या झाल्या. निकम मास्तराच्या भूमिकेसाठी जाडजूड प्रकाश इनामदारांची निवड अयोग्य वाटली.

**तांत्रिक :** नेपथ्य होते समाधानकारक, परंतु सरकत्या रंगमंचाचा प्रयोग पूर्ण-

पणे यशस्वी झाला नाही. रंगभूषा व वेषभूषा समाधानकारक होती.

हौशी कलाकार संघाने सौ. शोभना ओगले लिखित संगीत शुभमंगल या नाटकाचा प्रयोग केला. नाटकाचे कथानक थोडे व प्रसंग भरपूर अशी अवस्था असल्यान प्रसंगाच्या खुलावटीवर प्रयोगाचे यश अवलंबून होते. त्या दृष्टीने एक यशस्वी प्रयोग म्हणून याचा उल्लेख करावा लागेल. मात्र प्रयोगातील पात्रांनी परीक्षकांचा केलेला उल्लेख काहीसा खटकला.

**कलाकार** : सौ. निर्मलाबाई साठे (सुमित्राबाई), श्रीमती ताराबाई मराठे (सगुणाबाई) यांची कामे चांगली झाली. अरुण परांजपे (गोंदूमामा) यांच्यावर प्रेक्षक एकदम खूष होते.

**तांत्रिक** : विवाहसमारंभ दाखवण्यासाठी योजलेले नेपथ्यकौशल्य वाखाणण्यासारखे होते. विवाह-समारंभाभोवती कथानक गुंफले होते. अशा समारंभातील अगदी बारीकसारीक वैशिष्टचे त्यातील तपशिलासह दाखवण्यात दिग्दर्शक नारायण जोगळेकर यशस्वी झाले आहेत.

औद्योगिक ललितकला महामंडळाने यंदा स्पर्धेत प्रथमच भाग घेऊन, आचार्य अत्रे यांचे ' उद्याचा संसार ' रंगभूमीवर आणले.

**कलाकार** : काही प्रमाणात केशव घुले (बॅ. विश्राम) यांचा अपवाद वगळता अन्य सर्व कलावंतांच्या अभिनयांतून कृत्रिम आविष्कार दिसून येत होता. बिचाऱ्या उल्हासवर विश्राम व शैलाकडून झालेले अत्याचार पाहून त्याची कीव वाटली.

युनायटेड ॲमॅच्युअर्स ॲसोसिएशनने श्याम फडके यांच्या तीन चोक तेरा या फार्सचा प्रयोग केला.

**कलाकार** : दिग्दर्शक नाना करमरकर यांची शरद गोसावी ही भूमिका त्यांच्या दिग्दर्शनापेक्षा चांगली वठली. अन्य कलाकारांत रघुनाथ श्रीचंद्र भट चांगले वाटले. फार्सच्या अभिनयाच्या सैल कल्पना लक्षात घेऊनही बहुसंख्य पात्रांचा अभिनय अतिरंजित वाटला.

तांत्रिक बाबींमध्ये उल्लेखनीय काही नाही.

ज्योत्स्ना देवधर नामक प्राध्यापिका—बाईंनी लिहिलेल्या ' तांब्याचे झाले सोने ' या नवीन नाटकाचा प्रयोग भारती कलावृंद या संस्थेने केला.

तीन वर्षे अस्तित्वात असलेल्या कोणत्याही संस्थेला स्पर्धेत उतरता येते म्हणे. अनेक मंडळी नाट्यलेखनापासून ते दिग्दर्शनापर्यन्तची आपली " हौस " या नियमाच्या आधारे भागवून घेतात. असे हा प्रयोग पाहिल्यावर वाटले.

पैशापाठी लागलेल्या मंडळींना नीति-अनीतीच्या सर्वसामान्य कल्पना बाजूला ठेवून प्रसंगी कशाचेही मोल द्यावे लागते, हे बाईंच्या नाटकाचे सूत्र. नाटकात वावरणाऱ्या तांबे कुटुंबियांच्या कथेद्वारा बाईंनी हे तत्त्वज्ञान सांगितले आहे. नाटकातील तांबे कुटुंबाचा आणि झाशीच्या राणीचा संबंध लावण्याचा लेखिकेचा प्रयत्न

फारच हास्यास्पद वाटला.

जी गत नाटकाची तीच प्रयोगाची. काकाचे सर्व वर्तनच भोंगळ व विसंगत वाटते.

कलाकार व तांत्रिक बाजू या दोन्ही बाजू उपेक्षणीय.

भाववंधनचा प्रयोग बऱ्यापैकी नटसंघाने केला, तरी तो प्रेक्षणीय निदान श्रवणीय होतो, या सर्वसाधारण समजुतीला सुरुंग लावण्याचे कार्य पुणे मराठी ग्रंथालयाच्या नाटचशाखेने केले.

**कलाकार** : इन्दू–बिन्दू (मांजरेकर भगिनी) या व्यावसायिक कलावंत. नेहमीच्या पद्धतीने एक पाटी टाकण्याचे कार्य त्यांनी केले. महेश्वर झालेले नारायण भावे प्रेक्षकांकडून पसंतीची पावती घेऊन गेले. निर्मितीची तांत्रिक अंगे परंपरागत होती. प्रयोगास दोन दिग्दर्शक असूनही त्यांचे अस्तित्व जाणवले नाही.

स्पर्धेच्या निमित्ताने एक सूचना करावीशी वाटते. स्पर्धेतील नाटके अत्यल्प दरात दाखवली जात असल्याने व्यावसायिक नाटके पाहू न शकणाऱ्या अनेक रसिक प्रेक्षकांना स्पर्धेतील प्रयोगांना हजर राहता येते. परंतु स्पर्धा हे सरकार-घरचे कार्य पडल्याने पन्नास पाऊणशे 'प्रतिष्ठितांना' सिझन-पासेस वाटण्याची पूर्वपरंपरा आहे. ही 'पास' वाली मंडळी एखाद दुसऱ्या प्रयोगाला हजर राहून इतर वेळी खुर्च्या अडवून ठेवतात. संयोजकांनी ही पासपद्धती पूर्णतया बंद करावी. फारच आवश्यक वाटल्यास पहिल्या प्रयोगासाठी अतिशय निवडक मंडळींना ही आमंत्रणे पाठवावीत. स्पर्धांची सर्वसाधारण व्यवस्था–पत्रकारांची बसण्याची व्यवस्था सोडल्यास–समाधानकारक होती. विभागीय समाजकल्याण अधिकारी श्री. वाईकर व त्यांचे कार्यतत्पर सहकारी श्री. लोणकर यांना व्यवस्थापन यशाचे श्रेय द्यावे लागेल.

**–शरद गोखले**

●


आगामी प्रकाशन

# पुरंदऱ्यांची नौबत

## ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायण, पुणे २

## ‘ जगांतील कामगारांनो, एक व्हा ! ’

❋

रशियन राज्यक्रांतीचा
हा प्रारंभीचा हुंकार होता.

या हुंकारात जोश होता,
प्रखर ध्येयवाद होता.
हुंकार साकार करण्याची
असामान्य जिद्द होती.
परिणामतः
झारशाही कोसळली होती,
केरेन्स्की पळाला होता,
आणि
८ नोव्हेंबर १९१७ रोजी
लेनिन-ट्रॉटस्कीची
राजवट सुरू झाली.

## क्रांतिकारी गट सत्ताधारी झाला होता

❋

आणि मग ?
जो तो विचारू लागला,
‘ जागतिक क्रांतीच्या
हुंकारात नवा प्राण
केव्हा ओतला जाणार ?
खरेच केव्हा ?’

## पण......?

❋

क्रांतीची वाटचाल वेगळी असते.
सत्तेची वळणे निराळी असतात.
म्हणूनच कोणीसे म्हटले आहे—
‘ क्रांती आपली पिले खाऊन टाकते ’
विसाव्या शतकाने
अनुभवलेली ही
पहिली क्रांती. पूर्वीच्या
क्रांत्यांपेक्षा तिचे स्वरूप वेगळे,
प्रतिज्ञा वेगळी.
व्होल्गाच्या परिसरात
नेमके काय घडले ?
प्रारंभी पोलादी पड्यातून
फारसे काही झिरपतच नसे.
पण आता–
बरेच काही कळले आहे,
कळत आहे.
या घटनांचा वस्तुनिष्ठ
मागोवा घेणाऱ्या

# व्होल्गा जेव्हा लाल होते–

या लेखमालेचा उत्तरार्ध लवकरच
क्रमशः प्रसिद्ध होत आहे.

लेखक : **वि. स. वाळिंबे**

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

'एक पेकिंगवादी कम्युनिस्ट कार्यकर्ता समोर बोट करून मला सांगत होता —

"ती स्टीफन्स इस्टेट पाहिलीस का? ती आमच्या एका काँग्रेस पुढाऱ्याने एका रकमेने विकत घेतली. हा परवाचा शाळा मास्तर आणि आज पन्नास लाखांची इमारत विकत घेतो. पैसे काय आकाशातून पडतात होय? आमच्या अंगाची लाहीलाही होते. या दरोडेखोरांना एकदा चांगली अद्दल घडविली पाहिजे. त्यांना लाथा मारून हाकलवून दिले पाहिजे."

**"मला" म्हणजे कोणाला?**

**हा पेकिंगवादी कम्युनिस्ट कुठला?**

बंगालच्या जळजळीत राजकारणावर
विदारक प्रकाश टाकणारा
एक प्रदीर्घ लेख –

# रसगुल्ले आणि बॉम्ब!

लेखक : दादुमियाँ

पुढील अंकात –

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.